# वऱ्हाडसमाचार.

The Varad Samachar or News of Berar.

VOL. III AKOLA:— SATURDAY, 5 SUPTEMBER 1868 NO. 36

पुस्तक ३ अकोला, शनिवार तारीख ५ माहे सप्तंबर सन १८६८ अंक ३६.

## वर्गणीदारांस विनंती.

गेल्या वर्षाचे आकटोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें, त्यास या महिनाअखेर वर्ष होतें. तर आगाऊ वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आप आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्यायोगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणाराचे आम्ही उपकार मानूं.

सर्व जुन्या वर्गणीदारांचे हिशेब सन १८६७ चे आकटोबर महिन्यापासूनच आम्ही एथें ठेविले आहेत. त्या मागीलचा इकडे कांहीं संबंध नसल्यामुळें कोणास मागणें होणार नाहीं. व रा० गणेश नारायण कोल्टकर यांचा आमचा संबंध तुटला आहे तरी तारीख २० माहे जून सन १८६८ इसवीचे आंत वऱ्हाड समाचार खात्याबद्दल या चालू वर्षाबद्दलचा पैसा घेऊन आफिसच्या नात्यानें त्यांनीं कोणास पावती दिली असेल तर ती त्यांनीं आम्हाकडे रुजू करावी. म्हणजे तो पैसा त्यांस मजुरा देण्यांत येईल. सर्वांस कळावें.

**खंडेराव बाळाजी फडके.**
**आबाजी खंडेराव वकील.**
व० स० चे मालक.

## रायल एशियाटिक सोसैटीची मुंबईची शाखा.

विलायतेंत रायल एशियाटिक सोसैटी यानावाचें एक मोठें पुस्तकालय आहे. त्याची शाखा मुंबईस सर जेम्स म्याकिंटाश सुप्रिम कोर्टाचे जज्ज होते त्यांणीं स्थापन केली आहे, तिला सुमारें ६० वर्षें झालीं. मुंबईच्या टौन हालाच्या उत्तरेकडील दरवाजानें वर जावें म्हणजे पुढच्या विस्तीर्ण भागांत हें पुस्तकालय आहे. थोड्या दिवसांमागें मुंबईच्या अग्रिहार्टिकल्चरल् सभेविषयीं आम्ही लिहिलें होतें, आज हिजविषयीं लिहितों. याचप्रमाणें जोग्राफिकल सोसैटी, मेकानिकल इन्स्टिटयुशन, वगैरे विद्येचे व शोधाचे महदुपयोगी कारखाने मुंबईस आहेत त्यांची माहिती बाहेर फार थोडी आहे असें दिसतें म्हणून अशा अशा गोष्टींची माहिती मिळविण्याकडे आम्ही प्रस्तुत अधिक लक्ष देत आहों.

या पुस्तकालयांत संस्कृत, मराठी, गुजराथी, आरबी, हिंदुस्थानी, कानडी, इंग्रजी अशा अनेक भाषांतील लहान मोठे मिळून सुमारें एक लक्ष ग्रंथ आहेत. एके खोलींत अनेक जुन्या वस्तूंचा संग्रह आहे. या सोसैटीचा उद्देश एशिया खंडाच्या प्रदेशांतील पुरातन शिलालेख, ताम्रपट, व कलाकौशल्याच्या इतर वस्तु मिळतील त्यांचा संग्रह करण्याचा व त्यावर विच्यार करण्याचा आहे. व जुन्या काळीं भरत खंडांत जे जे शककर्ते व दुसरे राजे झाले त्यांचा शोध लावण्याप्रीत्यर्थ शेंकडो वर्षांमागील नाणीं, शिक्के, मुद्रा यांचाही या सोसैटीकडे बहुत संग्रह आहे. हिला मागें सरकारानें पंचवीस तीस हजार रुपयांची मदत दिली तेणेंकरून अनेक जुन्या लिपींचा शोध लावून त्या अर्थासुद्धां सभेच्या वार्षिक इतिहासांत छापून त्यांचा प्रतिवर्षीं एक ग्रंथ या सोसैटीनें तयार केलेला आहे. त्यांत हिंदुस्थानांतील राजे रजवाडे, देवालयें, पुरातन लिपि इत्यादिकांवर उत्कृष्ठ निबंध आहेत. आलीकडे सुमारें ६ वर्षें डाक्टर बर्डउड साहेब या कारखान्याचे सेक्रटरी आहेत व त्यांनीं आपल्या विद्येच्या, उद्योगीपणाच्या, व सद्गुणाच्या प्रभावानें याची पुष्कळ बढती केली आहे.

गेल्या महिन्याच्या १३वे तारखेस मुंबईस या मंडळीची सभा भरली होती. त्याप्रसंगीं आनरबल न्यूटन साहेब, टकर साहेब गिब्स साहेब, वार्डन साहेब हायकोर्टाचे जज्ज, डाक्टर उइलसन, मे० रीड साहेब, मेकफर्सन साहेब, लौडन साहेब, क्यांडी साहेब, नाईट साहेब, टेलर साहेब, बुलर साहेब, बर्डउड साहेब, आनस्ली साहेब, लीथ साहेब, चापमन सा०, कर्कहाम सा०, हंटर सा०, इत्यादि बहुत साहेब लोक व रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, मि. विनायकराव जगंनाथजी, जव्हेरीलाल उमियाशंकर, भगवानदास पुरुषोत्तमदास, डाक्टर आत्माराम पांडुरंग, नारायण वासुदेवजी, करशेटजी फर्दुनजी पारक, कावसजी माणकजी, दस्तुर जमशेटजी मंचेरजी, नवरोजी फर्दुमजी, बैरामजी नवरोजी इत्यादि नेटिव गृहस्थ जमले होते. व अध्यक्षस्थानीं आनरबल न्यूटन साहेब यांची योजना केली होती. या वेळीं भावनगरचे ठाकुर महाराज, रावळ श्री सर जसवंत शिंगजी साहेब के. सी. एस. आय. यांस व दांगऱ्याचे राजे साहेब सर रणमल शिंगजी के. सी. एस. आय. यांस सभासद केलें. तसेंच मोरवीचे, धरोलचे, व पालीठाण्याचे ठाकुर साहेब यांस व आनरबल श्रीनिवासरावजी राव साहेब पंत प्रतिनिधी, जुनागडच्या नवाब साहेबांचे दिवाण गोकुळजी संपतराम, नवानगरच्या जामचे दिवाण भगवानजी करमसी, भावनगरचे दिवाण गौरिशंकर उमिया शंकर, गोंदळच्या ठाकरांचे दिवाण जयशंकर लालशंकर, कृष्णाजी लक्ष्मण, काटेवाडचे एकस्ट्रा असिस्टंट पोलिटिकल एजंट, व जगंनाथ सिताराम काठे० पोलि० ए० चे हेड शिरस्तेदार यांस व दुसऱ्या ५ | ६ युरोपियन गृहस्थांस या सभेचे मेंबर केलें. नंतर पुस्तकालयाला व वस्तुसंग्रहाला बक्षिसें आलीं त्यांची यादी वाचिली. मग डा० उइलसन साहेबांनीं थिओडोर राजाचें एक पत्र, दोन पुस्तकें, व एक ताम्रपट दाखविला. नंतर डा० बर्डउड साहेबांनीं राजीनामा दिला त्या संबंधानें कांहीं ठराव झाले. त्यावेळीं आनरबल न्यूटन साहेबांनीं विस्तारयुक्त अशा प्रकारचें एक मोठें संभाषण केलें त्यांत डा० बर्डउड साहेबांचा फार गौरव केला आहे. व मि० टेलर साहेब व डाक्टर उइलसन साहेब आणि रावसाहेब मंडलिक यांनींही त्यांस अनुसरून थोडथोडीं भाषणें केलीं. नंतर बर्डउड साहेबांनीं त्यावर उत्तर दिलें. व मग सभाविसर्जन झालें.

आनरबल न्यूटन साहेब म्हणाले कीं सन १८६२ चे जून महिन्यांत बर्डउड साहेब या सोसैटीचे सेक्रटरी झाले. या सहा वर्षांतील कामाचा व यामागील इतक्याच वर्षांतील कामाचा सुमार पाहिला त्यावरून समजला तो प्रकार असा — बर्डउड साहेबांचे पूर्वील सहा वर्षांत १८९६ पुस्तकांची खरेदी झाली होती व यांचे कारकीर्दीत ६२०० ची झाली. मागील काळांत मेंबर लोक मुंबई शहरांतील ७० व बाहेरील २९ मिळून ९९ नवीन झाले होते व यांचे वेळीं २६२ शहरांतील व ७७ बाहेरील मिळून ३३९ मेंबर नवे झाले. सन १८६१ अखेरचा हिशेब पाहतां जमा १०५६८ रुपये, खर्च ५३२८ रुपये व शिलक ५२४० रुपये होती. यांचे कारकीर्दींतील मुदतीत सालचा हिशेब पाहतां जमा ३४४८९ रुपये, खर्च २३३९१ रुपये व शिलक ११०९८ रुपये राहिली. बर्डउड साहेबांच्या वजनदारीनें व प्रयत्नानें या सोसैटीस दुसरें ही बहुत प्रकारचें सहाय मिळालें. सन १८६४ सालीं सरकारानें या सोसैटीस साधारण खर्चाकरितां दरमहा ३०० रुपये देण्याचा ठराव केला. याच वर्षांत मिस्तर कावसजी जहांगीर यांनीं तऱ्हेतऱ्हेचीं नाणीं खरेदी करण्याकरितां व तीं उत्तम प्रकारें मांडून ठेवण्याच्या साधनाकरितां ८००० रुपये व ओरियेंटल लिटरेचर म्हणजे या पूर्वदेशाच्या विद्याविषयावरील ग्रंथ खरेदी करण्याकरितां ५००० रुपये दिले. मि. प्रेमचंद रायचंद यांनीं सदरहू पुस्तकें ठेवण्याची सोय करण्याकरितां १०००० रुपये दिले. कैलासवासी जगंनाथ शंकरशेट यांनीं न्याचरल हिस्टरी संबंधीं ग्रंथांकरितां ५००० रुपये दिले. हें सोसैटीचें सर्व भाग्य बर्डउड साहेबांच्या प्रयत्नजन्य आहे. यांनीं सन १८६३ सालीं ग्रंथांच्या फेरिस्ताचें प्रतवार व अक्षरानुक्रमवार पुस्तक केलें व त्यांनंतर दरवर्षास नव्या पुस्तकांच्या पुरवणी यादी केल्या. तशींच नंबर २२।२३ २४ व २६ हीं सोसैटीचीं वार्षिक पुस्तकें यांनीं तयार केलीं, व यांत यांचे स्वतांचे कित्येक उत्तम निबंध आहेत. नेटिव संस्थानिकांच्या मनांत या सोसैटीचें महत्व बर्डउड साहेबांनींच भरवून दिलें, व बहुत संस्थानिक आणि त्यांतील बडे लोक सोसैटीचे मेंबर केले. आजच प्रसंगीं काठेवाडांतील संस्थानिक व त्यांचे कामदार मेंबर झाले आहेत ही देखील त्यांचीच कृति होय. मागें अर्स्किन साहेब, व्यान्स साहेब, केनडी साहेब, मालकमसन साहेब आणि कार्टर साहेब या सोसैटीचे आनररी सेक्रटरी विख्यात होऊन गेले, त्यांतीलच बर्डउड साहेबांची कोटि आहे.

याच धोरणावर बाकी गृहस्थांचीं भाषणें झाल्यावर बर्डउड साहेब स्वतां उठून बराच वेळ बोलले. त्यांनीं असें सांगितलें कीं मी जी सोसैटीची सेवाचाकरी केली ती केवळ अल्प होय, व तिजबद्दल आपण जो मला बहुमान दिला तो आपला थोरपणा होय. मी सोसैटीचें काम काळजीनें खरें केलें व त्यांत मला आपल्यांतील कित्येक माझ्या मित्रांनीं मदत केली, तेणेंकरून त्या अल्प सेवेचें मोठें फल झालें हें पाहून मला फार संतोष वाटतो. या सोसैटींत नेटिव सद्गृहस्थ अधिक असले तर हिचें काम अधिक चांगलें चालेल असें मला वाटलें. युरोपियन मेंबर हमेष येणारे व जाणारे त्यामुळें त्यांची वर्गणी सुमारें ५० रुपये प्रमाणें ५ वर्षे येणारी म्हणून मी नेटिव मेंबर वाढतील ही तजवीज केली. मी सेक्रटरी झालों त्यावेळीं नेटिव लाइफ मेंबर सारे ५।६ होते (लाइफ मेंबर म्हणजे दरसाल १०० रुपये वर्गणी ताहयात ज्यांस द्यावी लागते.) ते हल्लीं १०० लाइफ मेंबर झाले आहेत. ईश्वर त्यांस दीर्घायुष्य देवो.

## वऱ्हाडांतील पोस्ट आफिसें.

वऱ्हाड प्रांतांत इंग्लिश सरकारचा अंमल होऊन थोडीं वर्षें झालीं म्हणून यांत उत्तम प्रकारची सुधारणा सर्व खात्यांत झाली नसल्याबद्दल विशेष टपका देववत नाहीं; परंतु सर्व अवल इंग्रजीप्रमाणें आणि गैरव्यवस्था मोगलाईप्रमाणें ज्या खात्यांत चालल्याचें दिसतें त्याखात्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांस तें मोठें लांछन आहे असें आम्ही म्हणतों; आणि ती गोष्ट टपाल खात्यास सर्वांशीं लागू आहे सबब अधिकाऱ्यांनीं त्याकामीं चांगलें मन घालावें असें त्यांस आग्रहानें सांगतों.

वऱ्हाड प्रांतांत पोस्ट आफिसें उत्पन्नाच्या मानानें बरींच आहेत परंतु त्यांतून काम फार ढिलेपणानें चालतें. ५ कोसावरचें पत्र पोंचण्यास फार त्वरा म्हणजे पांच दिवस लागतात. पुष्कळांचे तोंडून आम्ही असें ऐकिलें आहे कीं कित्येक पोस्टमास्तर लोक दोन दोन दिवस लखोट्याच्या पेट्या उघडीत नाहींत. व आलेल्या पत्रांची दोन दोन दिवस डिलिव्हरी करीत नाहींत. हें पाहून डिलिव्हरी प्यून तर त्यांहून हुशार, ते खुषीस येईल तितके दिवस पाहिजे त्याचे पत्र आपले तोसदानांत ठेवितात. ही गोष्ट जिल्ह्याचे हुजूर ठिकाणीं कमी घडत असेल, परंतु बाहेर घडत असावीच असा बहुत बोभाटयावरून आमचा ग्रह होतो. वर्तमान पत्राविषयीं लोकांस व आमच्या मेहेरबान टपाल खातेवाल्यांस ठाऊक असावें कीं तें वक्तशीर पोंचण्यावरच त्यांचें मोल असतें. व तें उशिरानें मिळूं लागलें म्हणजे त्याचा उपयोग कमी व अनास्था फार होते. कल्पना करा कीं आमच्या वऱ्हाडांतील कित्येक पोस्ट मास्तरांनीं दहा कोसा वरील इसमाचें वर्तमानपत्र दहा दिवसांनीं त्यास पोंचविलें तर तो इसम इतकेंच म्हणेल कीं इकडील टपालवाले मंद चालतात. व नुसतें इतकेंच म्हणून राहण्यास त्याचें वर्तमानपत्र निघाल्या दिवसापासून प्रति दहावे दिवशीं त्यास मिळत गेलें पाहिजे. परंतु इकडील टपालचें तसें नाहीं. कधीं दहावे दिवशीं, कधीं १५ दिवसांनीं दोन, व कधीं पाउण महिन्यानें तीन आठवड्याचीं वर्तमानपत्रें एकदम पोचविलीं जातात. ही भालेरायी मोठी त्रासकारक होय. व मग टपालचें प्रमाण तरी काय समजावें? व लोकांनीं त्यावर विश्वासून तरी कसें राहवें? सहा हजार कोसावरून विलायतेची डाक नेमानें पाउण महिन्यांत येते व एथून दहा कोसावर पत्र जाण्यासही पाउण महिना लागतो, तेव्हां मुदतीच्या दृष्टीनें पाहिलें तर विलायतेच्या टपालच्या तोंडीचें हें टपाल

खरें व लांबीच्या पल्यानेंही पाहिलें तर संख्येस कमी नाहीं. दहा कोस म्हटलें म्हणजे झपदिशीं तोंडीं येतात पण टपालवाल्यास ओझें काखोटीस मारून एकटें ओढ्याखोढ्यांतून व घाटालवणांतून पायीं धांवत किती लांब जावें लागतें म्हणाल तर सुमार ३५००० यार्ड. मग संख्या कोणती अधिक? आणखी विलायतच्या आगबोटवाल्यांचे यांच्या सारखे हाल नाहींत. त्यांस ओझें आंगावर घ्यावें लागत नाहीं. पायीं चालावें लागत नाहीं, पाण्यांत बोट घालून दिली कीं वाफेनें व वाऱ्यानें झुळदिशीं घसरत घसरत येते. तेव्हां विलायतेच्या डाकेची प्रतिष्ठा कशास पाहिजे? आमच्याच डाकवाल्यांची मेहनत अधिक असें वरिष्ठ अधिकारी मनांत वागवून व घरजावयाप्रमाणें त्यांस राखून गोंजारून गोंजारून लाडी गोडीनें त्यांपासून कामें घेत असतील तर ते आपले घरीं बाजिराव आहेत असें आम्ही म्हणतों. व असें खरें असेल तर वरिष्ठांच्या वरिष्ठांनीं ही आपल्या खात्याची गैरअब्रू व लाज दूर करावी अशी आम्हीं त्यांस शिफारस करितों.

सुधारलेल्या देशाची व लोकांची गोष्ट वेगळी असो, पण इकडे जरूरी खेरीज कोणी टपालांत पत्र फारसें घालीत नाहीं. लोकांची सलामालकीचीं पत्रें आल्या गेल्या बरोबर जातात व निरोपानिरोपी त्यांचें टपाल चालतें. तेव्हां सरकारी टपालाशीं जो त्यांचा संबंध आहे तो जरूरीकरितां विशेष आहे. व वर्तमानपत्रें तर टपाल खात्यावरच अवलंबून असतात. म्हणजे सरकारचे टपाल खात्याचे त्वरेची आशा नसती तर कोणी छापखानेवाला वर्तमानपत्र न काढता. दोन दोनशें कोसांवर आपलीं घरें दारें व बायका मुलें टाकून पोटासाठीं बहुत लोक या प्रांतीं येऊन कुग्रामांतून काळे पाण्यावर नेऊन टाकिल्या सारखे राहिलेले आहेत ते वर्तमानपत्राकरितां, घरच्या पत्राकरितां, व स्नेह्यांच्या पत्राकरितां पाखराप्रमाणें वाट पाहात बसतात त्यांच्या, हे टपाल मास्तर लोक आपल्या भालेरायी वागणुकीनें, केवळ माना कापिल्या सारखें बहुत पुण्य मिळवितात. अस्तु. दुकाळांत तेरावा महिना याप्रमाणें मुंबई इलाख्याच्या वहिवाटीसारखीं कित्येक स्कुलमास्तर लोकांकडे पुरवणी पोस्ट आफिसेंही सरकारानें इकडे केलीं आहेत, परंतु उत्तम व्यवस्थेच्या नावानें अजून शून्य आहे. याजकरितां या गोष्टीचा विच्यार अवश्य व लवकर झाला पाहिजे.

याशिवाय इकडे एक दुसरी अडचण पाहिली कीं तालुक्यांतील पाहिजे त्या गावीं पत्रें रजिष्टर केलेलींही जात नाहींत. पोस्टमास्तर शेरा देतात कीं "सदर्हू ठिकाणीं टपाल जाण्यास मार्ग नाहीं." आणि असें जर आहे तर मग सरकारानें नवीन व्यवस्था केली ती काय? सरकारानें व्हिलेज मेसेंजर सर्व ठिकाणीं ठेविले नसले तर ठेवावे. व तसें होईपर्यंत पोलिस कानस्टेबल मार्फत पत्रें जाण्याची पूर्वीं वहिवाट होती ती चांगल्यारितीनें जारी करावी. रजिस्टर केलेल्या पत्रास इंग्लिश मुलखांत जाण्यास मार्ग नसणें हें क्षेत्रांत मुंडण होत नसल्याप्रमाणें अवघड दिसतें. अस्तु. विस्तार झाला म्हणून आज पुरें करितों.

### *AKOLA BRIDGE.*

WE are extremely sorry to have to return to the subject of bridge concerning which, we hear, no word of any movement. A difficulty which is felt by one is not felt by another. Such is precisely the case with us. The whole populace of this town, who are anxiously looking for the construction of a bridge over the Morna river at Akola, feel very great difficulty in crossing the river especially when it is flooded. The other day when there was a mighty flood, and there seemed nothing but one uniform sheet of water all round the town; and in this state of matters while cholera, the perennial foe of mankind, was raging about and committing great havoc we possibly could not get to the other side of the river and secure the attendance of doctor Porter who is on his tiptoe to attend any patient attacked by the epidemic and render him any aid that laid in his power; but alas! what could be done, there is no such a thing in existence as a bridge and the consequence is that persons, who had taken cholera, died in a few hours without timely and proper medical aid. If there was a bridge at this juncture, there was every probability of securing the attendance of the medical officer and saving the valuable souls that fell victim to the epidemic. We all feel it overwhelmingly and lament the catastrophe that befell the community which might have been avoided if the contemplated bridge was in existence. Some fortnight ago when we in company with our friends were trying to ford the river, we were carried down a few yards by the force of the current away from the centre, and had it not been for the help hand that was stretched to us in time by a diver that happened to be there, we might have rolled along and swept away leaving our families weeping and in forlorn condition. Is not this account brief as it is sufficient to meltany adamantine heart? Though such is the miserable state in which we are situated at present yet our authorities would connive at it and think lightly of it. In a thoroughly regulated town like Bombay if the necessity of a bridge was pointed out as prominently as we did on two distinct occasions, we would have been heard and our wants would have been promptly supplied. We would once more entreat our local authorities to direct their attention to the most important matter, namely bridge, and to make speedy arrangements for the construction of the same.

### OUR MANUS IN THE LEGISLATIVE COUNCIL.

CONSIDERABLE dissatisfaction now prevails among the mass of the native population of this Presidency, with reference to the several appointments of native members recently made by Government to our *Corps Legislatif.* Nor is the dissatisfaction at all ungrounded for, apart from the inadequacy and invidiousness of the present representation, which we took occasion to point out in our impression of the 1st August last, we find there is a questlon of a far higher importance involved in these nominations, viz., the question of *qualification.* As we understand it, the object of Government in allowing Natives seats in the Legislative Council can only be that the native members should impart to it the benefit of their most useful and valuable experience as regards the wants and habits of the indigenous people of the country, and thus preclude it from passing any legislative measure that may prove, however remotely, inimical to the well-being of the people. In fact, these native members are to act as the *mentors* of our Government. They may hope at least to direct its power, if not actually to control it, in the interest of the people. Every candid reasoner will admit that the popularity and consequent stability of an empire is always commensurate with the extent to wich the laws of that empire are made to suit the condition and requirements of the people over whom it is established. It is, therefore, a *sine qua non* that a Government which may be desirous of strengthening and perpetuating its dominion, should adopt means for keeping itself *au courant* of the requirements of its people. Again, it seems to be the most important mark of the true principles of Government, that the people should be permitted to have a hand in the framing of those laws which they are called upon to obey. By a hand, we mean a hand, of course, through representatives. Whether, therefore, we consider the principle of elevating natives to seats in the Legislative Council in reference to the interests of a State, or in that to the rights and privileges of its people, invariably arrive at the same conclusion, that it is a most salutary and equitable one; and the policy of our Rulers in having recognised it, must be considered most commendable in consequence. But the mere recognition of any good principle by an individual is not enough for the purpose of enabling him to reap the enjoyment of the advantages, which promise to accrue from it—to their entirety. This must depend upon the manner in which the principle is sought to be worked out; and it often happens that though a thing may be good in itself, yet it defeats its own ends and proves obnoxious for want of proper discretion in the carrying out of it. In the particular case of our Native Legislators, it will be noticed that the very circumstance of their being calle upon to advise, pre-supposes that they should possess the capacity for advising. They should be men who have fully studied the habits and ascertained the requirements of their countrymen; whose minds are illumined by education so as to raise them above vulgar prejudices; who have a thorough knowledge of the law; and, lastly, who possess some independence about them to enable them to speak out the honest convictions of their minds in a bold and fearless manner. Natives of this stamp and stuff alone could be qualified for being advisers of our Government; and it is the interest of Government itself, not less than its duty, to appoint members of the Council only from this class of Natives. When, however, we apply this test to our present legislators, we cannot help remarking that none of them possesses the qualifications we have described. As a writer lately observed, they are fit only to form the members of a "Dumb Council." The present Council is more ornate than useful in its constitution, in reference to its Native members. We are aware that the Hon'ble Mr. Mungaldass Nathubhai has some little pretensions to a seat in it, but he is not wholly competent for it. Nor is there a lack of proper men at the present time to justify this state of things. Thanks to the Educational Department, Bombay can easily point out men at least by units, if not by tens, who can fill the office both with dignity and credit. We have already annouuced the names of some of these men on a former occasion, who are perfectly eligible for the appointment and who are decidedly superior to those who now sit in the Council. But we regret to remark that Government is not yet awakened to a sense of its own interest and duty so as to make amends for its blunders. We would respectfully submit for its consideration whether it has, by persisting in its present anomalous course, proved true to itself, or consulted the well-being of its State?

In our next, we hope to consider the relative worth of riches and of education in reference to a Native member of the Legislative Council.

*Hindu Reformer.*

## वऱ्हाड.

असें समजलें आहे कीं, इलिचपुराहून स्प्यानस्की साहेब डिपुटी कमिशनर यांनीं एक ताम्रपट तिकडे मिळाला तो मुंबईस रायल एशियाटिक सोसैटीकडे पाठविला.

✓ उमरावतीस गोविंद सखाराम चीफ कानस्टेबल यास पोलिसापैकींच केशव यादव व दुसरे कांहीं लोक मिळून ठार मारणार होते असा एक खटला चालू आहे. रांडेसंबंधी त्यांच्यांत कांहीं आदावत होती अशी गुणगुण आहे.

रा. बजाबा रामचंद्र प्रधान यांस इकडे डिपुटी इन्स्पेक्टर नेमिल्याविषयीं नेटिव ओपिनियनमध्यें लिहिलें आहे, परंतु ती नेमणूक इतक्यांत अमलांत येणार आहे असें दिसत नाहीं. अजून अवकाश आहे.

वाशिमचे मास्तर व शास्त्री यांमध्यें वाद लागल्याचें मागें लिहिलें होतें. हल्लीं शास्त्री यांस बडतर्फ केल्याचें कळतें.

नागपुराहून पुरुषोत्तम राव भट यांस हैदराबादेस असिस्टंट रेसिडंटकडे शिरस्तेदार नेमिल्याविषयीं हैदराबादचे खासगी पत्रावरून समजतें.

उमरावतीस जुगाराचा आक्ट लागु केला.

मे० अलार्डाइस सा० कमिशनर यांस २ वर्षांची रजा मिळाली. असें मुं० ग्या० वरून कळतें.

खामगांवचे जुडिशियाल एकस्त्रा आसिस्टंट कमिशनरचें कोर्ट मलकापुरास नेण्याचा सरकारचा ठराव झाला.

मेहेकर जिल्ह्यांत महामारीचा वाखा सुरू आहे.

गुजराथेंतील मि. वोडहौस यांस वऱ्हाडांत तिसरे क्लासचे अकटिंग कमिशनर नेमिलें.

आकोल्याचे पोस्ट अफिसांत लाखोटा फुटला किंवा चोरीस गेला अशा संबंधानें कांहीं गडबड झाली होती, व झाडे वगैरे झाले. त्याविषयीं चांगली माहिती अजून समजली नाहीं.

मुंबईहून रेल्वे फर्स्ट क्लासांतून एक ग्रहस्था विगतपुरीस उतरला व त्याची १०० रुपयांची पिशवी चुकून गाडींत राहिली तिजविषयीं त्यागाडींत एक युरोपियन थोर ग्रहस्थ बसला होता त्यानें येथील स्टेशनावर वर्दी दिली. तेव्हां स्टेशन मास्तरांनीं मागील सर्व स्टेशनावर तारायंत्रांतून कळविलें. तेव्हां मालक मिळाला व त्याचे रुपये पोंचले. यांत वर्दी सांगणाराचा प्रमाणीकपणा वर्णनीय होय.

महामारीचा उपद्रव कमीं झाला आहे.

## वर्तमासार.

हिंदुस्थान सरकारानें गेल्या जून महिन्यांत ईस्ट इंडियन इरिगेशन कंपनीला दोन लक्ष रु. अडव्हान्स देण्याचें सांगशन केलें. तीगोष्ट स्टेट सेक्रटरीला मानवली नाहीं. त्यांनीं ठराव केला आहे कीं आम्हांकडे कळविल्या खेरीज असें सांगशन करीत जाऊ नये.

लार्ड मेयो हेच हिंदुस्थानास गवरनर जनरल होतील असें विलायतेकडील अधिकाधिक वर्तमानावरून कळतें.

पंजाबात गेल्या जून महिन्यांत २५६२४ मनुष्यें मरण पावलीं. गेल्या वर्षांत याच महिन्यांत ३०२६९ मरण पावलीं होतीं.

झांजीबारचा सुलतान हिंदुस्थान सरकारचे मध्यस्थीस आतां कबूल झाला. व आपला पुतण्या मस्कातचा सुलतान याःच्या नेमणुकेची मागील राहिलेली बाकी देण्याकरितां मुंबईचे खजिन्यांत त्यानें १,६८००० रुपये भरले.

ब्रम्हदेशांत गवरनर जनरलचे पोलिटिकल एजंट आहेत त्यांस पगार १५०० रुपये होता तो २००० केला.

पुण्यास महामारीचा थोडा उपद्रव झाल्याचें अबझरवरावरून कळतें.

मांचेस्तर शहरांत एके ठिकाणीं गायन समारंभ चालला असतां आग लागल्याचा

पुकारा झाला. तेव्हां लोक उठण्याची जी धांदल झाली तींत २५ मनुष्यें मेलीं.

गेल्या महिन्याचे २०वे तारखेस मुलतानास व लाहोरास धरणीकंपाचा थोडा अनुभव झाला.

तारायंत्रांतील बातमीचा सर्व हिंदुस्थानांत एक दर होण्याचें वर्तमान आहे; त्याप्रमाणें आक्टोबरचे पहिले तारखेपासून वहिवाट सुरू होणार असें समजतें. व तो दर १० शब्दांस एक रुपया होणार.

मस्कतचे सुलतानाचा चुलता सयद तुर्की यास पुतण्याकडून दरमहा ६०० डालरांची नेमणूक आहे ती खर्चास पुरत नाहीं सबब वाढवावी याबाबें इंग्लिश सरकारास त्यानें अर्ज केला आहे. सरकार त्या कामांत हात घालीत नाहीं; कारण यानें इतकी नेमणूक आपणास बस आहे असा करारनामा लिहून दिलेला आहे.

हिंदुस्थान सरकारच्या लष्करी सेक्रटरीच्या जागेवर कर्नल ब्रूम यांस आफिशियेटिंग नेमिलें.

थिओडोर राजाचा मुलगा विलायतेस नेला आहे त्याजकडून हिंदुस्थानांतील सिविल सर्वासच्या लायकीचा अभ्यास करवित आहेत.

गुजराथेंत पूर आल्याच्या योगानें बहुत लोकांचीं घरें दारें वाहून गेलीं व अन्नास मोताद झाले त्यांकरितां मुंबईस शेटसावकार लोकांनीं वर्गणी जमविली. व ६०००० रुपये अमदाबादचे कलेक्टराकडे पाठवून दिले व आणखी सुमार १४००० रुपये जमले आहेत व अजून जमत आहेत.

सोलापुरापुढें हैदराबादेकडे रेलवे करण्याचें काम सुरू आहे तें फारच थंड चालतें. व अशाच प्रकारें चालेल तर २० वर्षांनींही हैदराबादेस रेलवे पोंचण्याचें कठिण दिसतें.

पुण्यास लोकोपयोगी कामाकरितां वर्षास जिल्ह्या निहायचे कलेक्टर व इंजनेर जमून ठराव होत असतात त्याप्रमाणें साल मजकुरीं या महिन्याचे १९ वें तारखेचे सुमारास मंडळी जमेल.

अंबाल्याची रेलवे गवरनर जनरल साहेब आक्टोबरचे २८ वे तारखेस सुरू करणार. तेव्हां पतियाळ, झिंद, व नभा एथील राजे व दुसरे संस्थानिक यांस समारंभास बोलाविणार आहेत.

मध्यम प्रतीच्या इंग्लिश लोकांचीं मुलें सिविल सर्विस हिंदुस्थानची, तशीच विलायतची व इतर प्रतिष्ठित धंदा करण्याचे कामांत तयार होण्याकरितां हिंदुस्थानांत एक कालेज असावें असा त्यांच्या आपसांत विचार चालला आहे. व कलकत्ता, मुंबई वगैरे ठिकाणीं त्यांनीं सबकमिट्या नेमिल्या आहेत. यां कालेजांत एका मुलास वर्षास साडेपांचशें रुपये खर्च येईल असा सुमार आहे.

डाकटर बर्डउड साहेब आजारी पणामुळें रजा घेऊन विलायतेस गेले.

गवरनर जनरल साहेबांची स्वारी नोवेंबर अखेरीस कलकत्त्यास जाणार.

ग्वालेरचे शिंदे सरकारची प्रकृति अत्यावस्थ बिघडली होती व ती आतां कांहीं बरी आहे. असें डेलिन्यूस पत्रावरून कळतें.

म्हैसुर दरबारच्या कामदारांनीं सरकारास अर्ज केला होता कीं दसऱ्याचे मुहूर्तानें आमचे छोटे महाराजांस गादीवर बसविण्याचा समारंभ आम्हांस करूं द्यावा. हिंदु०सरकारानें सांगितलें कीं महाराज आपले वयांत येईतपर्यंत, व राज्य करण्यास लायक ठरत पर्यंत, व कोणत्याप्रकारें त्यांनीं राज्यकारभार चालवावयाचा तें ठरे पर्यंत तुमचा अर्ज मनास आणितां येत नाहीं.

संबलपुर परगण्यांतील बायऱ्याचा राजा इंग्रज सरकारचे स्वाधीन झाला. त्यानें आपली स्वतंत्रता सोडून इंग्रजांचे तांबदारींत रहाण्याचें पतकरलें. त्याचें कारण त्याचे राज्यांत बंडाची कांहीं गडबड झाली होती. सरकारानें पोलिसची फौज पाठवून कांहीं दिघडा बिघड न होऊं देतां सर्व बंदोबस्त केला.

राणी साहेबांचे चिरंजीव ड्यूक आफ एडिंबरा हिंदुस्थानांत खचित येणार असें आतां वर्तमान आलें आहे. ते केप आफ गुड होपावरून मुंबईस येतील. आणि मग गवरनर जनरल साहेबांबरोबर इतर ठिकाणीं फिरतील, असें मुंबईच्या ग्याझेटावरून कळतें. व लखनौ टाइम्समध्यें लिहिलें आहे कीं नोवेंबरच्या १९ वे तारखेच्या सुमारास ते लखनौस येतील व त्यांचा तेथें एक मुक्काम होईल.

## Correspondence.

### बाहेरून आलेलें पत्र.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. देशांतील भोळे लोक, अज्ञानी स्त्रिया, व अशिक्षित मुलें बाळें यांचे मनावर भोंदू म्हणजे पोटभरू साधूंचे उपदेशाचा ठसा कसा उठतो व त्यापासून तादृश काय परिणाम होतात ते आपले सुंदर पत्रद्वारें सर्वांचे नजरेस आणावे ह्या हेतूनें हें पत्र लिहिण्यास कलम धरलें आहे.

आपल्यास कदाचित माहित असेल कीं या अकोल्यांत बाळनाथ बुवा म्हणून एक साधु आले आहेत हे मेहेकरचे रहाणार आहेत यांस येथें आल्यास सुमार एक महिना झाला. यादरम्यान हे कांहीं दिवस उमरावतीस गेले होते तेथें अनेक लोकांचीं संकटें निवारण करून त्यांस यानीं आपले भजनीं लाविलें अनुग्रह घेणारांपैकीं एक दोन इंग्रजी शिकलेले ज्यांस व्यवहार ज्ञान व नीति बरीच माहित आहे असे आहेत; तेव्हां असे असे विद्वान, चतुर व चिकित्सक लोक या साधूचे नादीं लागले पाहून अनेक लोकांस वाटूं लागलें कीं हे साधु मोठे पुण्यवान व ईश्वराचा अवतार असावे, अशी एकंदर कीर्ति होऊं लागल्यामुळें अकोल्यांत बायका पोरांची बुवाभोंवती रात्रंदिवस दाटी होऊन राहिली आहे. बुवास घटकाभर डोळा लावण्यासही फुरसत पडत नाहीं तरी बुवा मंडळीस दर्शन देण्यास कंटाळा करित नाहींत. असें बुवाचें वैभव पाहून व अकोल्यांतील कितिएकांस त्यांचा दाखला आल्यावरून मी एकदिवस बुवाचे दर्शनास गेलों तों सकृद्दर्शनीं बुवा दिवसास बारावर च्यार वाजतां निजले होते. संध्याकाळचे वेळेस अगदीं आळशी गैदी मनुष्यसही निजावें असें वाटणार नाहीं. तो खेळण्यामध्यें व बाहेर फिरून बाजारांतील मौज पहाण्यामध्यें आनंद मानतो, पण हे बुवा पाहिले तर सुस्त निजले होते. पण इतक्यांत दत्तानें बुवास उठवून आम्हा बाळगोपाळांस दर्शन देण्याविषीं सुचविल्यावरून दत्त इच्छेनें बुवा उठून बाहेर येऊन गालिच्यावर बसले. बुवाचें दर्शन होतांच मला असें वाटलें कीं बुवा ते दुसरे कोणीं असवित. हे कोणी तरी गायकवाड सरकारचे पदरच्यांसारखे सरदार दिसतात. कारण ते शरिरानें धष्टपुष्ट होते. व कानांत सुशोभित कुडक्या, हातांत सोन्याची सुंदर पोंची, नागपुरी रेशिमकांठी धोतरजोडा नेसलेले, व स्मश्रू करून चेहरा उत्तमप्रकारें तेजःपुंज केलेला पाहून हे कोणी सरदार असावे असें भासण्याचा संभव आहे पण संभाषण सुरू झाल्यावर सदर्हू गृहस्थ कोण असावे याविषयीं मला फार संशय पडूं लागला. बुवा म्हणावे तर चैनी दिसतात. सरदार म्हणावे तर खेड्यांतील धनगराप्रमाणें सुरस संभाषण करतात, वैदिक, पारायणी ब्राम्हण म्हणावे तर हे संभाषणाचे प्रारंभींच बोलले कीं आम्हांस केशव. माधवसुद्धां संध्येंतील नांवें बरोबर येत नाहींत. गोसावी म्हणावे तर ते बोलले कीं आम्ही लिंगार्चन करित असतों. असो पण थोडेसे संभाषण झाल्यावर हेच बुवा आहेत असें समजलें. बुवांनीं जमलेल्या मंडळीस आरंभी उपदेश केला तो बुवांचा बुवांसच समजला. बुवांचे मताची शाबिती व्हावी व आम्ही त्यांचा अनुग्रह घ्यावा अशा हेतूनें त्यांनीं जे दृष्टांत दिले ते मुलांच्या चिमणी आणि कावळा यांच्या गोष्टीपेक्षांही कमी महत्वाचे होते. "चिमणीचें घर होतें मेणाचें आणि कावळ्याचें शेणाचें" हे शब्द ऐकिल्यापासून मुलांस आनंद होतो पण मंडळीस बुवांनीं राजाची श्रद्धा त्याचे पायांतील जोड्यावर बसली याविषयीं गोष्ट सांगितली तीपासून कोणास संतोष न वाटतां उलटें बुवांची गोष्ट लवकर संपेल तर बरें होईल असें वाटूं लागलें होतें. त्याचप्रमाणें त्यांनीं एक सतीची गोष्ट सांगितली तीतही कांहीं अर्थ नसल्यावरून मग तर फारच कंटाळा आला. बुवांनीं दोन गोष्टी सांगितल्या त्या थोडक्यांत वाचकांचे विचारापुढें ठवितों.

पहिली गोष्ट राजानें प्रधानास विचारलें कीं, भाव मोठा किंवा ईश्वर मोठा? यावर भाव मोठा असें प्रधानानें उत्तर देऊन ह्या गोष्टीचा राजास दृष्टांत यावा म्हणून राजाचे पायांतील जोड्यास शेंदुर लावून गावापासून कोस दीडकोसावर लहानसें देउळ करून त्यांत ठेविला. पुढें लोक त्यास नवस करूं लागले व अनेक लोकांस तो नवसास पावल्यामुळें खेटर देवाचें माहात्म फारच वाढत गेलें व नवसाबद्दल पुष्कळ पैसा मिळून दरवर्षास मोठी यात्रा भरूं लागली. असें देवाचें महात्म ऐकून राजानें त्यास पुत्रप्राप्तीविषयीं नवस केला व त्याप्रमाणें पुत्र झाला. मग राजा मोठ्या आनंदानें पुत्रासहवर्तमान नवस फेडण्यास त्या देवाजवळ गेला तेव्हां प्रधानानें त्या देवाचा शेंदुर काढून आंतील राजे साहेबांचा खेटर त्यांस दाखवीला तेव्हां देवापेक्षांही भाव खरा अशी त्यांची खात्री झाली.

दुसरी सतीची गोष्ट अशी सांगितली कीं एके गावांत एक स्त्री नवऱ्याबरोबर सती जात असतां गावावर लुटारू आले. व त्यांतील मुख्य सरदार मुसलमान होता त्यानें त्या स्त्रीस पाहून व भुलून मेण्यांत घालून बरोबर नेली. इकडे धामधूम शांत झाल्यावर लोक पळून गेले होते ते परत आले व बाई सती गेली अशी त्यांनीं कल्पना केली. पुढें सती नवसास पावूं लागली. व तिचें मोठें प्रस्थ माजलें. एक ब्राम्हण सतीला नवस बोलून देशांतर करावयास गेला तो ज्या गांवीं ती सती जाणारी बाई पकडून नेली होती तेथें गेला. रस्त्यानें जातअसतां बाईनें खिडकींतून त्यास ओळखिलें व जवळ बोलाविलें. व त्याच्या तोंडून सतीच्या नवसाचा वगैरे कडकाडित प्रभाव ऐकून सांगितलें कीं तीच मी होय. दंग्याचे गडबडींत मला सती न जाऊं देतां या मुसलमानानें आणिलें व त्याच्यापासून आतां मला मुलें झालीं आहेत. तथापि ही गोष्ट तूं आपले गावीं सांगूं नको. असें म्हणून त्यास पुष्कळ द्रव्य दिलें व मार्गस्थ केलें. गावीं गेल्यावर त्याची श्रद्धा अगदीं उडाली व तो सतीचे नेम मोडूं लागला व गावांत सतीची खरी गोष्ट लोकांस सांगावी असें त्याचे मनांत आलें तों त्याची वाचा बसली व डोळे गेले. तेव्हां त्यानें सतीला फिरून नवस केला व मग तो नीट झाला. व त्यानें सती जिवंत असून मुसलमानीण झाल्याची गोष्ट लोकांस सांगितली नाहीं. याप्रमाणें सतीची साक्षा आणि लोकांचा भाव कायम राहिला. पत्रकर्तेमहाराज, आपल्या लोकांच्या स्त्रिया अजून सुधारल्या नसल्यामुळें व वऱ्हाडांतील तीन हिस्से लोक अज्ञानानें व देव भोळेपणानें पिडले असल्यामुळें त्यांस बुवांच्या लटपटी समजत नाहींत. व बुवा आपल्या स्वहितासाठीं जें जें सांगतात तें सर्व सत्य आहे असें समजून तदनरूप वर्तणूक करण्यास प्रवृत्त होतात. येणेंकरून त्यांचे द्रव्याची व कीर्तीची हानी होते ही गोष्ट त्याचे अगदीं लक्षांत येत नाहीं.

सदरील गोष्टीवरूनच आम्हांस एकदम बुवांची साधुगिरी असत्य वाटली असें नाहीं, तर त्यास आणखीही एक चांगलें सबळ कारण झालें. तें असें कीं गेले सोमवारीं रात्रीं बुवांचें भजन पहाण्यास बहुत लोक गेले होते. तेव्हां बुवांचे आंगांत दत्ताचा संचार झाला असें त्यांच्या हाहाहुहूवरून, जमिनीवर पडल्यावरून, व शिष्यानीं उदाचा धूप व कापराचा भडका चालू केल्यावरून वाटलें. मग ते उठून बसले. व कोणास काय पृच्छा करावयाच्या असतील त्या कराव्या असें म्हणाले. त्यावरून आर्त व कामनिक लोक पुढें पुढें जाऊन आपलीं संकटें त्यांस सांगून परिहार पुसूं लागले. तेव्हां कोणास कांहीं कोणास कांहीं असें बुवांनीं सांगितलें. त्यांप्रसंगीं माझा एक मित्र बुवांचे पुढें जाऊन म्हणाला कीं माझी बायको आजारी असते तिचें तें दुखणें आंगरोगाचें, बाहिरवाशाचें किंवा दैविक आहे तें ध्यानांत आणावें व उपाय सांगावा, बुवांनीं एकाग्रवृत्तीनें थोडा वेळ विचार करून सांगितलें कीं तुझे बायकोस ताप येतो, तो आंगरोगाचा आहे, व त्याकरितां तूं एक वर्षपर्यंत दररोज एक पाण्याची घागर ब्राम्हणाचे घरीं घालीत जा व अमुक दिवस बायकोचे आंगावरून उतरून टाक म्हणजे बेदोबस्त होईल. नंतर तो मागें फिरून आला. पत्रकर्तेमहाराज, त्या मनुष्याचें मुळींच लग्न झालेलें नाहीं! असें असून ती गोष्ट बुवांस समजली नाहीं. तेव्हां भूतपिशाच वायुरूप प्राणी बुवांस कसे दिसतील! अशी शंका येऊन बुवांच्या भोंदूपणाबद्दल मोठा अचंबा वाटला. बरें कित्येक स्त्रिया पुत्र व्हावा म्हणून बुवांचे नादीं लागतात पण मी ऐकतों कीं बुवांस स्वतः दोन स्त्रिया असून एकही पुत्र नाहीं. असें हे बुवा कीं ज्यास स्वतःकरितां पुत्रप्राप्ती करून घेण्यास दत्त प्रसन्न करवत नाहीं ते दुसऱ्याचे स्त्रियांस पुत्रसंतती कशी देणार? अशा स्पष्ट व असत्य व असंभाव्य गोष्टी असून भोळे लोकांचा समाज जास्त पडल्याकारणानें त्याजपुढें एखादा समजदारास त्यांचे मताविरुद्ध बोलण्यास मोठी पंचाईत पडते. यास्तव आपण आपल्या पत्रद्वारें या गोष्टीविषयीं लोकांची नीट कानउघडणी कराल तर कोणीही या बुवांचे नादीं लागणार नाहीं. व साक्षात अयंत थोर जो जगदीश्वर त्याचे भजनीं लागतील. या लोकांनीं भगवंतास प्रसन्न केलें असतां यांची मोठी दुर्घट कामेंही अगदीं फुकासरशीं हलकीं होणारीं आहेत. व तीच अशांच्या सहवासानें आणखीं अधिक दुर्घट मात्र होतील. व ते अशा वर्तणुकीमुळें दुःखास पात्र मात्र होतील. मला असें वाटतें कीं, येथील अंमलदार लोक असले भोळेलोकांस फसवून त्यांचें नुकसान करणारे साधूस येथें रहाण्याची

मनाई करतील तर एकदम पीडा दूर होईल. कळावें लोभ असावा हे विनंती.

एक पुणेंकर.

*** हें पत्र वाचून पाहून व बुवा विषयीं आम्हीं जी माहिती मिळविली तीवरून आमचे मनांत या गोष्टीविषयीं विस्तार युक्त लिहिण्यास बहुत विचार आले आहेत परंतु आतां स्थलावकाश राहिला नाहीं; याजकरितां पुढील अंकांत या विषयीं आम्हीं एक स्वतंत्र निबंध लिहूं. तरी आम्हास बाळनाथ बुवांचे कृत्यांत लटपट दिसते इतकें आमचें मत आम्ही एथें प्रदर्शित करितोंच. सदरीं पुणेंकर म्हणतो कीं, यांसएथें रहाण्याची मनाई होईलतर पीडा दूर होईल परंतु अंमलदार लोकांस तसें करण्यास अधिकार नाहीं असें आम्हांस वाटतें. बाकी असे बाया बापड्यांस व भोळयांस फसविणारे बुवा अकोल्यांतूनच नव्हे पण जगांतूनही नाहींसे झाले पाहिजेत. व असें कधीं घडेल तो ईश्वरकृपेचा वरद काळ आम्हीं समजूं. अस्तु. आमच्या बाळनाथ बुवांचा दत्तानुग्रह वास्तविक असेलतर त्यांच्याविषयीं आमच्या ठायीं जी अश्रध्धा उत्पन्न झाली आहे ती घालविण्या करितां दत्तमहाराज येत्या आठवड्यांत आमेच हृदयावर काय प्रकाश पाडितात तो पाहूं.

## हाय कोर्टाचा ठराव.

स्पे० अपील नं ३०४ सन १८६८
ता० १९ आगष्ट स० १८६८ इ०.

नामदार चीफ ज० कौच, आणि जस्टिस गिबस यांचे समोर.

| | |
|---|---|
| शेख अबस वल्लद शेखदाऊद, मूळ प्रतिवादी हल्लीं स्पे० अपिलेन्ट. | व. मि. शांताराम नारायण. |
| इभ्रामजी वल्लद हसनजी, मू. वा. आणि हल्लीं स्पे० रिस्पोंडेन्ट. | व. मि. गणपतराव भास्कर. |

दावा रु० १६

वादीची फिर्याद रत्नागिरी एथील सदर अमीन कोर्टांत कीं माझे घराजवळील जमिनीचा तुकडा माझे मालकीचा असून प्र. वादीनें कपटानें मामलेदाराकडे वहिवाटीच्या बाबदींत अर्ज्याकरून माझी वहिवाट काढून टाकली आहे त्याजकरितां सदरील जमिनीच्या तुकड्यावर माझी मालकी ठरवून देऊन कबज्याही देववावा म्हणून वगैरे.

प्र० वादी नंबर १ शेख अबस यानें जाब दिला कीं तंट्यांतील जमिनीचा तुकडा माझ्या मालकीचा असून त्यांतील झाडेंही माझे वडिलाच्या हातचीं लावलेलीं आहेत.

कोर्टानें राघो लक्ष्मण आगाशे नांवाचा दुसरा एक मनुष्य यास सामील प्र. वादी नंबर २ चें केलें. त्यानें जाब दिला कीं;— तंट्यांतील तुकडा माझा असून मी बापू मोन्घल यास दिला होता. सांप्रत तो तर मयत आहे परंतु त्याचा भाऊ आगा मोन्घल जिवंत आहे म्हणून वगैरे.

सदरील प्र० वादी नंबर २ याच्या कैफीयतीवरून पुन्हा सदर अमीन यांनीं अगा मोन्घल यास सामील प्र० वादी नंबर ३ चा करण्याचा ठराव करून नोटिशी बद्दल भत्ता भरण्याविषयीं वादीस हुकूम केला. वादीनें सदरील नोटिशी बद्दल आवश्यक भत्ता भरण्याचा असतां न भरल्यामुळें प्र० वादी नंबर ३ यास कज्जांत सामील केलें असून त्यास नोटिस झाली नाहीं. याजमुळें सदरअमिनानें ठरविलें कीं भत्ता भरला नाहीं सबब वादीची मालकी जमिनीचे तुकड्यावर लागू होत नाहीं. आंतील झाडें मात्र त्याच्या लागणीचीं व त्याजकडे बहुतवर्षें उपभोगास आहेत सबब झाडें त्याजकडे राहण्याचा ठराव करून जमिनीच तुकड्याविषयीं वादीचा दावा रद्द केला.

या निवाड्यावर उभयपक्षकारांनीं ही आपआपल्या पक्षानें अपिलें केलीं. या अपिलांत रत्नागिरीच्या सिनियर अ० जज्जानें ठराव केला कीं वादीची मालकी जमीनीच्या तुकड्यावर व झाडांवर पोंचती. प्र. वादी नंबर ३ यास नोटिस करण्याचा भत्ता वादीनें न भरल्या कारणानेंच केवळ सदर अमिनानीं जमिनीच्या मालकीविषयीं वादीचा दावा नामंजूर केला हें बरोबर नाहीं. वादीनें जर भत्ता भरला नाहीं तर झालेल्या पुराव्यावरून सदरअमिनानीं फैसल करण्याचा होता. आतां वादीनें कोर्टाचा हुकूम झाला असून भत्ता भरण्याची कसुरी केली ह्या त्याचे कृत्याबद्दल त्यास शिक्षा एवढीच कीं प्रतिवादी नंबर ३ आगा मोन्घल यास वादीवर पुन्हा तंट्यांतील ठिकाणाबद्दल दावा आणण्याची मोकळीक उरली आहे. ह्याजमुळें वादीस प्र० वादी नंबर ३ याजबरोबर आपली मालकी शाबीद करून दाखविण्याची जबाबदारी उरली आहेच; सबब सि० असिस्टेन्ट जज्जानें सदर अमिनाचा फैसल दुरुस्त करून वादीचा संपूर्ण दावा देवविला.

या निवाड्यावर प्र० वादी नंबर १ शेख अबस यानें स्पे० अपील केलें त्यांत स्पे० अपिलेन्टाचे वकिलांनीं तक्रार घेतली कीं कोर्टाचा हुकूम झाला असून जर वादीने कोर्टाचे बजावण्याचे कागदाचा भत्ता भरला नाहीं तर खालील कोर्टानें वादीचा सर्वच दावा रद्द करण्याचा होता वगैरे.

हायकोर्टाचा ठराव:—चीफ ज० कौच, आमचे मतें सि० असिस्टन्ट जज्जाचा निवाडा कायम केला पाहिजे. सदर अमिनानें वादीस नोटिशीचा भत्ता भरण्याचा हुकूम केला असून चुकून त्यानकडून तसें झालें नाहीं म्हणून वादीस भत्ता भरणें भाग पडावें असा मार्ग कायद्यांत कोठें असलेला आमचे दृष्टीस येत नाहीं. शिवाय वादी यानें भत्ता भरला नाहीं एवढ्याच कारणावरून प्रतिवादी नंबर १ चा यास फायदा घेऊं देणें व त्याचे (प्र० वादी नंबर ३ याचे) तर्फे कज्जांत चांगली पुरवणी झाली असल्या वाचूनच वादीनें केले त्या शाबिदीविरुद्ध फैसला करणें न्याय नाहीं. प्र० वादी नंबर १ हा स्पेशल अपिलांत तक्रार करतो कीं प्र० वादी नंबर ३ आगा, कज्जांत सामील पक्षकार केला नाहीं, परंतु जरी अशी कल्पना केली कीं प्र० नंबर ३ यास सामील केलेलें आहे, व त्याची कांहीं मालकीही तंट्यांतील जमीनीवर पोंचत आहे, तरी त्या कारणामुळें स्पेशल अपिलेन्ट (प्र० वादी नंबर १) याचें हित होण्याचा त्यापासून मुळींच संभव नाहीं. व आगा, सामील न झाला तर प्र० वादी नंबर १ यास त्यापासून कांहींच बाध येत नाहीं. याजकरितां स्पेशल अपिलेन्टानें काढलेली चूक याचे कज्जास हितावह होण्यासारखी नाहीं व त्यामुळें कज्जांतील गुणदोषास अधिक उणेपणाही येत नाहीं. व कज्जांतील घडलेल्या गोष्टींवरून सि० अ० जज्जाचा निवाडा बरोबर आहे. असें आमचें मत आहे.

इं० प्र०.

## Advertisements.

## जाहिरखबरा.

**नोटिस**—बेदरशिंग वल्लद बेगाजी पाटील राहणार सुठायबुदरुक तालुके बाळापुर जि. आकोला यास माधव वल्लद पुंजापा पाटील रहाणार पिंपळखेद गी ता. जळगांव जिल्हा अकोला याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आम्ही आपले मुलीचें लग्न तुमच्यामुलाशीं लावलें व तुमची आमची सोईरगत झाली नंतर आम्हांस असा शोध लागतो कीं तुमची बायको म्हणजे सदर मुलाची आई नांव भागी ही अकरमाशी जातीची आहे याजकरितां आमचे दाईज आम्हांस याजबद्दल दूषण देतात व तुमचे ही भावाबंदांच्या बायका तुमच्या पंगतीस जेवण्यास बसतात परंतु तिच्या पंगतीस बसत नाहींत याजवरून आम्हांस हिकडे गोतांत वागण्यास हरकत होते करितां या नोटिशीनें कळवितो कीं ही नोटिस पावल्यापासून पंधरा दिवसांचे आंत ती कोण जातीची आहे व तिच्या पंगतीस तुमचे आप्त बसत असतात कीं वा नाहीं हें आम्हांस कळवावें आणि कांहीं व्यंग असल्यास आम्हास लग्नाची फारकत लिहून द्यावी म्हणजे वेगळा विच्यार करण्यास बरें पडेल. नोटिशीचा जबाब न मिळाल्यास सरकारांत तिजवर फिर्याद करून काम चालेल व सर्व खर्च तुम्हांपासून घेतला जाईल कळावें तारीख ३१ माहे आगष्ट १८६८ इ.

(सही) माधव वल्लद पुंजापा पाटिल.

## जाहिरनामा.

सर्व लोकांस कळावें कीं सरकारी नोटी वऱ्हाडांत चालविणेंसाठीं इंडिया सरकारानें वऱ्हाड प्रांताला एक भाग करून सदरील भागांत नोटी देण्याची जागा अकोलें जिल्हे पश्चमवऱ्हाड ठरविली आहे.

तारीख १ माहे सपटंबर सन १८६८ इसवीपासून व त्यानंतर सदरील भागांत सर्व प्रकारचें देणेंघेणेंच्या ठरावाविषयीं अकोल्याच्या नोटी कायदेशीर चलन समजाव्या व सदरील भागांत सरकारच्या इरसालांत व दुसरे सरकारचे आदाईस घेतील.

नोटी दिपुटीकमिशनर यांजकडून खालीं लिहिले रितीप्रमाणें देण्यांत येतील त्या येणेंप्रमाणें.

१. इंडिया सरकारचे कायदेशीर नाण्याचे ऐवजीं.

२. सदरील भागांत ज्या दुसऱ्या नोटी चालू करतील त्यांचे बदला.

अकोल्याचे पेपरकरेन्सी अफिसांतून ज्या नोटी खरेदी केल्या त्यांचा पैसा पाहिजे असल्यास डिपुटी कमिशनर अकोला यांचे कचेरींतून अगर मुंबईस पेपरकरेन्सीचे अफिसांतून मिळेल.

वर लिहिलेला जाहिरनामा ग्याझेट आफ् इंडिया यांत प्रसिद्ध होऊन आल्यावरून सर्वत्रांस कळविण्यांत येतें कीं पैशाचे ऐवजीं पाहिजे असेल त्या दराच्या नोटी दिपुटी कमिशनर अकोला यांचे कचेरींतून मिळतील व नोटी देण्याचें आफीस सुटीचे दिवस खेरिज करून दररोज दहा वाजतां खुलें होऊन बारांवर तीन वाजतां बंद होईल व शनवारीं बारांवर एक वाजतां बंद होईल.

मुंबई पेपरकरेन्सीचे कमिशनर यांजपाशीं जितक्या रकमेच्या अकोल्याच्या नोटी असतील तितक्या रकमेपुरत्या मुंबईच्या नोटी अकोला कचेरींत पटल्या जातील.

याखेरीज जी माहिती पाहिजे असेल त्याजबद्दल दिपुटी कमिशनर अकोला यांचे कचेरींत तोंडीं पुसलें असतां मिळेल. तारिख २९ माहे आगस्ट सन १८६८.

C. A. W. DAVIES.
Assistant Commissioner of
Paper Currency.

## नवीन पुस्तक.

### व्यवहारोपयोगी तारतम्य.

या नांवाचें नवीन पुस्तक मी नुकतेंच तयार करून अकोल्यास वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खिळेछापावर सुंदर रितीनें छापविलें आहे. शाळांतील मुलांस व गैरमाहित इतर लोकांस बाजारचें शहाणपण कळावयास या पुस्तकाची मोठी मदत होईल याची अष्टपत्री साच्याचीं ९३ पृष्ठें आहेत. किंमत अडीच आणे व डाकहाशील एक आणा पडेल. अधिक प्रति घेणारांस डाकहाशील कमी पडेल. वऱ्हाडसमाचार आफिसांत रोख किंमत पाठवून पुस्तकें न्यावीं. सर्वांस कळावें.

नारो रघुनाथ मोहोळकर स्कुलमास्तर. मेहकर.

**आक्ट.**

सन १८६८चा ९वा
पेशे व धंदे यांवरील कराविषयीं
किंमत च्यार आणे.

## जाहिरात.

**विद्या कल्पतरु** ( मासिक पुस्तक ) बडोद्याचे श्रीमंत महाराज खंडेराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहादर यांच्या पदरचे शिलेदार रा० रावजी बिन केशव सांबारे यांनीं कित्येक महिने बहुत वर्तमान पत्रांतून जाहिरात दिल्याप्रमाणें विद्याकल्पतरु नांवाचें सर्वोपयोगी मासिक पुस्तक छापण्याची सुरवात झाली. व त्याचा एप्रिल महिन्याचा पहिला अंक बाहेर पडला. तीं पुस्तकें आम्हाकडे विक्रीस आलीं आहेत. किंमत ९ आणे व डाकहाशील १ आणा पडेल. किंमत रोख पाहिजे.

वऱ्हाडसमाचाराचे म्यानेजर.

### TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers, that their Subscriptions, for the present year, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity of ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

| किमतीचे ठराव. | रु. | आ. |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास… … | ६ | ० |
| साल अखेर … … … | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ … … | ३ | ८ |
| सहामाही अखेर … … | ४ | ० |
| फुटकळ एक अंकास … … … | ० | ६ |

या शहरा बाहेरिल लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु. ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिने पर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

**नोटिसा वगैरे छापण्याचे दर.**

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

हें पत्र आकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकारितां छापून प्र०के०

# वऱ्हाडसमाचार.

The Varad Samachar or News of Berar.

VOL. III AKOLA:— SATURDAY, SEPTEMBER 12, 1868 NO. 37

पुस्तक ३ अकोला, शनिवार तारीख १२ माहे सप्तंबर सन १८६८ इ० अंक ३७.


## दैविक साक्षात्कार.

गेले आठवड्यांत बाळनाथ बुवाविषयीं पुणेंकराचें पत्र आम्ही छापिलें व स्वतांचा अभिप्राय पुढील आठवड्यांत देऊं म्हटलें आणि तोंपर्यंत त्यांचे [illegible] आमचे हृदयावर काय प्रकाश पाडितात तें पाहूं असें लिहिलें होतें याची आमचे चतुर वाचकांस आठवण असेल. तें पत्र बाहेर पडलें तेव्हांपासून आमचा जीव संशयांत, भयांत व मोठ्या घोटाळ्यांत पडला. न जाणो बाळनाथ बुवा खरे प्रासादिक असून ईश्वराचें तोंड असतील तर आमच्या पुणेकरांनीं त्यास व्यर्थ काळें लाविलें व त्या कृत्यास आम्ही सहाय केलें हें बरें झालें नाहीं. असें वाटूं लागलें. रस्त्यानें जाऊं लागलों व लोक थोडे कुजबुजूं लागले म्हणजे तें आम्हांविषयीं असेल काय? असें वाटावें. रस्त्यांत कोणी आम्हांशीं न बोलतां गेला तर आम्ही साधुनिंदक म्हणून त्यानें आमचा तिरस्कार केला काय? थोडें अभ्र आलें तर आमच्या दृष्टीस कांहीं विकार झाला काय? भूक चांगली लागली नाहीं तर बुवांनीं आमचे पोटांत भूत घातलें काय? इत्यादि प्रकारचे भास होऊन आमची त्रेधा होऊं लागली. असे एक दोन दिवस गेल्यावर एक दिवस आम्हीं आपले आफिसांत याच विषयावर कबूल केलेलें आर्टिकल लिहावयास बसलों तों आमची तयार केलेली लेखणी नाहींशी झाली, ती कांहीं केल्या सांपडेना, व दुसरी चांगली चालेना, आणि दौतींतील शाई पाहतों तों वाळून गेली. इतक्यांत आमचे कारकुनानें येऊन सांगितलें कीं तुमच्या मागच्या लिहिण्याचा बाळनाथ बुवास फार राग आला. व त्यांनीं त्या निंदक लिहिणारांच्या लेखण्या, दौती नाहींशा होतील, असा आपल्या भोंवतीं अनुग्रहा करितां भरलेल्या बाजारांतील लोकांजवळ, तुम्हांस शाप दिला आहे, तो खरा होणार असें वाटतें. तेव्हां तर आम्ही अधिक भ्यालों व बरोबर लठ्ठसा शिपाई घेऊन घराची वाट धरिली. मनांत कीं बुवांचें एकादें भूत आलें तर त्याशीं तो झगडेल व आपण पळून जाऊं. तो संध्याकाळचा प्रसंग होता व रात्र अंधारी होती मग काय पुसतां? जसे तसे घरीं आलों तों बातम्यावर बातम्या जणू काय तारायंत्रच घरांत आणून चालू केलें होतें. एक म्हणतो बुवांच्या अमुक वकील शिष्यांनीं वर्तमानपत्र न पाठविण्याविषयीं चिठी लिहिली. दुसरा म्हणतो अमूक कारकून शिष्यांनीं वर्तमानपत्र न घेण्याचा निश्चय केला. तिसरा म्हणतो अमुक वर्गणीदार शिष्य फार रागावले. चवथा म्हणतो बुवांनीं मिशांस पीळ दिला व सर्व शिष्यांनीं पत्रें घेऊं नयेत असें म्हटलें. आणि जिल्ह्या जिल्ह्यांनीं आम्ही आपल्या दत्ताकडून हुकूम फिरवून वर्तमानपत्र कर्त्यांचें पाचच्यारशें पत्रांचें नुकसान करितों असें सांगितलें. इतक्यांत दुसरी बातमी आली कीं बुवांची निंदा फार झाली सबब आततताई पणानें ते माडीवरून उडी टाकून आत्मघात करित होते. परंतु प्रियशिष्यांनीं आपला प्यारा अनुग्रह दाता न मरावा व त्यापासून मुलें होतकरू बायका सुखी व्हाव्या, म्हणून त्यांची कीव केली व त्यांस खेंचून धरिलें. मग तें जिवावरचें संकट टळलें. तरी बुवांनीं म्हटलें कीं त्या निंदकास देव पाहून घेईल. आतां वाचकहो, तुम्हीच कल्पना करा कीं ती रात्र आम्हास कशी गेली असेल? व बुवांच्या प्रतापसिंहापुढें आम्ही कसे मेंढी झालों असूं? त्या रात्रीं आम्ही अन्नही सेवन केलें नाहीं. बिछान्यावर पडून राहिलों व बुवास नवस केला कीं हें सर्व संकटरूपी अभ्र आपले भव्य प्रभावानें आपण वितळवाल तर आम्ही खरोखरी आपले छात्र होऊं, आपणापुढें ऊद जाळूं, तोबा तोबा, व चुकलों चुकलों म्हणूं, आपलें यिदान व निवरती (विधान व निवृत्ती) वगैरे गदळ व असंस्कारित शब्द प्रासादिक व ईश्वरोक्त असे मानू. आतां आमचा अंत न पाहतां आम्हांवर अनुग्रह करावा, इत्यादि बहुत बोललों तरी मनाचें चांचल्य जाईना व निद्रा लागेना. याप्रमाणें काळजींत तीन प्रहर रात्र गुदरली. मग आम्हांस वाटलें कीं हे सर्व उपाय आतां व्यर्थ आहेत. नित्य ज्या दयाळु परमेश्वराची आपण एकांतीं प्रार्थना करितों त्यालाच आतां संकटनिवारणार्थ प्रार्थावें, असा निश्चय होतांच एकोभावें प्रार्थना केली. त्याबरोबर काय पालट झाला तो पहा! बिछान्यावर श्रांत व चळबुळ करित आम्हीं पडलों होतों ते एकदम निवांत झोंपीं गेलों व तितक्यांत आम्हास एक मोठें साक्षात्काराचें स्वप्न पडलें तें साद्यंत एथें लिहितों.

### स्वप्न.

आम्ही आपले बंगल्यांत एकटे बसलों आहों व डोळे झाकून कांहीं विचार करित आहों तों कोणी आल्याची चाऊल झाल्या सारखें भासलें. व गुलाबी अत्तराच्या कुप्या उघडल्या प्रमाणें सुगंध सुटला. तेव्हां कोण आहे व काय आहे तें पाहावें असें मनांत आलें पण कांहीं केल्या डोळे उघडेनात. इतक्यांत कोणी जवळ येऊन त्यानें आमच्या नेत्रास आपले हस्ताचा सुखस्पर्श केला असें भासलें. त्याबरोबर आम्ही आनंदरूप होऊन पाहूं लागलों तों एक गौरवर्ण, तेजःपुंज, सशक्त, भव्य, व सुप्रसन्न दिव्यपुरुष सुंदर आणि मोलवान वस्त्रें परिधान केलेला आमचे पुढें मंचकावर बसलेला आहे. व आम्ही आतां त्यास पाहून काय प्रश्न करूयाची, हास्य मुख होत्साता जणु काय, वाट पाहात आहे असा दिसला. तेव्हां ती श्रीदत्त अवधूताची मूर्ति आपल्या महान भाग्योदयानें आपणास प्रत्यक्ष दर्शन देण्यास आली असें वाटून आम्हांस अतिशय उल्हास झाला. व तत्क्षणीं आम्ही त्यांच्या चरणीं मस्तक ठेवून त्यांस साष्टांग प्रणिपात केला, व हस्त जोडून सन्मुख उभे राहिलों, आणि प्रार्थना केली कीं हे भक्तवत्सल, दीनदयाल, करुणासागर प्रभो, प्रत्येक मानवाचें हृदय आपण जाणत अहा, कोणाची मति कोणत्या कार्यांत तत्पर आहे, पाप कोणतें, पुण्य कोणतें, खरा साधु कोण, असाधूचें खरें स्वरूप लोकांस दाखविलें तर त्यांत साधुनिंदा झाली कीं काय, हें सर्व आपणास अवगत आहे, व अवगत आहे एवढेंच नव्हे तर आपणापासूनच लोकांस तें कळण्याचें ज्ञान आलें आहे. तेव्हां या दासाकडून या कृत्यांत अपराध म्हणण्यासारखें कांहीं घडलें नाहीं, व बाळकावर अनुग्रह करून आपण दर्शन दिलें हीही हा दास याकामीं निष्पाप असल्याची साक्ष पटत आहे व तेणेंकरून मानसाचे ठायीं बहुत संतोष होत आहे. आतां मागणें इतकेंच कीं भेट दिल्यानें दुःखपरिहार झालाच, पण याहून आम्हां जो काय आगमनोद्देश असेल त्याविषयीं दासास आज्ञा व्हावी.

ही प्रार्थना ऐकिल्यावर त्या वरदमूर्तीनें प्रेमपुरःसर आमचा हात धरून आम्हांस सांगितलें कीं प्रथम कांहीं चमत्कार पाहवा नंतर सर्व हकीकत कळेल. असें म्हणून आमचे डोळ्यावर एक हात धरून भरारी मारली, तों किती सहस्त्र योजनें कोठें आलों तें आम्हांस कांहीं कळेना. मग एक द्वार लागलें तेथें आम्ही स्थीर झालों, तेव्हां आमचे डोळ्यावरील हात काढून त्यांनीं आमचे हातीं एक उत्तम दुर्बिण दिली. व तींतून पाहावयास व मनांत किळस न आणण्यास सांगितलें. दरवाज्यावर पाहतों तों मोठमोठ्या टाइपाच्या अक्षरांनीं छापलेलें एक भयंकर नाव आम्हांस दिसलें तें कोणतें म्हणाल तर यमपुरी. नंतर दुर्बिणींतून पाहण्याची जिज्ञासा आम्हांस अधिकच उत्पन्न झाली. व द्वाराचे आंत पाहूं लागलों तों लांब एक मलमूत्रानें भरलेलें कुंड होतें व त्यांत बहुत मनुष्यें तळमळ करीत पडलीं होतीं. कोणाचे डोकीस मोठाल्या जटा होत्या; कोणाचे पायांत चाळ होते, कोणी लंगोट्या लाविल्या होत्या, कोणी छानछबेले पोषाग केलेले होते. कोणाचे गळ्यांत भारलेले ताईत होते, कोणाचे मनगटास अंगाऱ्याच्या पेट्या होत्या, कोणीं भारलेलीं कडीं घातलेलीं होतीं, कोणी लठ्ठ होते, कोणी रोड होते असे अनेकविध प्रकारचे मनुष्य फार यातना होत असल्या मुळें रडताहेत व आमच्या सन्निध असलेल्या दिव्यमूर्तीकडे दीनवदन पसरून दुःखमुक्त होण्याविषयीं याचना करित आहेत. हें पाहून आम्हांस त्यांची फार दया आली. व आम्ही त्या विषयीं रदबदली करणार तों या दुर्बिणीचें काम झालें, आतां दुसरीकडे चलावें अशी आम्हांस आज्ञा झाली. व पूर्ववत भरारी मारिली तों गगनचुंबित सहस्त्रावधि पर्वताहून उंच अशा स्थलीं एका दिव्य नगरीस आम्ही जाऊन पोहोचलों. तेथें त्यांनीं आमचे डोळ्यांत एक प्रकारचें अंजन घातलें मग पाहूं लागलों तों एके मंदिरांत मोठी सभा आहे, एक मध्यें स्फटिकाचें दिव्य सिंहासन आहे, त्यावर सर्व प्रकारच्या उपमा ज्यास तुच्छ आहेत व अलंकार शास्त्रें ज्याचें वर्णन करावयास मुकीं आहेत असें आदिदैवत पाहिलें. भोंवतालीं शेकडों सत्पुरुष बसले आहेत त्यांजमध्यें नामस्मरणाच्या, प्रार्थनेच्या, नीतीच्या, व धर्माच्या, चर्च्या चालल्या आहेत. तहान, भूक, दुःख, दैन्य, यातना सर्व विसरून गेले आहेत, असें पाहून आमचें मन अगदीं गुंग झालें व आम्ही त्या दैवताचा दीर्घकालमर्याद स्तव केला. मग आम्हांस दोन गोष्टीविषयीं आज्ञा झाली त्या येणें प्रमाणें.

### बुवाविषयीं.

ज्या बुवाविषयीं संशय आहे तो साधु नव्हे. हा देव अंगांत आला म्हणतो यांत देवाची निंदा होते. देव कोणाच्या अंगांत येत नाहीं. ताबुदापुढें ऊद जाळतात तसा देव अंगांत आला असें म्हणून ऊद जाळणें यांत पाप आहे. बुवाचें मन निष्काम नाहीं. मुलांची खटपट ज्या त्या स्त्रियांचे नवऱ्यांनीं करावी. सोंवळ्यागोमट्या व तरुण स्त्रिया बुवांकडे कोणी पाठवूं नयेत. किंवा बुवांस त्या असतील तेथें आणूं नये. भोंवतालच्या सिध्द साधकांनीं, अज्ञान जनांनीं, भाविकांनीं व स्त्रियांनीं यांस बुवा केलें आहे. बाकी कांहीं नाहीं. "भूसके लडू खायगा सो पस्तायगा, और ना खायगा सोबी पस्तायगा." हल्लीं चालली आहे अशी विचक्षणा दिवसानुदिवस चालल्यास फार लवकर बुवाचें पितळ बाहेर पडेल. व यांच्या तोंडीचे आणखी बहुत ढोंगी आहेत त्या सर्वांविषयीं पुढें कळेल.

### भूतपिशाच व अंगांत येणें.

भूत, पिशाच, ब्रम्हराक्षस, समंद, हडळ, झोटिंग, खैस, या योनि मुळींच नाहींत. अज्ञान लोकांस भ्रमविण्यासाठीं हा आलीकडील काळांत खेळ झाला आहे, यांत खरें कांहीं नाहीं. मनुष्य मरण पावतो त्याचा वायुरूप जीव कर्मानुरूप फळ भोगण्यास ईश्वराकडे जातो, व शरीर मातीस मिळून जातें. त्यांस पूर्वस्मृति राहून पराक्रम करण्यास, उपद्रव देण्यास, व बोलण्यास वगैरे स्थितिच राहत नाहीं. तेव्हां वांझेच्या मुलानें वाळूचे दोर करून मृगजलाचें पाणी सांठवावयाचें त्याप्रमाणें मनुष्यें मेल्यावर भूतपिशाच होतात ही मूर्ख कल्पना आहे. मनुष्यास जीवंत असतां मोठी शक्ती असते व बहुत प्रकारचीं साधनें असतात तेव्हां ही त्यास वायुरूपानें जाऊन कोणाचें बोकांडीं बसतां येत नाहीं. आणि मरून राख रांगोळी झाल्यावर शून्यरूपानें त्यास तसें करतां येतें व यथेच्छ वर्ततां येतें असें म्हणणें अगदीं खोटें आहे. आणि अशा तऱ्हेचे जे खेळ होतात ते अपरोगाचे, कल्पनेच्या बाधेचे, व ढोंग धत्तुऱ्याचे होतात. बाळंतीण मेली म्हणजे हडळ होते व येरवीचे मनुष्य भूत होतें ही गोष्ट बाळपणापासून पिढीजाद ऐकण्यांत असते, व प्रेत नेतांनां साधारण प्रेत म्हणजे भेसुर असतेंच व सुवासिनीचें असल्यास त्यास मळवट भरितात, हीं प्रेतें भितऱ्या माणसानें पाहिलीं कीं जुन्या गोष्टीबरहुकूम हडळीच्या व भुताच्या कल्पनेच्या वृक्षास मूळ झालेंच. पुढें रात्रीं विरात्रीं, काळोखांतून, एकटें, त्या घरावरून, स्मशानांतून, व दुसऱ्या घोर स्थलावरून गेलें व वेझडतांनां एकादें गाढव, म्हैस वगैरे जनावर, अथवा मोठासा दगड, किंवा झाडाची डाहळी दृष्टीस पडली कीं तीच याचे मनानें हडळ किंवा भूत होते. व लागलीच यास झपाटाही होतो. आणि बायकांस तर याहून जलद. मग मंत्री, देवऋषी, जादुवाले यांचें पिकलें. ते मग त्यांस पाहिजे तसें लुबाडतात. व त्यांच्या सर्व संसाराची व सुखाची धूळधाणी करितात. भितऱ्या मनुष्यास असे भीतीचे प्रसंगानें गाठिलें म्हणजे त्याचे मस्तकांतील मेंदू बिघडून त्यास कांहीं शारिर रोग जडतो. व घुऱ्यासारखा किंवा वायूच्या झटक्यासारखा त्याचा परिणाम होतो, त्यासच भूत अंगांत आलें म्हणतात. व तो झटका गेला म्हणजे भूत गेलें म्हणतात.

तेव्हां वास्तविक पाहूं गेलें तर भूत त्या आरंभीच्या कल्पनेशिवाय कांहीं नाहीं. व तें मंत्रानें, अगर देवऋष्याऱ्यानें निघतें असें नाहीं. कल्पनेनेंच निघत असतें. देवऋषी, मंत्री, बुवा, जादूवाले आपल्या बरोबर कांहीं अनुसंगी बाळगतात. ते आपल्यांतच भूत आंगांत आणून घेतात, त्याचें बोलणें बोलतात, पडतात, गति घेतो म्हणतात. त्यावरून अमकयाच्या अमुक कृतीनें भुतें जातात असा पुकारा होतो. व त्या पुकाऱ्याची कल्पना कधींकधीं भूतकल्पनेनें ग्रासलेल्या मनुष्यास भोग सरण्याच्या धोरणानें गुणावह होते. व कधीं कधीं तरूण बायकांचीं ढोंगी भुतें चांगल्या बुवाच्या कल्पनेनें निघतात. सारांश मनाच्या तरंगाचे सर्व धर्म मनुष्यास अजून कळूं लागले नाहींत म्हणून अंगांतयेणें वगैरेचा कधीं सत्याप्रमाणें भास होतो तथापि तें सर्व काल्पनिक आहे. असें पक्कें समजावें. व बुवांच्या नादीं लागूं नये.

### स्वप्नाची परिसमाप्ती.

याप्रमाणें या दोन गोष्टीविषयीं आम्हांस अनुग्रह केल्यानंतर दुर्बिणींतून पाहिलेल्या ग्रहस्थांस आपआपलीं पूर्वींचीं दुष्ट चरित्रें स्वमुखानें सांगावयाकरितां दुसरे दिवशीं बोलावण्याची आज्ञा झाली. ती त्यांस कळवितांच ते सर्व कावकाव करून ओरडूं लागले. व त्यांची लांबवर कुई झाली. आम्हांस वाटलें कीं हे कावळ्यासारखे काय ओरतात, इतक्यांत जागे झालों आणि पाहतों तों खरेच कावळे ओरडूं लागले. व प्रात:काळ झाला. नंतर आम्ही उठून ईश्वरस्मरण केलें व आपलं नित्य कर्मास आगलों.

याप्रमाणें आम्हांस स्वप्न पडलेलें दैविक साक्षात्काराचें व आमचें भय घालवून आम्हास उल्हास देणारें आहे असें पाहून लिहून काढिलें व प्रिय वाचकांस सादर केलें. आतां बुवांनीं इतक्यांत उमजून पावबारा करावें. नाहीं पेक्षां दुसरा एकादा विलक्षण चमत्कार होईल व दत्ताचीं कुतरीं मागें लागून भों भों करितील.

### पोंच.

"प्रभव मालिनी आणि कलावती" या नावाचें कादंबरीचें पुस्तक इंदुप्रकाशांतून आम्हांस नजर आलें त्याबद्दल त्यांचे आभार मानितों. त्याजवर आम्ही आपला अभिप्राय पुढें लिहूं.

"गीतार्थमंजरी" हें पुस्तक जाहिरातीबद्दल त्याचे कर्त्याकडून आम्हांस आलेलें पोंचलें,

अकोल्याचें पोस्टमास्तर मि० स्मिथ याजकडून आम्हांस एकपत्र आलें आहे त्याचा विच्यार पुढील खेपेस करूं.

## MORALITY OF THE PUBLIC SERVANTS

*( From the Bombay Gazette. )*

THE evidence given by Premchund Roychund and other witnesses before the Commission now sitting in Bombay discloses a peculiar state of morality among the chief public servants at the Presidency town. We allude to the statements regarding their having received allotments of shares in various Companies, then at a premium, and having (or at least some of them) employed their time in dealing in shares in the manner of the brokers in the bazaar. The services. especially the Civil Service, is awaiting with impatience the report of the Commission, which will either clear their body from a great and disgraceful imputation or establish the unpleasant truth, a number of select officers, in the most responsible appointments, have broken their covenants, cast aside the tradition of a hundred years, and put themselves very nearly, if not quite, under the clutches of the criminal law. As there is a great tendency among men to condone such offences, and as Sir Bartle Frere did condone them by appointing the suspected persons to higher places, the public will be interested to learn what the standing rules for the conduct of Government servants are. If public opinion does not assert itself on this extremely important question, there is a danger that the very men whose great places and salaries tempted them to indulge in illegal speculation in 1864 and 1865 may be reappointed to the same or better situations to the exclusion of their more high-minded compeers whose honour was above the temptations of the time. We give Sir Seymour Fitzgerald credit for less of the plausible manners and more of the strong traits of a just ruler than were exhibited by the last Governor, whose sun set in imbecility. For it must be admitted on all sides that if Sir Bartle Frere had performed his plain, though severe, duty to the service with which he had been so long connected, it might have been saved a great and scandalous imputaion and the public, especially the old Bank of Bombay shareholders, would have escaped much loss and misery. We know that we express the opinion of that majority of the Civil Service who remained staunch and honest, refusing unworthy gain, when we say that they most of all have regretted the weakness of Sir Bartle Frere in not sharply controlling and punishing those black sheep, who after eating Government salt for years, accepted the offer of shares from natives.

In the first place, these men broke through a great and noble tradition, which had become stronger ever since the time of Lord Clive. An *esprit de corps* had sprung up which ruled that Civilians, being essentially a governing class and deriving their prestige and position from their judicial or executive duty, ought to be far above the vulgar desire of making money, especially out of the natives. The conditions of their service made their pay increase year by year and there was a pension and annuity of £1,000 to retire on after 25 years' service. Thus, they were placed so far beyond the common temptations of life that it became a favourite saying, that Civilians, like their Brahman prototypes dishonoured themselves by engaging in trade, which was the duty of the baisya or mercantile caste. The necessity of such a stringent rule of honour can be measured only by the pliability and cunning of a native suitor or expectant whose varieties of bribery are legion. The sentiment had been expressly sanctioned by a standing order of Sir George Clerk's and another of the Governor-General's, both of which were in force in Sir Bartle Frere's time and ought to have been acted upon. They provided that any Civil Servant who indulged in speculation or commerical transactions should be liable to suspension from employ to loss of promotion or degradation. Both Secretaries and Under-Secretaries must have been aware of this order; and if Government believed that they had infringed it, as Premchund Roychund says, they ought to have been at once sent away on Dewanee allowance to be Third Assistant Collectors at up-country stations. Prompt and vigorous remedies would have soon stopped the corrupt sore. Sir Bartle Frere and his Council did nothing of the kind. They allowed the speculation to run rampant, and when they did publish these orders, they took no measures to ascertain who had broken them. The honourable members of the Service were in a manner insulted by the threat and the really guilty men rejoiced they were treated so leniently. Thus the provisions of the boasted covenant became a dead letter though their terms were very strict. Each officer had bound himself not to divulge secrets, not to accept corrupt presents or make corrupt bargains, and not to "directly or indirectly engage, carry on, or be concerned in any trade, bank dealings or transactions whatsoever." Most of these Bombay officials had at some time or other been employed as Collectors or Assistants who are forbidden by Reg. XVI. of 1827 to engage in any commercial transaction, under penalty of suspension. These restrictions had been made still more stringent by the Indian Penal Code, Section 165 of which punishes the public servant who gets a house at an unfair rent and the Judge who buys, of a suitor in his Court, Government promissiory notes at a discount while they are selling in the market at a premium. Such cases are punishable with imprisonment for two years and fine. The Commissioners will doubtless discover whether there is any reason for believing that these high officials and advisers of Government have come under the perview of these laws. But to avoid such scandal as was created when Mr. A. D. Robertson was appointed to Scinde, we sincerely hope that the other gentlemen at present in the service or on furlough whose names have been mentioned by Mr. Premchund may not be reappoined to responsible duties untill the Governor in Council has satisfied himself of their official integrity and obedience to orders during the period when speculation ruined thousands.

## वऱ्हाड.

हैदराबादेस नवीन आलेले रेसिडेंट साहेब लोकांस फार आवडते होत चालले आहेत असें समजतें. त्यांनीं रेसिडेंटींतील सर्व युरोपियन लोकांस गेल्या मंगळवारीं मोठी मेजवानी देण्याचा बेत केला होता.

मेहेरबान टेंपल सा० बाहदूर यांची स्वारी सुमार एक महिन्यानें नागपुरावरून मुंबईस जाण्यास येणार असें वर्तमान आहे. मि. कारनाक सा० काटन कमिशनर यांस गवरनर जनरल साहेबांनीं भेटीस बोलाविल्यावरून ते सिमल्यास गेले आहेत. ते टेंपल साहेबाबरोबर परत येतील.

हैदराबादची बातमी अहमदनगरच्या वृत्तवैभवांत लिहिली आहे कीं, सर सालरजंग यांणीं त्या राज्यांतील सर्व वकिलांस बुका लावण्याचें ठरविलें. असें करण्याचें कारण ते वकील बहुत करून सर्व मुंबई इलाख्यांतून गेलेले आहेत त्यांस कायदेकानूची विशेष माहितगारी असल्या कारणानें ते वारंवार न्यायाधिशास घोंटाळ्यांत घालितात व रयतेस न्याय मिळण्यास उशीर लागतो.

वऱ्हाडांतील शाळाखात्याचा गुदस्त सालचा रिपोर्ट डायरेक्टर साहेबांनीं केला होता त्याबद्दल रेसिडेंट साहेबांकडून त्यांस शिफारस आली आहे. तसेंच दोन्ही हायस्कुलांचे मास्तर व च्यारी डिपुटि इन्स्पेक्टर यांनीं कामें चांगलीं केलीं त्यांबद्दल त्यांस वाखाणिलें आहे.

देउळगावराजा येथें दसऱ्याची मोठी यात्रा भरत असते. व या वर्षीं त्या लगत्यास महामारीचा उपद्रव आहे म्हणून कमिशनर पश्चिमभाग यांनीं जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे तो असा—

"माहामारीचा उपद्रव जो नुकताच सर्व वऱ्हाडभर पसरला तो हल्लीं देउळगांव राजाचे शेजारील सर्व मोठया गावांतून चालू आहे. तसेंच दूरदूरचे लोकांस देउळगांवचे यात्रेकरितां अकोला जिल्ह्यांतील ज्यां ज्या गावांवरून जावें लागेल त्या गावींही तो आजार ज्यारी आहे.

"चालू महिन्याचे अखेरी पावेतों देउळगांवचे शेजारील गावांतील उपद्रव नाहींसा होण्याची आशा नाहीं यास्तव देउळगावचे राजाचे यात्रेस थोडे दिवसांनीं भरणारे या त्रेंत जाणारे सर्व लोकांस किती भयंकर धोका आहे हें समजण्यासाठीं यात्रेस जाण्याची उमेद धरणारास ही जाहिरखबर प्रसिद्ध केली आहे."

जळगांव—तारीख १० सपटंबर.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.— वि. वि. आपल्या एका मागील अंकामध्यें सुनगांव व असलगांव या दोन बाजारांत पोलिसचे लोक जी धूम करतात त्याविषयीं थोडासा मजकूर लिहिला होता तें पाहून परम संतोष झाला. आतां तरी पोलिसचे लोक निमक ज्याचें खातात त्याचें काम नेकीनें करतील असा भरवसा जाणून माझी लेखणी दोनतीन आठवडे बंद ठेविली होती. इतक्या अवसरांत माझ्या लिहिण्यापासून व आपण मेहेरबानीनें लोक कल्याणाकरितां छापून प्रसिद्ध केल्यापासून काय बंदोबस्त होतो हें मी बारिकपणें पाहिलें परंतु एडिटरराव नाहींहो नाहीं सर्व व्यर्थ आहे. तशा लिहिण्यापासून आमच्या पोलिसांस अधिक जोर येऊन यांणीं एक मोठी शिफारसीची गोष्ट केली. व पोलिस लोक सरकारानें ठेविल्यापासून काय फायदा आहे हें लवकरच दाखविलें तें कसें हें पुढील गोष्टीवरून कळेल. निरोड गांवीं अशी चाल दिसती कीं कवटलचे चीफ साहेबांनीं बाजारांतून सामान खरेदी केलें म्हणजे तें नेण्यास एक महार बेगारी जावा. एका आठवड्यास असें झालें कीं नेहमीप्रमाणें महार बेगारीस येण्यास अवकाश लागल्यामुळें दूतांची तबियत जाऊन महारास चर्मवृष्टी त्याची पाठ सुजे तोंपर्यंत करून आपला बेगारीचा हक्क शाबीत केला. मारणारे इसम तीन होते. दोन कान्स्टेबल व एक चीफ साहेबांचे बंधु छोटे चीफ साहिब, या तिघांवर मारल्याबद्दल मोकदमा शाबीद होऊन पंचवीस पंचवीस रुपये आमचे तहशिलदार यांणीं दंड केला. कां? एडिटर साहेब अशा लोकांस कैद झाली असती तर तसें पुन्हां न करण्यास इतर कान्स्टेबलांस धास्ती अधिक न पडती काय.?

येथील मुलींची शाळा उत्तम प्रकारची चालली आहे. मुली दिवसानुदिवस अधिक होत चालल्या आहेत. पर्जन्य नसल्यामुळें लोकांचे दील अगदीं बेहवाल होऊन गेले आहेत. कपाशी वाळण्याच्या बेतांत आली आहे. कडबाही पाऊस लवकर न पडल्यास त्याच पंथास येऊन पडेल.

खामगाव येथील मुनसफ कोडत मोडून मलकापुरास जाणार त्यापेक्षां या मार्वी आले असतें तर फार चांगलें झालें असतें व लोकांस फार हितकारक पडलें असतें.

या तालुक्यांतील सर्व दिवाणीच्या फिर्यादी अडगांव कोडतांत चालतात हें गाव येथून सुमार सत्रा कोश आहे. जाण्या येण्यास फार त्रास पडतो यामुळें किरकोळ शंभर रुपयांच्या आंतील फिर्यादी बहुतकरून अडगावास थोड्याच जात असतील. त्यांहून लहान फिर्यादीस तर मुद्दल रकमे इतका सावकारास खर्च लागणार मग तो बिच्यारा जातो कशास, यापेक्षां तहशिलदारास शंभर रुपयांपर्यंत अधिकार दिल्यास लोकहित फार घडेल यास्तव आपण प्रजेच्या कल्याणाकरितां आपल्या दयाळू डेपुटी कमिशनरांस शिफारस करालतर महान उपकार होतील. लोभकरावा हें विनंती.

क्ष.

## नोटिस.

**डिपुटी कमिशनर साहेब बहादुर जिल्हा बुलढाणा यांजकडून:—**

सर्वांस कळावें कीं कसेंब लोणार येथील तळ्यांतील खाराचा लिलांव तारीख १ माहे नवंबर सन १८९८ इसवी रोजीं आगगाडीचे स्टेशनावरील मलकापुर येथें दिवसां ११ वाजतां दिपुटी कमिशनर साहेब बहादूर यांचे समोर तीन वाजतां केला जाईल.

तळ्यासंबंधी व लिलावाच्या शर्तीसंबंधी विशेष माहिती डिपुटी कमिशनर साहेब बहादुर जिल्हा बुलढाणा यांजकडेस अर्जी केली असतां समजण्यांत येईल. कळा-

वें तारीख ७ माहे सपटंबर १८६८ इसवी.

C. HORDERN
*Officiating Deputy Commissioner.*

## अकोला ( LOCAL. )

दस्तुर बहिमनजी जामासजी असिस्टंट कमिशनर जरूरीचे कामाकरितां ६ दिवसांचे रजेनें पुण्यास गेले आहेत.

येथील मुनसिपल कमिटीकडे रा. रा. विष्णु सदाशिव क्लार्क आफ धि कोर्ट यांस सेक्रटरी व रा. रा. वामनराव प्रभाकर असिस्टंट मास्तर हायस्कुल यांस असिस्टंट सेक्रटरी नेमिलें आहे—तसेंच रा. रा. श्रीराम भिकाजी बी. ए. डिपुटी इन्स्पेक्टर, रा. रा. खंडेराव बाळाजी फडके वऱ्हाडसमाचाराचे मालक, रा. रा. वामन बाळाजी विद्याखात्याकडील हेडक्लार्क, व मि. गुलाम अहंमद मुनशी यांस मुनासिपल कमेटीचे मेंबर नेमिलें.

हायस्कुलांतील ५० रुपयांचे असिस्टंट मास्तर रा. सदाशिव गोविंद दामले यांस उमरावतीस ७५ रुपयांचे जागेवर असिस्टंट मास्तर नेमिलें—हे गुदस्तां येथूनच म्याट्रिक्युलेशनचे परीक्षेस जाऊन पास होऊन आलेले आहेत.

एथील डिपुटि कमिशनर साहेबांचे कचेरी भोंवती कांहीं फुलझाडें लाविलेलीं आहेत. त्यांपैकीं एका झाडाचें एक फूल एका मनुष्यानें तोडिलें त्याकरितां मि० नौलिस साहेब यानीं फिर्यादी होऊन त्यावर खटला चालविला. व मि० वोडहैस साहेब नवीन असिस्टंट कमिशनर यांनीं इनसाफ करून त्यास एक रुपया दंड केला! दयालु न्यायाधिशानीं स्वतां फिर्यादी होऊन शासन करविण्या जोगा केवढा मोटा अपराध हा!

तुरुंगांत धर्मसंबंधानें ब्राम्हण कैदीस आलीकडे कांहीं जाचणी होत असल्याचा बोभाट गावांत झाला आहे. याचा तपास काढून पुढें लिहूं.

अकोल्यांत टाऊनहाल ब्रांधण्याकरितां १६००० रुपयांचें सांगशन झालें आहे. व प्लयान वगैरे होत आहेत. नदीच्या पुलाविषयीं कोठें अजून हालचाल नाहीं. यांत " कोरडें खावयाचें पण मिशांस तूप लावावयाचें " हा न्याय दिसतो.

या आठवड्यांत एक दोन पर्जन्य बरे पडले. तरी नदीस चांगला पूर आला नाहीं पण हवा रमणीय झाली आहे व माहामारीचा रोग अगदीं गेल्यासारखा झाला आहे. ४।५ दिवसांत याविषयीं कोठें कांहीं ऐकिलें नाहीं ही आनंदाची गोष्ट होय.

( लिहून पाठविलेला मजकूर )

हल्लीं हायस्कुलांतला पाणीवाला अजारी असल्याकारणानें मुलांस पाणी पाजण्याचें काम काकाचार्य यांनीं पतकरिलें आहे. ते दररोज दोन वेळा मुलांस पाणी स्वहस्तानें पाजितात. मध्यंतरीं कोणास तहान लागली तर पाणी देत नाहींत. साहेबांचा हुकूम आणा असें सांगतात. व किल्ल्या आपणापाशीं दाबून ठेवितात. आम्हीं इच्छा करितों कीं याप्रमाणें बारमास काका आपल्या हातचें पवित्रोदक मुलांस पाजितील तर फार चांगलें होईल.

काकांनां मुनसिपालिटींत मेंबर नेमावें अशी डिपुटी कमिशनर साहेबांजवळ शिफारस चालली आहे. ईश्वरकरो आणि काकाला मेंबरशिप मिळो, म्हणजे काका इमानें इतबारें कमेटीचें काम बजावितील.

### बालनाथबुवा.

गेल्या सोमवारीं बुवासाहेबांच्या भजनास आह्मी गेलों होतों. भजनाची गर्दी चालली होती. बुवा मध्यभागीं बसले होते आणि नंदीबैलाप्रमाणें डोकें हालवीत होते. इतक्यांत कांहीं संचार झाल्यासारखें दाखवून बुवा मंडळांतून उठले, आणि गच्चीवरून खालीं उडी मारण्याचा आव घालीत होते तेव्हां सर्व मंडळी घाबरली, आणि दोघां चौघांनीं त्यांस धरिलें तरी हिसकाहिसक पुष्कळ केली, मग शिष्य मंडळीची काय विचारितां, त्रेधा उडाली, कोणी म्हणतात नारळ आणा, कोणी म्हणतात ऊद आणा, कोणी पाणी आणतात अशी एकच गर्दी उडाली, मग बुवानीं किंचित् स्थितिवर आल्या सारखें दाखवून आपलें वाक्पांडित्यास आरंभ केला, पहिल्यानें बोलण्याचा संदर्भ कांहीं कळेना, पण जसा जसा बोलण्याचा प्रकाश पडत चालला तसतसा त्याचा आशय समजूं लागला. त्या बोलण्याचा रोख मागील अंकांत त्यांच्याविरुद्ध पत्र होतें त्यावर होता. तें बोलणें सर्व असंगत व निरर्थक होतें त्याचा पाल्हाळ करण्यांत कांहीं हांशील नाहीं सबब पुरें करितों.

## वर्तमासार.

राजपिंपळचा महाराणा श्रीवीरशालजी मरण पावला. याचा मुलगा गादीवर आहे.

कर्नल कोकस यांस लाहोरास कमिशनर नेमिलें. व मेजर अर्मस्टन हे पेशावरास गेले.

इराणच्या शहानें हिंदुस्थान सरकारास विनंती केली आहे कीं इराणी अखातांत आपली कांहीं फौज ठेवावी. यागोष्टी करितां हिं. सरकार विलायत सरकारास लिहिणार आहे.

दरवड्यांत सामील असलेले ५४ रोहिले लोक हैदराबाद सरकारानें पकडले. व त्यांस जन्मपर्यंत काळेपाण्याच्दा शिक्षा दिल्या.

संताल लोक व भुमे लोक यांत तंटा लागला आहे. दोवेही आपण जातीनें श्रेष्ठ व पारमाणिक मानजी याचे वंशज म्हणवितात. यांचा इनसाफ आतां पंचकोटच्या राजाकडे चालला आहे.

कपुरथळ्याचे महाराजांचा त्यांचें राज्य व जहागीर यांच्या संबंधानें कांहीं वाद आहे. व हिंदुस्थान सरकारानें त्यांच्या इच्छेनुरूप ठराव केला नाहीं म्हणून त्यांनीं विलायत सरकाराकडे अपील केलें आहे. व दोनलाख रुपये अमानत ठेविले आहेत.

बंगालच्या लेफटिनेंट गवरनर साहेबांनीं शिफारस केली आहे कीं बेसनदी कामदार जे ३० वर्षें इमानें इतबारें नोकरी करून पेनशन न मिळतां मरण पावतात त्यांच्या बायकांस किंवा लहान मुलांस पेनशनें देण्याचा ठराव करावा. हिंदुस्थान सरकारास ही गोष्ट मानवली. व स्टेट सेक्रटरीकडे त्यांनीं सांगशनाकरितां लिहिलें.

पेनशन घेतलेले युरोपियन नानकमिशंड आफिसर व सोल्जर यांनीं सिविल सर्विस मधील चाकऱ्या करण्यास हरकत नाहीं, असा विलायत सरकारानें नवीन ठराव केला आहे.

विद्यावृद्धीकरितां व सडकांकरितां सेस म्हणून बंगाल इलाख्यांत जमीदार लोकांवर कर बसलेला आहे त्याविरुद्ध सरकारास अर्ज करण्याकरितां कलकत्यास कित्येक प्रतिष्ठित लोकांची सभा भरली होती. व तींत कांहीं युरोपियन लोकही होते.

अमेरिकेंतील एक प्रधान मि. जानसन साहेब लंडनास गेले आहेत. व त्यांनीं इंग्लंड आणि अमेरिकेंतील एकत्र संस्थानें यांजमध्यें शांति राहण्याच्या संबंधानें एक दोन चांगलीं संभाषणें केलीं.

रशियन लोके फौजानिशीं बुखाऱ्यावर चाल करित आहेत. व तो मुलुख राशियास जोडावा असा त्यांचा इरादा आहे.

मुंबई बंदरास एक जहाज येत असतां आग लागून जळालें. व ७ मनुष्यें ठार मेलीं.

मुळजी ठाकुरसी म्हणून मुंबईचे एक भाटे गृहस्थ विलायतेस जाऊन आले म्हणून त्यांचे जातभाइ त्यांस आपल्यांत घेईनात हें पाहून कित्येक त्यांचे जातीशिवायच्या लोकांनीं त्यांस उत्तेजन येण्याकरितां व जातीची कांहीं व्यवस्था करण्या करितां ५०००० रुपये जमा करून ठेविले आहेत. न दुसऱ्याही जाती अशाच लोकांनीं त्यांस मदत देऊन अशी त्यांची इच्छा आहे.

नामदार गवरनर जनरल साहेबांची स्वारी नागपुरास येईल म्हणून तेथील बंगल्याची वगैरे दुरुस्ती करित आहेत.

हिंदुस्थान सरकारचे कायदे कौंसलांत ४ जागा रिकाम्या झाल्या आहेत. सर एफ हालिडे, सर जान ग्रांट, सर हार्बर्ट एडवर्डस, सर राबर्ट हमिल्टन, सर राबर्ट मोटगोमरी, व मि. सेन या उमेदवारांपैकीं कोणास तरी त्या जेग्या नोकरांत मिळतील.

मुंमई ब्यांकेच्या चौकशीचें मुंबईतील काम संपलें. आतां कमिशनर लोक विलायतेस जाऊन तेथें चौकशी चालू करणार. अखेर काय ठरतें पाहावें.

गवरनर जनरल साहेबांच्या एक्झिक्युटिव कौंसलांतील रिकामे जागेवर कर्नल एच. डब्ल्यु. नार्मन. सी बी. यांस नेमिलें.

सिंध हैदराबादेस पाण्याचा पुरवठा करण्याची योजना केलेली सरकारास मंजूर झाली. यास पैसा पुढील सालच्या मुनसिपल बजेटांत पास होऊन मिळणार.

उदेपुरच्या महाराण्यांनीं हिंदु० सरकारचे कायदे कौंसलांत मेंबर होण्याची आपली इच्छा दाखविली होती. पण ती त्यांचे गुरुजीस व दरबारी मंडळीस आवडली नाहीं.

आनरबल जस्टिस वेस्ट्राप साहेब, मुंबईच्या हायकोर्टाचे जज्ज यांस विलायतेस जाण्याकरितां ३ महिन्यांची रजा मिळाली.

अमदाबादेजवळील धुळेकोट येथील तुरुंग पडला व नदीला पूर आला असल्यामुळें शहरांतून मदत मिळण्याची आशा नव्हती त्यावेळीं त्यावरील सुपरइंटेंडंट यानीं बहुत मेहनत व युक्ती करून कैदींचें संरक्षण केलें. त्याबद्दल सरकारांत त्यांची वहार्वा झाली.

मि. एच रिवेट कार्न्याक नागपुरचे व वऱ्हाडचे काटन कमिशनर यांस व्हाइसराय साहेबांनीं बोलावल्यावरून ते सिमल्यास गेले.

पार्लमेंटच्या प्रत्रकावरून कळतें कीं, हिंदुस्थानांत तिन्ही इलाखे मिळून हल्लीं लश्करी अफिसर स्टाफ व लोकल सुद्धां सर्व ३२०५ आहेत. त्यांचा तपशील असा—कर्नल बंगाल्यांत ६३, मद्रासेंत ५४, मुंबईत २८; लेफटिनेंट कर्नल बंगाल्यांत २४४, मद्रासेंत १८४, मुंबईत १०३; मेजर बंगा० ३१५ मद्रा० २२१, मुंब० १४६; क्यापटन बं० ३६७, म० ३२९, मुं० १७७; लेफटिनेंट बं० ४९० म० २९१, मुं० १९३;

म्हैसुराकडे काफीचें पीक या वर्षीं फार चांगलें आहे. व देशांत रोगराई कांहीं नाहीं.

बडोदा रेलवेचा मेमुदाबादे जवळील मेशवानदीचा पूल पडला होता तो दुरुस्त झाला व त्या वरून गाडी जाऊ येऊं लागली, आतां नर्मदेचा पूल मात्र दुरुस्त होणें शिलक आहे.

बेसनदी कामदारांच्या फर्लो रजेविषयीं कांहीं नियमाचा खर्डा तयार करून हिं. सरकारानें विलायतेस पाठविला आहे.

प्रसिद्ध बाळामांडे यास नव्या मुंबई ब्यांकेमध्यें चाकरीस ठेविल्याचा पुकारा झाला होता पण ती गोष्ट खोटी आहे.

हिरातीलोक स्त्रिया, पुरुष व मुलें मिळून सुमारे १६० कानपुराहुन दिल्लीमार्गें आगगाडींतून जात असतां पोलिसानें पकडले. त्यांच्या जवळ बहुत प्रकारचीं हत्यारें आहेत. व त्यांच्या चालवर्तणुकीविषयीं खुलासा होणें आहे.

भुतानांत नव देवराजा येत्या हिवाळ्यांत निवडील तेव्हा भुतानचे दिवाण व्हाइसराय साहेबांचे भेटीस नजराणा घेऊन येणार आहेत.

सरकारी बातम्यांवरून कळतें कीं फिरोजशहा जीवंत आहे. व रशियन लोकांच्या चालमेलीकडे त्याचा रोख आहे

राणी साहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव प्रिन्स आफ वेल्स आपल्या कुटुंबासहवर्तमान ग्रीस देशांत गेले आहेत.

डेन्मार्कचे राजघराणें रुस देशास गेलें आहे

न्यूझिलंड बेटामध्यें पुन्हा लढाई उपस्थित झाली आहे. सरकारी फौजेचे १० आफिसर व कांहीं शिपायी शत्रूनीं मारिले व कांहीं जखमी केले. कांहीं बंडवाल्यांस पकडलें आहे.

त्रिंबकलाल शिवलाल यांस सुरत जिल्ह्यांत माणिकराम उमियारामचे जाग्यावर मुनसफ नेमिलें. माणिकराम यास ३ महिने सस्पेंड केलें आहे.

वायव्यप्रांतांत ४ डिपुटि कलेक्टर मि. ब्रौन, कुवर लछिमनशिंग, मि. बिलिंग्स व शेख खैरूदीन अहमद यांस आठ आठशें रुपये पगार करून पहिले प्रतींत घातले—तसें दुसरे प्रतीचे ६ डि० कलेक्टर केले व त्यांस पगार ६०० रुपये, तिसरे प्रतीचे १९ पगार ४००, व चवथें प्रतीचे ६६ त्यांस पगार २५० रुपये प्रमाणें ठरविले.

माथेरानास अर्ध्या आगस्ट महिन्या पावेतों ३९१ इंच पाऊस झाला. व महाबळेश्वरास २०९ इंच.

रेलवे.—खंडव्यापासून २१ मैल पुढें बीड पर्यंत आगगाडी चालू झाली आहे. तेथून हरदा ४० मैल आहे तेथपावेतों रेल घालण्याचें काम झपाट्यानें चालू आहे. हरद्यापासून ३० मैल टोवा नदीपावेतों काम बहुतेक पुरें झालें आहे. टोवा नदीपासून ८० मैल नरशिंगपुर पर्यंतचा तुकडा मार्गें च तयार झालेला आहे परंतु सन १८६७ सालांत नदीस मोठा पूर आला होता त्यामुळें त्याचीं कोठें कोठें बरीच बिघडाबिघड झाली आहे. त्याची दागदुजी व कोठें नवी बांधणी चालूआहे. व नरशिंगपुरापासून ५२ मैल जबलपुर आहे. व त्या तुकड्याचें ही काम नर्मदेवरील पुलासुद्धा चालू आहे. व हा सर्व सांधा सन १८७० चे जून महिन्यांत पुरा होऊन मुंबईहून थेट कलकत्यास आगगाडींतून जातां येईल. असें समजलें आहे.

## Correspondence.

### बाहेरून आलेलें पत्र.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस.

वि. वि. पत्रकर्ते महाराज, नमस्कार आपला अंक तारीख ५ चा माझे पहाण्यांत आला त्यांत उमरावतीचे गोविंद सखाराम चीफ कानस्टेबल यांचेविषयीं जो मजकूर लिहिला तो आपणास खरा समजला नाहीं त्याची माहिती आपणास कर्तो, त्यास

या च्यार ओळींचा स्वीकार करावा. केशव यादव हा पोलिसांत कान्स्टेबल होता याची बदली रिझव्हांत झाली. तेथें नौकरीस न गेल्यामुळें साहेबांसमक्ष सदरील कान्स्टेबलास नेऊन त्याचे गैरवर्तणुकीविशीं रिपोर्ट झाला त्याजवरून तो का० बर्तर्फ झाला व पगार दंडांत सुपरिंटेंडेंट् साहेबांनीं जमा केला. ह्या आकसावरून आपणास दुसरे सोबती एक नायब नाझर रामचंद्र श्रीपत, दुसरा रघुबरदास बैरागी, तिसरा अंबुसिंग रजपुत, चवथा पोलिसांतील बर्तर्फ झालेला कोणीएक ग्रहस्थ असे मिळून पांच इसम नाल्यांत चीफ कान्स्टेबलाचे जाण्या येण्याचे मार्गावर जाऊन बसले. हें वर्तमान पोलिसापैकींच एक दद्दुपसाद कान्स्टेबल याणें चीफ का० स जाऊन सांगितलें. त्याजवरून त्यांणीं आपले पोलिसाचे बंदोबस्तानिशीं जाऊन पकडलें. तो मोकदमा मि० फिटजरल्ड साहेब यांजकडेस होऊन त्यांजला पिनलकोड कलम २४३—४४ प्रमाणें शिक्षा झाली. केशव यादव यास ४ महिने सक्त कैद, नाजरास व रघुबर बैराग्यास एक महिना साधी कैद झाली. अंबुसिंग ह्या पुरावा नसल्यामुळें सुटला, पांचवा तर धरलाच न्हवता. याप्रमाणें हकिकत झाली. महाराज, केशव यादव माझे रांडेस घेण्या करितां गोविंदराव चीफ येवढें करून राहिले म्हणून साहेबाजवळ बोलला. तेव्हां जगवार्ता सहजच तशी होईल परंतु वास्तवीक पाहतां ही अदावत रांडेची बिलकूल नाहीं. चीफ कान्स्टेबल असे कर्मांत मुळींच नाहीं. त्यांत रांडतरी कोणची धड आहे? ती वयानें सरासरी ३७ | ३८ वर्षांची असेल, उंचीस पहातां ४ फुट ७ इंच म्हण्यास कांहीं हरकत नाहीं. अवयवांनीं तर स्वर्ग वासच केला आहे. ही कोणाएका ब्राम्हणाची नागपुरांतून ओढलेली आहे. जर ती स्वरूपवंत असती तर नागपुरच न सोडती, यद्यपि सोडती तरी सात रुपयाच्या कान्स्टेबलाचेच माथां कुंकू लावून न बस्ती. याजवरून आपणच विच्यार कराल आणि पत्रद्वारें लाविलेल्या दोषांतून मुक्त कराल अशी आशा आहे. हें पत्र छापण्याकरितां मी सत्यप्रकाशांत दिलें असतें परंतु ते घेणार नाहींत. कारण जसें त्यांचें नांव तशी करणी नाहीं. ज्यांणीं लाडूचें आमंत्रण दिल्हे त्यांचेप्रमाणें ते कर्तात तेव्हां हे कशाचे सत्यप्रकाशकर्ते! आपण मात्र माझ्या गरिबाच्या वाकड्या तिकड्या लिहिण्यास अंगिकारावें, लोभ असावा. तारिख ७ सपटंबर सन १८६८ इ० मुक्काम उमरावती.

एक उमरावतीकर
शोधक.

---

## पाटिल कुळकर्णी यांचा जुलूम.

ज्ञानोदय कर्ते यांस —

वि. वि. महाराज, कांहीं दिवसांमागें आपण आपल्या मोल्वान पत्रांत मामलेदार व फौजदार हे आपलीं जबाबदारीचीं कामें कोणत्या रितीनें चालवितात याविषयीं कांहीं मजकूर लिहिला होता, त्यावरून पाटील कुळकर्णी आदिकरून छोटेखानी कामदार यांच्या जुलुमाविषयीं कांहीं लिहावें असें मनांत येऊन आपणाकडे चार ओळी पाठविल्या आहेत, त्यांस मेहेरबानीकरून आपल्या एका अंकांत जागा द्यावी.

कित्येक गावांमध्यें पाटील व कुळकर्णी असे दोन सरकारी कामदार असतात. पाटिलकीचें काम बहुतकरून मराठे लोक करितात. क्वचित कोठें कोठें मुसलमान व ब्राम्हण आदिकरून जातीचेही पाटिल आहेत. कुळकर्ण्याचें काम तर बहुधा ब्राम्हणच चालवीत असतात. पाटिल कुळकर्ण्यास जरी सरकारांतून विशेष सत्ता व अधिकार नाहीं तरी लोकांवर जुलुम करून त्यांपासून पैसे खाण्याचे इतके मार्ग आहेत कीं, गांवचे लोक कलेक्टर साहेबांपेक्षांही त्यांचें अधिक भय धरितात. जेथें पाटलास सही करण्यापुरतें मात्र ज्ञान असतें तेथें कुळकर्ण्याची चांगली पोळी पिकती.

गावांत कांहीं भांडण किंवा मारामारी झाली तर कुळकर्ण्यानें प्रथम जो गरीब असेल त्याचा पक्ष धरून मामलेदारास अथवा फौजदारास त्याच्या तर्फे एक रिपोर्ट लिहून तयार करावा, आणि तो पाठविण्याकरितां महारास हाक मारून मोठी गडबड करावी. तेव्हां अर्थातच विरुद्ध पक्षाच्या लोकांस फार भय वाटतें म्हणून ते कुळकर्ण्याकडे एकांतीं जाऊन तंटा मिटविण्याकरितां तो मागेल त्याप्रमाणें दहा वीस रुपये देऊं करितात. याप्रमाणें खाऊ मिळाला म्हणजे लागलाच कुळकर्णीबुवाच्या वृत्तींत पालट पडतो. मग वादीस बोलवून सांगावें, अरे तुझा पुरावा कांहीं बरोबर दिसत नाहीं, सरकारांत जाऊन तुझी बुडणूक मात्र होईल. असें म्हणून किंवा दुसरें कांहीं तरी निमित्य काढून तो रिपोर्ट फाडून टाकावा.

गावांत शेताबद्दल अगर दुसऱ्या कांहीं गोष्टीविषयीं वाद चालूं लागला तर उभय पक्षांकडून पाटील कुळकर्ण्यांस पुष्कळ पैसा खाण्याची सवड सांपडती. म्हणून जर असा वाद नसला तर कोणास तरी उत्तेजित करून तो बुध्या उपस्थित करावा. जर कोणी सावकार दुष्ट बुद्धीचा असला तर त्याजपासून पैसा खाऊन खोटे कागद करण्यास त्यास सामील व्हावें, किंवा कुळाच्या मनांत जर पाप असलें तर त्याजकडून पैसा घेऊन सावकारास बुडविण्याची तजवीज करावी. जर गावांतील एखाद्या असामीस आपल्या शेताचा राजिनामा देऊन दुसऱ्याच्या नावें नंबर करून द्यावयाचा असला तर सर्व लिहिणें पुसणें कुळकर्ण्याकडून करवावें लागतें. तेव्हां अशा प्रसंगीं त्यानें दहावीस रुपये उभय पक्षांकडून उपटल्यावांचून काम करूं नये. जर मागितल्याप्रमाणें देण्यास राजी नसले तर तें काम कांहीं तरी निमित्यानें लांबणीवर घालावें.

शेताच्या वरळ्या नीट करणें, विहिरींची तोंडबांधणीं करणें, गावांतील उकिर्डे साफ करणें, गावांत खळें असल्यास काढून टाकणें, इत्यादि गोष्टींविषयीं मामलेदाराकडून हुकूम आला म्हणजे प्रथम तीं कामें करण्याविषयीं लोकांच्या मागें सक्त तगादा करावा, आणि जर कांहीं खाऊ मिळाला तर मग पाहिजे तितका अवकाश त्यांस द्यावा. कित्येक फौजदारी खटल्यांत पंचकयास होतो त्यांत बहुतकरून दोनच्यार गावचे पाटील कुळकर्णी असतात, आणि तेजर असे खादाड असले तर ज्या पक्षाकडून मिळकत होती त्याच्या तर्फे ठराव करितात.

गोपाळ, चित्रकथी, जोशी, कोल्हाटी आदिकरून जे फिरस्ते लोक गावोगावीं हिंडून आपलीं पोटें भरतात त्यांची एखादी टोळी जर पाल घेऊन वस्तीस आली, तर पाटील कुळकर्ण्यास मोठी शिकार आली असें समजावें. त्यांस येऊन एकदोन दिवस होतांच जागल्या व वेसकर त्यांच्या मागें लावून त्यांस सांगावें, तुमच्या म्हशी वगैरे जनावरांचा लोकांस फार उपद्रव आहे, यास्तव तुम्हीं आपलें पाल उपटून लवकर दुसऱ्या गांवीं जा. त्या बिचाऱ्यांस तर आपल्या निर्वाहा करितां महिना पंधरा दिवस तरी तेथें रहाण्याचें अगत्य असतें म्हणून ते पाटील कुळकर्ण्याकडे जाऊन हात जोडून आपल्यास राहूं देण्याविषयीं पुष्कळ विनवणी करतात. परंतु त्यांचा भक्ष त्यांस मिळाल्यावांचून दया कोठून येणार! शेवटीं ते लोक त्रासून घरच्या म्हशीचें दोन चार शेर तूप किंवा तें नसल्यास कांहीं पैसा देऊन त्यांस शांत करतात, आणि मग खुशाल मनास वाटेल तितके दिवस रहातात.

ज्ञानोदयकर्ते महाराज, जोंपर्यंत या लोकांस ईश्वरी मार्ग समजत नाहीं, व यांच्या मनांत देवाचें सद्भय वागत नाहीं तोंपर्यंत अशीं कामें कमी होण्याची कांहीं आशा मला दिसत नाहीं. तुमचा मित्र,

एक खेड्याचा रहाणारा.

---


# Advertisements.
# जाहिरखबरा.

---

## जाहिरनामा.

सर्व लोकांस कळावें कीं सरकारी नोटी वऱ्हाडांत चालविणेंसाठीं इंडिया सरकारानें वऱ्हाड प्रांताला एक भाग करून सदरील भागांत नोटी देण्याची जागा अकोलें जिल्हे पश्चमवऱ्हाड ठरविली आहे.

तारिख १ माहे सपटंबर सन १८६८ इसवीपासून व त्यानंतर सदरील भागांत सर्व प्रकारचें देणेंघेणेंच्या ठरावाविषयीं अकोल्याच्या नोटी कायदेशीर चलन समजाव्या व सदरील भागांत सरकारच्या इरसालांत व दुसरे सरकारचे आदाईस घेतील.

नोटी दिपुटीकमिशनर यांजकडून खालीं लिहिले रितीप्रमाणें देण्यांत येतील त्या येणेंप्रमाणें.

१. इंडिया सरकारचे कायदेशीर नाण्याचे ऐवजीं.

२. सदरील भागांत ज्या दुसऱ्या नोटी चालू करतील त्यांचे बदला.

अकोल्याचे पेपरकरेन्सी अफिसांतून ज्या नोटी खरेदी केल्या त्यांचा पैसा पाहिजे असल्यास डिपुटी कमिशनर अकोला यांचे कचेरींतून अगर मुंबईस पेपरकरेन्सीचे अफिसांतून मिळेल.

वर लिहिलेला जाहिरनामा ग्याझेट आफ् ईडिया यांत प्रसिद्ध होऊन आल्यावरून सर्वत्रांस कळविण्यांत येतें कीं पैशांचे ऐवजीं पाहिजे असेल त्या दराच्या नोटी दिपुटी कमिशनर अकोला यांचे कचेरींतून मिळतील व नोटी देण्याचें आफीस सुटीचे दिवस खेरिज करून दररोज दहा वाजतां खुलें होऊन बारांवर तीन वाजतां बंद होईल व शनवारीं बारांवर एक वाजतां बंद होईल.

मुंबई पेपरकरेन्सीचे कमिशनर यांजपाशीं जितक्या रकमेच्या अकोल्याच्या नोटी असतील तितक्या रकमेपुरत्या मुंबईच्या नोटी अकोला कचेरींत पटल्या जातील.

याखेरीज जी माहिती पाहिजे असेल त्याजबद्दल दिपुटी कमिशनर अकोला यांचे कचेरींत तोंडीं पुसलें असतां मिळेल. तारीख २९ माहे आगस्ट सन १८६८.

C. A. W. DAVIES.
Assistant Commissioner of
Paper Currency.

---

## आक्ट.

सन १८६८चा ९वा
पेशे व धंदे यांवरील कराविषयीं
किंमत च्यार आणे.

---

## नवीन पुस्तक.

### व्यवहारोपयोगी
### तारतम्य.

या नांवाचें नवीन पुस्तक मी नुकतेंच तयार करून अकोल्यास वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खिळेछापावर सुंदर रितीनें छापविलें आहे. शाळांतील मुलांस व गैरमाहित इतर लोकांस बाजारचें शहाणपण कळावयास या पुस्तकाची मोठी मदत होईल याची अष्टपत्री साच्याचीं ९३ पृष्ठें आहेत. किंमत अडीच आणे व डाक हाशील एक आणा पडेल. अधिक प्रति घेणारांस डाकहाशील कमी पडेल. वऱ्हाडसमाचार आफिसांत रोख किंमत पाठवून पुस्तकें न्यावीं. सर्वांस कळावें.

नारो रघुनाथ मोहोळकर स्कुलमास्तर मेहकर.


---

## वर्गणीदारांस विनंती.

गेल्या वर्षाचे आकटोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें, त्यास या महिनाअखेर वर्ष होतें. तर आगाऊ वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आप आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्यायोगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणाराचे आम्ही उपकार मानूं.

सर्व जुन्या वर्गणीदारांचे हिशेब सन १८६७ चे आकटोबर महिन्यापासूनच आम्ही एथें ठेविले आहेत. त्या मागीलचा इकडे कांहीं संबंध नसल्यामुळें कोणास मागणें होणार नाहीं. व रा० गणेश नारायण कोल्टकर यांचा आमचा संबंध तुटला आहे तरी तारीख २० माहे जून सन १८६८ इसवीचे आंत वऱ्हाड समाचार खात्याबद्दल या चालू वर्षाबद्दलचा पैसा घेऊन आफिसच्या नात्यानें त्यांनीं कोणास पावती दिली असेल तर ती त्यांनीं आम्हाकडे रुजू करावी. म्हणजे तो पैसा त्यांस मजुरा देण्यांत येईल. सर्वांस कळावें.

**खंडेराव बाळाजी फडके.**
**आबाजी खंडेराव वकील.**
व० स० चे मालक.

---

## TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers, that their Subscriptions, for the present year, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity of ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

---

| किमतीचे ठराव. | रु. | आ. |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास··· ··· | ६ | ० |
| साल अखेर ··· ··· ··· | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ··· ··· | ३ | ८ |
| सहामाही अखेर ··· ··· | ४ | ० |
| फुटकळ एक अंकास··· ··· ··· | ० | ६ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु. ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिने पर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

---

### नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत··· ··· ··· १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

हें पत्र आकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकारितां छापून प्र०के०

# वऱ्हाडसमाचार.

The Varad Samachar or News of Berar.

VOL. III AKOLA:—— SATURDAY, SEPTEMBER 19, 1868 NO. 38

पुस्तक ३ अकोला, शनिवार तारीख १९ माहे सप्तंबर सन १८६८ इ० अंक ३८.

## वर्गणीदारांस विनंती.

गेल्या वर्षाचे आकटोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें, त्यास या महिनाअखेर वर्ष होतें. तर आगाऊ वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपआपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्यायोगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणाराचे आम्ही उपकार मानूं.

सर्व जुन्या वर्गणीदारांचे हिशेब सन १८६७ चे आकटोबर महिन्यापासूनच आम्ही एथें ठेविले आहेत. त्या मागीलचा इकडे कांहीं संबंध नसल्यामुळें कोणास मागणें होणार नाहीं. व रा० गणेश नारायण कोल्टकर यांचा आमचा संबंध तुटला आहे तरी तारीख २० माहे जून सन १८६८ इसवीचे आंत वऱ्हाड समाचार खात्याबद्दल या चालू वर्षाबद्दलचा पैसा घेऊन आफिसच्या नात्यानें त्यांनीं कोणास पावती दिली असेल तर ती त्यांनीं आम्हाकडे रुजू करावी. म्हणजे तो पैसा त्यांस मजुरा देण्यांत येईल. सर्वांस कळावें.

खंडेराव बाळाजी फडके.
आबाजी खंडेराव वकील.
व० स० चे मालक.

## पुनः वऱ्हाडांतील पोस्ट-आफिसें.

याच महिन्याच्या ५ व्या तारखेच्या अंकांत आम्ही या गोष्टीविषयीं लिहिलें आहे व तेव्हां पुनः इतक्या लौकर आम्हांस हीच गोष्ट लिहावी लागेल असें वाटलें नव्हतें. कारण या एका वर्षांत दहा पांच वेळां पोस्टाच्या गिल्याचे लेख आमचे वर्तमान पत्रांत आले पण त्या खात्याच्या अभिमान्यांनीं कोणी आजपर्यंत आम्हांस जबाब दिला, किंवा चालल्या कामांत कांहीं सुधारणा केली असें आढळलें नाहीं; आज आमचे अकोल्याचे पोस्ट मास्तर मि० स्मिथ साहेब या गोष्टीची वाटाघाट करूं इच्छितात हें पाहून आम्ही त्यांच्या समाधानार्थ कलम धरिलें आहे. आतां त्यांनीं हा विषय अर्ध्यावर मात्र न सोडण्याची मेहेरबानी करावी.

स्मिथ साहेबांनीं आम्हांस एक पत्र लिहिलें तें आम्हीं आजचे अंकांत दाखल केलें आहे. त्यांत मुख्यत्वें दोन मुद्दे दिसतात ते हे—

१ चोविस अवरांत दोन मैल चालतें इतकें वऱ्हाडांतील टपाल मंद नाहीं.

२ अकोल्यांतील लेटरबाक्स म्हणजे लखोटे टाकण्याची पेटी तीन दिवसांनीं एकदा न उघडतां दिवसांतून तीनदा उघडते.

पाचव्या तारखेचे आमचें आर्टिकल मराठींत आहे. व त्याचा जबाब स्मिथ साहेबांनीं लिहिला आहे त्यावरून यांस मराठी भाषा चांगली येत असावी असें प्रथम दर्शनी कोणास वाटेल तर त्यांनीं न फसावें यास्तव आम्ही आधीं सांगतों कीं त्यांस मराठी समजत नाहीं. यानीं केवळ वाऱ्यावर जबाब दिल्हा आहे. मराठी भाषा चांगली समजण्याची योग्यता जर यांच्या मध्ये असती तर हा जबाबच हे न देते. व यांस जबाब देण्याजोगें त्यांत कांहीं कारण ही नव्हतें. अस्तु. त्यांच्या मुद्यांचा आतां विच्यार करूं.

स्मिथ साहेब आपला पुष्कळ दिवसांचा अनुभव सांगतात कीं २४ अवरांत २ मैल टपाल चालतें असें आम्हीं कधींच पाहिलें नाहीं. यावरून त्यांच्या खात्यांतील रनर म्हणजे टपाल घेऊन धांवत जाणारे लोकांस आम्हीं दोष दिला असें त्यांस वाटत असेल तर तें त्यांनीं मनांतून काढून टाकावें. त्यांस आमचा काडीमात्र बोल नाहीं. वऱ्हाडांत पिकापाण्याची आबादी आहे म्हणून दुसऱ्या देशापेक्षां इकडील रनर लोक कदाचित अधिक लठ्ठ असून दुप्पट धावत असतील तर सुखें असोत, त्यांस कोणाची दृष्ट न लागो; पण आमचे प्रांतांत कित्येक पोस्टमास्तर फार व्यवस्थित व विद्वान असल्यामुळें धनगराचे हातीं रामायण याप्रमाणें त्या वेगवान मनुष्यांचा चांगला उपयोग होत नाहीं असें दिसतें. ९ कोसांवरचें पत्र पोंचण्यास ५ दिवस लागतात. दहा बारा कोसांवरील गावचीं वर्तमानपत्रें कधीं दहा दिवसांनीं, कधीं दोन आठवड्याचीं दोन एकदम, व कधीं तीनही एकदम पोंचतात, असें जे आम्हीं लिहिलें आहे तें खरें आहे. व त्याच्या पुराव्यास लागतील तर दहा पांच नव्हे, पण शंभर पन्नासही पत्रें आम्हीं देऊं शकूं. व टपालच्या अनियमितपणामुळें आमचीं कित्येक वर्तमानपत्रें बंद झालीं आहेत तो आमचा तोटा स्मिथ साहेब भरून देत असतील तर तीं अस्सल दस्तऐवजी पत्रेंही आम्हीं त्यांस दाखवूं. सारांश वऱ्हाडांतील रेलवेशिवायचें टपाल मंद आहे ही गोष्ट खोटी ठरणार नाहीं. व तो दोष स्मिथ साहेबांचे तर्वेतीप्रमाणें गरिब बिचाऱ्या रनर लोकांवर आम्हीं ठेवित नाहीं. पेटींत पत्र येऊन पडल्यापासून ज्याचें त्याच्या हातीं तें मिळेपर्यंत जितका काळ मध्यें जातो त्याच्या गणतीवरून टपाल मंद अगर चपळ म्हणावयाचें, व त्या काळांत ज्यांचे ज्यांचे हात त्या पत्रास लागतात त्यांचा त्यांचा तो दोष अगर हुशारी समजली पाहिजे, तर पेटींतून पत्रें काढणारा, त्यावर शिक्का मारणारा, रवानाकरणारा, तें घेऊन धावत जाणारा, पुढें दुसऱ्या पोस्टाचा निवड करणारा, शिक्केमारणारा, वाटणीस देणारा, व पोंचविणारा, इतके लोक या उशिरोच जबाबदार आहेत. व तेही केवळ एका ठिकाणचे लोक नव्हत, शंभर ठिकाणचे असतां त्या सर्वांच्या निर्दोषपणाविषयीं आमचे स्मिथ साहेब प्रतिपादन करितात ही गोष्ट अजब नव्हे काय?

आतां त्यांच्या दुसऱ्या मुद्याविषयीं विच्यार करूं. ते म्हणतात कीं, अकोल्याचे पोस्ट अफिसाची लेटरबाक्स तीन दिवसांनीं एकदा उघडतात असें नाहीं, दिवसांतून तीनदा उघडतात. ही गोष्ट खरी असेल तर स्मिथ साहेब आपलें तेवढें काम बरोबर बजावितात असें आम्ही म्हणूं. तथापि आम्ही अकोल्याच्या लेटरबाक्सचा गिल्लाच मुळीं लिहिला नव्हता, उलटें अकोला, उमरावती, इलिचपूर वगैरे जिल्ह्याच्या हुजूर ठिकाणच्या पोस्ट आफिसास ती गोष्ट लागू नाहीं. अशा अर्थाचें आम्हीं लिहिलें असतां साहेब बहादुरांनीं उगीच हात दाखवून अवलक्षण म्हणवून घेण्यासारखें हें कृत्य कां केलें आम्हांस समजत नाहीं.

आतां अकोल्याचें पोस्ट आफिस थापलें काम किती बरोबर रितीनें करितें तें पाहूं. आम्हीं व आमच्या बातमीदारांनीं पुष्कळ वेळां गाऱ्हाणीं केलीं आहेत तीं बाजूस ठेवून दुसरा पुराना घ्या. प्रदर्शनाचे वेळीं मुंबईहून टाइम्स पत्राचे रिपोर्टर एथें आले होते त्यांणीं असें लिहिलें आहे कीं

"The Postal arrangements here are very bad; I have not yet received a single paper, and although I left my address at the Post-office, my papers and letters have been returned to Bombay. I am not the only one who complains. The nonreceipt of letters and papers is of common occurrence."

याचें भाषांतर.

"येथील टपालखात्याची व्यवस्था अगदी वाईट आहे. मला अजून एकही पत्र मिळालें नाहीं, आणि जरी मी आपला पत्ता त्यांच्याकडे देऊन ठेविला आहे तरी ते माझीं पत्रें व वर्तमानपत्रें मुंबईस परत पाठवितात; व अशीं गाऱ्हाणीं सांगणारा मी एकटाच आहे असें नाहीं. पत्रें न पोंचणें हें इकडे अगदीं साधारण झालें आहे."

याचा स्मिथ साहेब काय जबाब देतात? कदाचित ते म्हणतील कीं त्या वेळीं आम्हीं पोस्टमास्तर नव्हतो तर त्यांस येऊन सारे दोन महिनेच झाले आहेत. इतक्यांत त्यांचा चांगुलपणा वाखाणण्याजोगें आम्हांस कांहीं आढळलें नाहीं. व त्या उलट थोडें दुर्लक्ष आढळलें तें मात्र आतां ओघास आल्यामुळें एथें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. गेल्या महिन्यांत एके शनिवारीं २० रुपयांचीं देखील टिकिटें यांचे आफिसांत आमचे कारकुनास विकत मिळालीं नाहींत. तीं मग सोमवारीं तीन वाजतां डिपुटि कमिशनर साहेबांचे खजिन्यांत मिळून मंगळवारीं आमचें टपाल रवाना झालें. तीन कोसांवरचें एक रजिस्टरपत्र रूरल मेसेंजर मार्फत जावयाचें असतां यांचे आफिसांत ५।६ दिवस पडून राहून जाण्यास मार्ग नाहीं म्हणून माघारें आलें होतें व पुन्हा समजून सांगितल्यावर परत नेलें. ता० २४ माहे आगस्टचा ठाण्याचा सूर्योदय व ता० ७ माहे सप्तंबरचा पुण्याचा ज्ञानप्रकाश आम्हांस अजून मिळाला नाहीं. ते कोणीकडे लटपटले न कळे. नागपुरची गाडी साडेतीन वाजतां येत असून आमचें टपाल कधीं दुसरें दिवशींही येतें. याप्रमाणें अव्यवस्था आहेत. व नुकताच एथील पोष्ट ऑफिसाचा व त्यांतील लोकांचा कांहीं बहिमावरून झाडाही घेतला गेला होता; व स्मिथ साहेबांनीं आम्हांकडे एक जाहिरातही पाठविली होती कीं लखोटे व वर्तमानपत्रें मध्यें फोडून पाहण्याची कोणास सवय झाली आहे त्यास कोणी पकडून देईल किंवा पकडला जाण्याजोगी माहिती देईल तर त्यास ५० रुपये बक्षिस दिले जातील. अशा अशा ढळढळीत गोष्टी असतां मग उगीच "नाकानें वांगीं कां सोलावीं?" पोस्टाची त्वरा सिध्द करण्याकरितां स्मिथ साहेबांनीं आम्हांस पत्र लिहिलें तें सहावे तारखेचें असतां तें गांवचे गांवांत १० वे तारखेस संध्याकाळीं आमचे हातीं आलें! हीही विलक्षण त्वरा किंवा काळजी नव्हे काय? असो. याप्रमाणें स्मिथ साहेबांचे पत्राचा जबाब झाला. आतां बाहेर काय मौज आहे ती ऐका! बुलढाणा हा वऱ्हाडांत एक जिल्ह्याच्या मुख्य कचेरीचा गांव आहे. तेथील पोस्ट मास्तराच्या शहाणपणाचे तारे पहा!

आमचे बातमीदार लिहितात कीं बुलढाण्यास लक्ष्मणराव या नांवाचा पोस्टमास्तर आहे. त्यानें देऊळघाटच्या पोस्टमास्तरचा ४ महिन्याचा पगार खाल्ला, हपिसांतील शिपायांचा पगार दिला नाहीं, सरकारी पैसा वापरला, व सरकारी कामांत हयगय केली इत्यादि आरोप त्यावर असून तो सस्पिंड आहे. व इन्स्पेक्टिंग पोष्टमास्तर रा० गोपाळ नारायण यांनीं त्याचें ऑफिस तपासलें तेव्हां पत्ते दुरुस्त असलेलीं ३६३ पत्रें त्यांस रद्दींत सांपडलीं. त्यांत २५१ नाटपेड, ९६ पोष्टपेड, १२ रजिष्टर, १९ सरकारी, व २५ वर्तमानपत्रें होतीं. इतकीं पत्रें एकदम कशीं राहिलीं याचें आश्चर्य वाटून त्यांनीं बारकाव्यानें पुन्हा झडती घेतली तों आणखी ३९९ पत्रें दुसरीं मिळालीं. त्यांत ३०४ नॉटपेड, ५४ पोष्टपेड, ३ रजिष्टर, ४ सरकारी, व ३४ वर्तमानपत्रें होतीं. यांत अधिक एक आश्चर्य असें कीं त्याच एका लहानशा गावांतील पत्रें १०५ देण्याचीं राहिलीं होतीं. तर अशा राक्षसहृदय पुरुषास राक्षसीच शिक्षा झाली पाहिजे. आम्हीं इच्छा करितों कीं दुसरे पोस्टमास्तरांनीं ही गोष्ट चांगली लक्षांत ठेवावी व जपून वागावें.

रा. गोपाळ नारायण यांनीं हें काम मोठें हुशारीचें केलें व याजबद्दल तिकडील लोक त्यांस नावाजतात तें ठीक आहे. असा चोहोंकडील लबाड्यांचा निरानिपटा लवकर होईल तर फार चांगलें.

## बालनाथ बुवा.

यांचे बाबतींत या आठवड्यांत आम्हांस सहा सात पत्रें आलीं; परंतु त्यांची गोष्ट आम्हीं आतां सोडून देतों. गेल्या दोन आठवड्यांतच त्यांकरितां आमच्या पत्राचे जे कालम खर्च झाले आहेत ते त्यांच्या योग्यतेच्या दसपट अधिक आहेत. सत्यप्रकाशांतील सातारकराच्या लिहिण्याप्रमाणें कोणी देखूं न सकण्या जोगा चांगुलपणा त्यांच्यात आम्हांस कांहींच दिसत नाहीं. व त्याच्या वसुपणाकरितां त्यांचा कोणी सुजन हेवा करील असेंही दिसत नाहीं. दुसरें, देवतेचा प्रसाद त्यांमध्यें तिलमात्र नाहीं. व तसा डौल मिरविणारे बुवांमध्यें जी अक्कल लागते व जिच्यायोगें सामान्य मनुष्यांच्या नजरेपुढें त्यांचें ढोंग उघडें पडत नाहीं, ती देखील यांच्यांत फार कमी आहे, व विद्येचा संस्कार यांस मुळींच नाहीं. कुणबी, माळी, तेली लोकांनीं किंवा तशा तोडीच्या ज्ञानवान श्रेष्ठ जातीच्या लोकांनीं मात्र हे बुवा सजविले तर त्यांचे गुरू साजोत. व त्यांच्या बायकांचीं भुतें ते सुखें

काढीत. मनुष्य शाहण्याचे वेडे कसे होते ते अशा गोष्टीत चांगले कळते.

*POST OFFICES IN BERAR.*

We were perfectly unwilling to say any thing in the matter on this occasion, but necessity, which has no law, has compelled us to do so. All we now intend mentioning on this subject has also been taken notice of in Murathi for the information and enlightment of our readers who dont understand English. In our issue of the 5th Instant the observations we made on the postal irregularity and mismanagement in Berar were not the first time we recorded in our paper; perhaps we did so a dozen of times and that is below the truth, and yet no body said a syllable against it until the other day.

During the last week we have received an epistle from Mr. Smith our Akola Post Master attempting to prove that all what has been advanced in our Journal is false. In acknowledging the receipt of this epistle and giving room to it in our Columns we are extremely sorry to remark that from the language of the letter it seems that Mr. Smith couldnot have studied the rules of etiquette, for if he had done so, he would have avoided some of the ungenteel expressions which he has made use of in the following letter of his.

*Akola, 6th September 1868.*

To,

*The Editor "Berar Samachar"*

*Sir,*

In your Issue of the 5th Instant received this morning your comment freely on the deficiencies of the Berar Post Office, and it is to prove the inaccuracy of your remarks that I now take up my pen, and request you will favor me by giving publicity to the following few lines.

You begin by making one general and sweeping hit at all the Post Offices in Berar, which, according to your account, are any thing but what they should be, and then, in support of your statement, you assert that in some place or places in Berar best known to yourself the shortest time occupied by a letter in travelling over 10 miles is 5 days! All I can say in respect to this is that it is simply absurd, and that never, during the whole course of my experience in the Postal Department, have I known a mail to travel 2 miles in 24 hours! and unless you can prove your statement you must permit me to doubt its correctness. Again; you say that the letter box in my office is not cleared for two or three days together. This, allow me to inform you, is a falsehood, as I am particular in seeing the letter box opened and cleared of its contents, not once in three days but three times a day. Deliveries also are made as early as possible after the arrival of each mail and not, as you affirm, once in every two or three days. It would be only too tedious to recapitulate all the Postal irreqularities which you have, by a powerful exercise of your imaginative powers, brought to light, so I shall conclude by asking you to be more particular in what you say in future, for allow me to remind you, that the value and respectability of a Paper depend solely upon the correctness of the information it affords, and that when its Editor descends to calumny and falsehood, its decline and eventual fall are inevitable. Let some worthier theme, in future, invite your attention, and if you will have your paper an instrument of reproof, direct it against those who are more deserving of reproof, and of these if you will only look about you, you will find there are unhappily too many.

I am your obedient Servant
Henry Smith
Post Master.

The Murathi language is one of the most noble, but difficult and intricate one in the world, and so it is no great wonder if foreigners or those who style themselves *Sahebs* dont catch the exact idea that an article in it conveys. It may be fairly said of Mr. Smith that he could not have understood our article in all its bearing, for if he had, his letter now in types, would not have oppeared and the amount of trouble we have been put to would have been avoided.

Let us now consider the arguments that Mr. Smith has advanced with a view to set our statement at naught. He takes up two points the 1st of which is this. The progress at Post offices in Berar is speedy and not slow as has been represented; and that the Letter Box at this Post office is cleared away three times a day and not once in three days as it has been stated. In reply to this it may be sufely alledged that from the time a letter is posted, dispatched, and delivery made it sometime takes twenty days or there abouts before the letter falls into the hands of the party addressed who resides at a town which is at the distance of 40 miles from the Post office. In other words it occupies the same time that an English mail does in performing its transit from England to Bombay a distance of six thousand miles. We have nothing to say against the poor runners; they perchance travel with the speed and velocity of a railway carriage, and for all this our letters are as slow and tardy in their transition, as we have above alluded and this assertion is fully borne out by the complaints that are continually lodged before us by our subscribers and Correspondents. We would have mentioned the Stations and the individuals therein if Complaints were merely two or three, but they being multifarious, continual, and from hundreds of our friends, we feel it irksome to do so. We will next consider the 2nd point. The Post Master Saheb states that the box is cleared away three times a day indicating evidently that there exists in this Post Office as much regularity and order as is requisite in any postal Department. If our memory serves us aright we never said a word against the clearing of Akola letter box of which so much parade is made; for ought we know it is opened and emptied of its contents three times multiplied by five and yet this does not affect the question at issue in one iota, jot or tittle. A letter transmitted by this office takes, as we said above, extraordinary time to reach the party addressed and who perhaps resides in the environs of Akola. This fact is incontrovertible. The following few lines from the Reporter of the Times of India will sufficiently demonstrate that regularity and order in this Post Office of which Mr. Smith plumes himself do not apparently exist. "The Postal arrange ments here are very bad; I have not yet received a single paper although I left my address at the Post Office, my papers and letters have been returned to Bombay. I am not the only one who complains. The non-receipt of letters and papers is of Common occurrence."

If Mr. Smith affirms that the postal arrangements are good since the time he received Charge of his office, we have to state that a few days ago, we sent our Karkoon to perchase some Stamps at the Post Office, and Mr. Smith replied that there were none left for sale. All this transpired on saturday, and the following day being sunday we had to stop the transmission of our news papers until Tuesday when we sent for the required stamps to the Deputy Commissioner's office and got them, and then forwarded our papers. The Nagpore Train arrives here at about 3 P. M. and yet the letters and papers it brings for our office are not sometimes made over to us until the next day very late. The other day we forwarded a Registered News Paper for transmission to a village not more than 8 miles from the sudder station, but to our great astonishment the Post Master Saheb returned the same to us after retaining it for four days, with an excuse that there were no means of sending it on. We however, sent back the Paper with a suggestion that it might be forwarded by a rural messenger, and so we presume, it was then transmitted to its destination. The letter dated 6th instant which Mr. Smith sent to us for publication in his own defence, fell into our hands on the 10th of this month. Does all this speak much for the good Arrangement of Mr. Smith? We leave this for our readers to judge.

THE GOLD FIELDS IN SOUTH AFRICA.

The following details respecting the discovery of the South African goldfields are taken from a letter of Mr. Carl Mauch to Dr. Petermann in Gotha, published in his "Geographische Mitheilungen" for April last:—

"On the 27th of July, Mr. Hartley told me that while in pursuit of a wounded elephant he had passed several excavations in quartzoze ground, where the former inhabitants of the place, as he supposed must have dug for some metal; of what nature, however, this metal might have been, he was as yet unable to state. Since by his description I concluded that the spot could be reached from our encampment in one day. I took the next day my hammer and went in the direction indicated to make a search. At a distance of about 4½ English miles, I passed a small rivulet, the gravel and sand of which originated from a talcoze gneiss; on its other bank I came on a wide bare plain of brack ground, where at a distance of 1½ miles a white line appeared in marked contrast with the black burned field. When I reached this, I found a quartz vein on some places more than four feet projecting from the ground; and a few paces along this line brought me to a spot which must have been a smelting-place, for in a circle of about ten feet diameter were lying about slag quartz stones, pieces of fire-clay, with ashes and charcoal. About fifty paces further I saw some holes four to five feet deep, made in a widening of the quartz vein, and still further another hole ten feet deep, but filled to the depth of two feet with water, which perhaps had prevented the natives from digging farther. Here I picked up some stones and examined them. They were sulphuret of lead, containing a little silver, of exceedingly fine lustre, and '*gold*' Now I directed my attention to the strike of the vein and made my speculations, which were afterwards verified. Highly gladdened, I fastened my hammer on my belt, shouldered my gun, and hastened, more running than walking, back to the camp to make known this delightful news.

On the 29th of July, early, I went back to the spot, crossed the vein, which strikes north 35° East, and proceeded in a south easterly direction. After twenty minutes I came to a large rivulet, in the sand of which I perceived small bright golden shining particles. Soon after I passed the pist Mr. Hartley had spoken of. They were irregularly placed, one here one there—the quartz, forming as it appeared a bed, was turned over and spread about; close to the brook was a large pit, which had most likely served as a place for washing the gold.

"These pits are situated on a space two miles long by one and a half broad, in the north-east part of which a regular vein has been worked to the depth of six feet. This place however, is covered since with soil to such a degree, that trees seven inches thick are already growing on it. Gneiss forms the base of the goldfield; granite appears occasionally in boulders, at other times in conical hills 150 feet high; diorit occurs in smaller heaps of fragments, accompanied by a greenish-grey hornblende slate; there is also much alluvial soil and at the southwestern end a conglomerate; on some places mica slate is visible. In the northe-east there is a wide plain of brackish ground caused by a whitish yellow limestone, without trees and bush, which generally in these parts cover the ground rather scantily, I must add, however, that high gress prevented a great deal the closer examination of the goldfield.

"The field here spoken of is situated in about 17 degrees latitude, near a tributary of the Umfule, and is distant from the Portuguese settlement Tere, on the Zembezi, about 200 miles."—*Bombay Gazette.*

## वऱ्हाड.

MR. Saunders, C. B., the Resident at Hyderabad, is at present at Bolarum, where he gives a ball to-night at the Residency. The "Madras Athenæum" had a rumour some few days ago that the Resident was about to leave Hyderabad on account of ill health, but there is apparently no truth in the report. It is probable, however, that Mr. Saunders will make a tour through the Berars during the ensuing cold season.—*Bombay Gazette.*

THERE is a rumour among the natives at Nagpore that the Nizam of Hyderabad has paid up the debt due by him to the British Government, and that, consequently, the administration of the Berar country is to be again made over to him. He is believed by some to have brought about this unlikely arrangement by writing to the Secretary of State for India. Accepting as we do the rumour with all due reservation, our only desire in giving publicity to it, is to suggeat that the straw probably indicates the direction of the wind in this instance.—*Dethi Gazette.*

WE hear the Government of India has lately ruled that a uniform rate of deputation allowance of Rs. 250 per mensem should be fixed to all Deputy Commissioners, when appointed to officiate for other officers in the assigned districts at Hyderabad.—*Indian Daily News, Sept. 11.*

THE question of erecting the Central Provinces into a Lieutenant-Governorship has for the present been abandoned, on the score of the great additional expenditure the measure would entail.—*Englishman.*

मेहेरबान सांडर्स साहेब रेसिडेंट हैद्राबाद यांची स्वारी हिवाळ्यांत वऱ्हाडप्रांतीं येणार अशी बोलवा आहे.

निजाम सरकारावर इंग्लिश सरकारचें कर्ज होतें तें फिटलें व आतां वऱ्हाड प्रांत त्यांकडे परत जाणार अशी नागपुरास गप्प असल्याचें दिल्लीच वर्तमानपत्रांत लिहिलें आहे. परंतु त्यावर भरवसा नाहीं.

नागपुराखालीं वऱ्हाड देऊन स्वतंत्र इलाखा व लेफटिनेंट गवरनर करणार असा पुकारा होता. तो बेत विशेष खर्चाचे भीतीनें सरकारानें सोडून दिला असें समजलें आहे.

वऱ्हाडांतील कोणी डिपुटी कमिशनर दुसऱ्या आफिसराकरितां आफिशियेटिंग काम करील तर त्यास महिना २५० रुपये डेप्युटेशन अलवन्स देत जावें असा हिंदुस्थान सरकारानें ठराव केला आहे.

हैदराबादचे रेसिडेंट साहेबांचे क्लार्क आफ दी कोर्टचे जागावर नेमलेले रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण भट हे तिकडे जाण्याकरितां परवांचे दिवशीं इकडून गेले.

वाशिमचे मास्तर रा. रामचंद्र हरी यांस अकोल्याचे हाय स्कुलांत असिस्टंट मास्तर नेमून वाशिमास रा. गोविंद कृष्ण नावाचे ठाण्याकडील एक गृहस्थ नेमिले.

देऊळगांव साकरशा येथील पाटिलकीबद्दल आज दहापंधरा वर्षें तंटा पडून हैदराबाद व कलकत्ता पाहिलेले नागोलकर यांस सालमजकुरचें काम कर्ण्याबद्दल दाखला मिळाला. आतां मारुती वलद मंगाजी हे अपिलास गेले आहेत असें कळतें. व देशमुखही अपिलाकरितां लवकरच निघणार अशी वार्ता आहे.

पैमाष खात्याकडून मोजणी झालेल्या गावीं परंपोक म्हणजे निरुपयोगी म्हणून सोडलेल्या जमिनींत नवीन लागण करून सरकारास न कळवितां पीक खातात अशा प्रकारचे गुन्हे बाळापुर तालुक्यांत कांहीं ठिकाणीं घडून आल्याचा बोभाट झाला आहे. या कामीं तहाशिलदारांच्या कचेरींतून जो कोणी कारकून गांवची कुळरुजुवात करण्याकरितां व बांध वरोळ्यांची दुरुस्ती व कुरणांचे लिलांव करण्याकरितां जातो त्याची सुस्ती आणि पाटिल कुळकर्णी यांची लबाडी याशिवाय काय आहे?

**मेहेकर** मि. गोविंदराव यशवंतराव अकोटचे तहाशिलदार यांस पुत्र झाला हे वर्तमान त्यांचे वडील बंधू मि. त्रिंबकराव यशवंतराव तहशिलदार मेहेकर यांनीं श्रवण करून आनंद प्रदर्शीत केला. व गावांतील सर्व लोकांस साखरा वाटून गरीब गुरीब लोकांस वस्त्रें आणि द्रव्य देऊन चांगलें संतोषीत केलें व गावांतील शेट सावकार आदिकरून सभ्य लोकांनीं सन्मानपूर्वक पान सुपारीचा थाट त्यांच्या येथेंच केला.

मेहेकरास जी सरकारी गढी आहे ती बहुत दिवसांची वैराण आहे तींत "शारंगधर" या नावाच्या देवाचें देवालय गुप्त आहे व कोणी तें खोदून पाहील तर तो देव त्यास तत्काळ प्रचित दाखवितो अशी लोक कर्णोपकर्णी कथा सांगत असतात या भयामुळें आज शेंकडों वर्षें तीं कोणी पाहिलें नाहीं. सांप्रत ही गोष्ट तहशिलदार त्रिंबकरावजी यांचे मनीं येऊन काम सुरू आहे व तें देवालय खचित आहे. व जो भाग त्याचा वर निघाला आहे त्याचा देखावा फार मनोरंजक आहे यामुळें तेथें लोकांची दाटी पाहण्यास विशेष असते. सभामंडप सुद्धां आंत आहे असें म्हणतात. पहावें आतां अखेर काय होईल तें.

**सेशनचे मोकद्दमे.**

कैदी गोविंदा वलद महादाजी रहाणार रिसवड तालुके वाशीम याजवर इं. पि. को. कलम १९३ प्रमाणें खोटी साक्ष दिल्याबदलचा गुन्हा शाबिद झाला सबब त्यास तीन महिन्यांची सक्त मजुरीची कैद दिली

कैदी बुधाशिंग वलद पुरणाशिंग वस्ती नांदेड इलाखा मोगलाई व गुलाबशिंग काजनाशिंग वस्ती दिवळणी परगणे पुसद तालुके वाशीम व चिनापा वलद रामचंद्र अबदा वस्ती दिवळणी तालुके वाशीम. यां पैकीं कैदी नंबर १ याजवर इं. पि. कों. कलम ३९९ | ३९८ प्रमाणें च्याजें शाबित झाल्यावरून ७ वर्षें सक्त कैद व ५०० रु० दंड. न दिल्यास आणखी दोन वर्षें सक्त कैद. व त्यांत तीन महिने एकांत कैद अशी शिक्षा झाली.

कैदी नंबर २ | ३ यांजला कलम ४१२ प्र. डाक्यांतील माल माहित असोन विकत घेतला सबब च्यार वर्षें कैद व दंड ३०० रुपये. दंड न दिल्यास एक वर्ष सक्त मजुरीची कैद अशी शिक्षा झाली. हा बाभुळगावचा खटला होय.

कैदी गुगाजी वलद उमाजी वस्ती मुळाव प्रगणे उमरखेड तालुके पुसद जिल्हा वाशिम याजवर इंडियन पिनलकोड कलम १११ | ४९४ प्रमाणें जारकर्म केल्याचा गुन्हा शाबित झाला सबब त्यास साधी कैद चार महिन्यांची दिली.

कैदी रखमी मर्द पांडु वस्ती गुळाव प्रगणे उमरखेड तालुके पुसद जिल्हा वाशीम इजवर इं. पि. को. क. ४९४ प्रमाणें नवरा जिवंत असतां दुसऱ्याशीं लग्न केल्याचा गुन्हा शाबित झाल्या वरून हिला दोन महिने साधे कैदेची शिक्षा झाली.

पोलिस सुपरइंटेडेंट साहेबांनीं सनदा देण्याकरितां व कांहीं कामांची समजूत देण्याकरितां अकोले जिल्ह्यांतील सर्व चीफ कान्स्टेबल लोकांस एथें बोलाविले व त्या प्रमाणें ते बहुतेक येऊन परत गेले.

## वर्तमानसार.

**भयंकर अपघात**—अमेरिकेंत धरणी कंपानें कांहीं शहरें गडद झालीं. व २२००० लोक चिरडून मेले. आणि नुकसान ३० कोटि रुपयांचें झालें. अशी कालचे मुंबई ग्याझेटांत विलायतची तार बातमी आल्यावरून समजतें! काय हा अनर्थ!

बंगाल प्रांतांतील एका जिल्ह्याच्या कांहीं वकिलांनीं हायकोर्टास अर्ज केला कीं दोहो बाजूचे वकील इंग्लिश जाणणारे आहेत तर त्यांस इंग्लिश भाषेंत खटले चालविण्याची परवानगी असावी. हायकोर्टानें जबाब दिला कीं प्रांतांतील कोर्टांत अमुक भाषेंत काम चालवावें हें ठरविण्याचा प्रस्तुतचे कायद्यावरून हायकोर्टास अधिकार नाहीं. ती गोष्ट सरकारचे अधिकारांतील आहे. तथापि हायकोर्टानें सरकाराकडे तें प्रकर्ण पाठविलें आहे.

नागपुरच्या रेलवे स्टेशनाजवळ युरोपियन लोकांकरितां इस्पितळ बांधताहेत त्यास जी आय पी रेलवेकंपनीनें ७००० रुपयें दिले.

नागपुर व जबलपुर दरम्यानची सडक फार चांगली झाली आहे. नागपुराहून टप्याच्या बैलगाडींतून ६५ तासांत मनुष्य जबल पुरास जातें.

बंगाल, आग्रा, व पंजाब येथील लेफटिनेंट गवरनरांनीं प्रांतांत फिरावयास निघावयाचे त्यांचे खर्चाचा उक्ता ठराव दर. साल १२००० रुपयांचा केला. गवरनर जनरल साहेबांस महिना २८००० रुपये ठरविले. हायकोर्टाचे जडजाचा अजून ठराव झाला नाहीं.

अमीर शेरअली यानें इंग्लिश सरकाराशीं स्नेहसंबंध दृढ करण्या करितां पेशावरास वकील पाठविला आहे.

नेटिव राजेलोकांनीं फौजा ठेवावयाच्या त्या थोडया ठेवाव्या. आणि दारूगोळा वगैरे सामान बाळगावयाचें तें फक्त एक वर्षाचे बेगमीचें बाळगीत जावें. अधिक बाळगूं नये असे विलायतेहून हुकूम झाले आहेत.

इंग्लिशम्यान पत्राच्या बातमीदारानें लिहिलें आहे कीं फिरोजशाहाचा पत्रव्यवहार हिंदुस्थानांतील बहुत मोठमोठ्या लोकांशी आहे. व तो रशियनासाठीं टपला आहे.

मुंबईचे कस्टम्स अधिकाऱ्यांनीं हल्लींच १२ महिन्याचे उत्पन्नाचा वगैरे रिपोर्ट केला त्यावरून समजतें कीं अफुच्या जकातीचें उत्पन्न सदरहू सालांत २,३७,५०,३६१ रुपयांचें झालें. हें गुदस्त सालापेक्षां ५०,४१,३६७ रुपयांनीं अधिक आहे. मुंबईहून चिनास ६,९२,१९,२८७ रुपयांची अफु गेली. गुदस्त साली ५,१३,०२,५६२ रुपयांची गेली होती.

येत्या जानेवारी पासून ५ रुपयांच्या नोटी चालू होणार. व त्या मनिआर्डर आफिसांतून प्रथम चालविणार.

पंजाबांतील मालहरकाटच्या नवाब साहेबांनीं लाहोरच्या युनिवर्सिटीकरितां कांहीं वर्षें दरसाल एक लक्ष रुपयेप्रमाणें काढून ठेविले आहेत. त्यांचें सात वर्षांचें व्याज ३५००० रुपये जमलें आहे. हे नवाब लवकरच विलायतेस जाणार आहेत. व आपला एक बारा वर्षांचा पुतण्या तिकडे विद्याभ्यासा करितां ठेवणार आहेत.

कलकत्याचे सरकारी बंगल्यांचे जुजबी दागदुजीचे पत्रकांत व्हाईटवाशचे खर्चाची रक्कम ७१००० व वर गील्डिंगकरितां ४१००० रुपयांची आहे.

कलकत्याहून हिंदुस्थान सरकारची गादी हलवावयाची नाहीं असा स्टेट सेक्रेटरीनीं ठराव केला. व तें शहर चांगलें वाढविण्याकरितां वर्षास ८ लक्ष रुपये खर्च करण्याचें सांगशन केलें.

सन १८६७ साली बंगाल्याकडे वादळ होऊन लोकांचें नुकसान झालें त्याकरितां लोकांनीं धर्मार्थ पैसा दिला होता त्याची बेरीज ९०९७६ रुपये झाली होती व खर्च सर्व भागून त्यांतून २७३३८ रुपये शिलक उरले असें त्यावरील कमिटीचे रिपोर्टावरून कळतें.

**धारवाड**—(ता० ३ । ९ । ६८) हवा किंचित् उष्ण आहे तरी फारशी [illegible]. दहा बारा वर्षांमागें धारवाडांत भाजी नित की स्वस्त होती तितकी अलीकडे फारच महाग झाली होती. ती यंदा पूर्वींच्या जवळ जवळ म्हणजे एका पैशास १८ दोडकीं हाली मिळतात व यामानानें इतर भाज्या आहेत— पर्जन्य या आठवडयांत एक दोन दिवस थोडथोडा पडला. आणखी १०।१५ दिवस न पडला तरी पिकास धोका यावयाचा नाहीं. यंदा पिकें आबादान आहेत. रिविन्यु सर्वेकडील उमेदवार लोकांची परीक्षा समाप्त झाली. सुमारें १०० असामी पास झाली. पैकीं ३० असामीस जागा मिळाल्या व आणखी सुमारें ५० असामीस आठचार रोजांत मिळतील. बे० स०

**भत्ता**—कलेक्टर साहेब यांचे आफिसांतील दसरदार यांस रोज ३ रुपये, चिटणीस यांस २ रुपये, तीस रुपयांचे आंतील कारकुनास ; ६ आणे, ३० पासून ५० पावेतों ७, आणि ५० पासून ७५ पावेतों १० आणे.

आसि० कलेक्टर साहेब यांचे शिरस्तेदार यांस दरमहा १५ रुपये, व ३० रुपयांचे आंतलि कारकुनास दरमहा १० रुपयेप्रमाणें बारमाही देण्याचा ठराव झाला

तालुक्यांतलि मामलेदार यांजकडील ३० रुपयांचे आंतील कारकुनास रोज पांच आणे व बाकीच्यांस सदरप्रमाणें. वृ. वै.

**सातारा**—या आठवडयांत म्हणण्यासारखा पाऊस पडला नाहीं. हवा साधारण आहे. लहान मुलांस ताप व खोकला यांचा उपद्रव जराच असल्याचें समजतें. धान्याचे दरांत विशेष फेरफार झालेला नाहीं. तूप मात्र महाग झालें आहे. दर मणास ११ पासून १२ रुपये पर्यंत तुपाचे चांगलेवाईटपणाचे मानानें आकार पडतो. सु. सू.

**ठाणें**—पर्जन्य या आठवडयांत थोडाच पडला.

—मि. बोझांकेट अक्. जडज यांस तीन महिन्यांची रजा मिळाली. त्यांचे जागेवर मि. हंटर यांस नेमिलें व त्यांनीं शनिवारीं च्यार्ज घेतला. त्याच दिवशीं मि. बोझांकेट रजेवर निघून गेले.

अरुणोदयाचे एडिटर यांजवर लायबेलची फिर्याद होऊन त्यांस ५०० रु. दंड झाला. या पैकीं २५० रु. फिर्यादी मि. आडिस लोकल फंड इंजि. यास देवविले. सू.

**धुळें**—पूर्वी प्रिन्सिपाल सदरअमीन कोर्टांत कामफार असल्या मुळें त्यांचा निकाल करण्याकरितां नवीन आलेले मदत मुनसिफ यांचे कोर्टास तारीख ९ सप्टंबर पासून सुरुवात झाली आहे. खा. वै.

## Correspondence.

बाहेरून आलेलीं पत्रें.

हैदराबाद (मित्राकडून) ता. ९ स. येथें आज एक महिन्यापासून पर्जन्याची अनावृष्टि आहे. मध्यंतरीं च्यार दिवस झाले एक पाऊस बरा पडला. पुन्हा पर्जन्य नाहीं. गरमी मनस्वी होती.

रसिडेंट साहेब व वर्स्ट असिस्टंट रेसिडेंट उभयतांही आलवालचे छावणींत आहेत. कारण तेथील हवापाणी चांगलें आहे. उभयतांही तेथें असल्यामुळें दहापांच वऱ्हाडप्रांतींचे गरीब लोक कांहीं खटल्याकरितां येथें आले आहेत ते तळमळ करितां आढळतात.

काल रोजीं सरकार आलीचे दिवाण साहेबांची स्वारी अलवालची छावणी पहावयाकरितां सकाळचे नऊ वाजतां जाऊन सायंकाळीं सहा वाजतां परत गेली. सरकार आलीचे तालुक्यापैकीं नबाब कासम सालरजंग सदर तालुकदार लिंगसूर वगैरे हे येथें सुमार एकमहिन्यापासून अफिस सुध्धां आले आहेत व दुसरे सदर तालुकदार आगा साहेब गुरुतीर हे ही त्यापूर्वींच येथें आले असून मांदगीचे कारणामुळें तालुक्यास न जातां येथेंच राहिले आहेत.

वऱ्हाड प्रांताचि अपिलें कितीएक पुष्कळ दिवसांपासून रेसिडेन्सींत शिलक आहेत. यांचा इनसाफ अद्यापि होत नाहीं म्हणोन ह्या प्रांतिच येथें आलेले लोकांची बोलणें ऐकण्यांत आलें आहे.

पुरुषोत्तमराव नागपुरचे स्मालकाज कोर्टाचे रजिस्टर हे रेसिडेन्सी आफिसचे क्लार्क आफ धि कोर्ट नेमल्याचें समजत असून त्यांनला तार जाऊन १५ दिवस झाले परंतु अद्याप येथें आले नाहींत. दोन च्यार दिवसांत येतील म्हणून बोलवा आहे.

वऱ्हाडप्रांतापैकीं देऊळगावराजा येथील बालाजीचे संस्थानचे कारभारी हरिसा रामाक्षा हे दोन अडीच महिन्यापासून अपील करण्या करितां येथें आले असून त्यांनीं अपील करूनही दोन सवादोन महिने झाले अहित पण अद्यापि अपील मंजूर झालें नाहीं.

बाकी वर्तमान विशेष नाहीं.

---

रा- रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः— वि. वि. या वऱ्हाड प्रांतीं प्रथमतः अव्वल इंग्रजी सुरू सन १८९३ सालच्या जून महिन्यांत कारंजा येथें तहशिलदार कचेरी स्थापन होऊन तिचें काम सुरळीत सन १८९६ साला पर्यंत चालत असतां सरकारानें दुसरी एकस्त्रा अशिस्टंट कमिशनरची कचेरी सुरू केली. पुढें दोन्हींही अफिसें सन १८६१ सालापर्यंत निर्वेध चाललीं त्यांचे अमलाखालीं तीन तालुके होते ते येणें प्रमाणें—तळेगावदसासर, ऊण, व कारंजा एकूण तीन. व याप्रमाणेंच जेलखाना सन १८९४ सालांत झाला. तेहि सन १८६२ सालापर्यंत असोन एक युरोपियन डाकटरची नेमणूक होती. व पोलिस अमलदार पैकीं एक मुख्य दरोगा व किरकोळ इनसाफाचे कामाकरितां गावांत एक कोतवाल असें व कांहीं रिसाल्याचे स्वार गावाबाहेर असोन ग्यारिसनचे संत्री लोक थोडेसे होते. पुढें सन १८६१ साल अखेर एकस्ट्रा असिस्टंटची कचेरी उमरावतीस गेली व रिसाल्याची तैनात बंद झाली. व त्याप्रमाणेंच सुरू सन १८६९ सालांत ज्या वेळेस रेलवेची गाडी बदनेरास येऊन दाखल झाली त्यावेळेस बाकी राहिलेली तहाशिलदार कचेरी वगैरे सर्व खातीं कारंजांतून उटवून मोर्तिजापुरास नेलीं. वरकड बिच्यारे रयत लोक व सावकार व वाणी उदमी वगैरे हे सर्व पूर्वी सुंदर असे अवस्थेंत असतां घरें ३३२७ व लोक संख्या त्याचप्रमाणें बहुत होती. आतां ज्या वेळेस सरकारानीं सन १८६७ सालीं खानेसुमरि केली तेव्हां घरें २६२२ व मनुष्यें ११७५० याप्रमाणें होतीं. मागील तुळणा पहाता ७०५ घरें कमीं झालीं तर अर्थांतच लोकसंख्या कमी असावी.

आलीकडेस या शहरांत पूर्ण नजरेनें पहातां सावकार लोक व व्यापारी उदमी व रयत बहुत असोन एवढ्या मोटया वस्तीला पोलिस स्टेशनें दोन एक कसब्याचें व एक टाउनचें व त्यांतून शिपाई लोकांची नेमणूक थोडी तेव्हां गावचा बंदोवस्त कसा रहावा. दुसरे गावांत रस्ते सफाई करितां गाड्या बैल व त्यांजवर जमादार शिपाई व मेहेतर लोक वगैरे यांची नेमणूक असोन पहातां जागोजाग केरकचरा व रस्त्यांतून गवत वाढलेलें असोन अशांत एक बाजूला जरा का पाऊल टाकीन तर इतर जीव जंतूची भीती त्यांतून चुकवा चुकव करून रात्रीची शांत निद्रा घ्यावी तीही येत नाहीं. कारण कीं गावांत चहूकडेस एक चतुर्थांश ओसाड खिडार रस्त्याचे बाजूस व हरएक ठिकाणीं असोन चोरांचा केवळ सुळसुळाट. निदान आठवड्यांत एक दोन वेळां चोऱ्या झाल्यावांचून दिवसच जात नाहीं व तशांत वाटेवर गुरें काळोखांत बसलेलीं असतात. जाणारे येणारे लोक अडखळून त्यांचे शरिरास इजा होते. मग सरकारानीं गावोगावीं कोंडवाडे बनाऊन व त्यांजवर मुख्त्यार पाटिल करून गुरांचा बंदोबस्त केला आहे तें कांहींच नाहीं, तर त्याचा उपयोग काय? आणि कोंडवाड्यांत गुरें आलीं व गेलीं किती ह्याचा तर हिशोबच नसेल मग ज्याचे मनास वाटेल त्याणें तसें करावें ह्या पासून रयतेस सुख नसून सरकारचें नुकसान अवश्य होत असेल.

सरकारानीं प्रत्येक तालुक्यांत जेथें दोनशें घरांची वस्ती आहे तेथें म्युनिसिपल कमिटी स्थापन केली. मग कारंजें येथें तर तीन हजार घरें असून काय कारणानें म्युनिसिपाल कमिटी स्थापन केली नाहीं हें मोठें आश्चर्य आहे. तर याजकडेस तहाशिलदार लोक बिलकुल नजरच देत नाहींत. केवढी चुकीची गोष्ट सांगावी असो याजकरितां तहशिलदार यांणीं हरयेक प्रकारें लोक सुधारणुकेच्या बंदोबस्ताविषयीं सरकारास रपोट करून जसें इतर तालुक्यांत मुनासिपाल कमिटया स्थापन केल्या त्याप्रमाणें येथें एक कमिटी स्थापन करून व्यवस्था नीट ठेवावी म्हणजे गांवची सुधारणा उत्तम प्रकारची होईल. मुख्यत्वेंकरून मुनासिपाल कमिटीच्या लोक सुधारणुकेच्या बाबदींत तहाशिलदार लोक यांची मदत अवश्य असली पाहिजे.

ह्याकरितां या सर्व विषयाकडेस सरकारानीं मेहेर नजर देऊन गांवचे किरकोळ बंदोबस्ताकरितां व मुनसिपाल कमेटीकरितां असे अमलदार अवश्य नेमून व गांवचे पोलिस पट्टीचा पैसा दरवर्षी जमा होतो त्यांतून सर्व खर्च जातां बाकी शिलक राहील तो गांवचे सुधारणुकेस लावतील तर रयतेचें नुकसान न होतां अव्यवस्था जाऊन सुधारणूक चांगली होईल. तसेंच एक गांवांत लायब्ररी बसविल्यास अधिक उत्तेजन येऊन लोकांचा अज्ञानपणा जाईल आणि दिवसानुदिवस सुधारणा वृद्धीस पावेल सदर्हू लायब्ररीबद्दल जो खर्च लागेल तो गांवकरी खुषीनें देण्यास सिद्ध आहेत. पत्रकर्ते महाराज, सदर्हू अव्यवस्थेच्या विषयाकडेस लक्ष देऊन सरकारास सिफारस करून सदर्हूचा बंदोबस्त जरूर होईल अशी तजवीज व्हात्री म्हणजे रयत वगैरे सर्व लोकांच्या हरएक बाबिच्या अडचणी दूर होतील.

कारंजाचा एक बारीक
चौकस.

---

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.— वि. वि. खालील चार ओळींतील मजकुराचा निवाडा आपले मतावरतीं राहिला आहे, तर या चार ओळी आपण आपल्या सुंदर पत्रीं छापून त्यावर आपला अभिप्राय दिल्यास फार आभारी होईन.

दोन पक्षकारांमध्यें एकाचें म्हणणें असें आहे कीं, इंग्रजी विद्येचा अंत एक्या आयुष्यांत पुरा होत नाहीं. व त्यांतील सर्व ग्रंथही वाचले जात नाहींत, परंतु मराठी प्राकृत या विद्येचा अभ्यास तितक्या आयुष्यांत पुरा होतो व उपलब्ध आहेत तेवढे ग्रंथही वाचले जातात. व दुसऱ्याचें म्हणणें असें आहे कीं, ज्याप्रमाणें इंग्रेजीची गोष्ट आहे त्या प्रमाणेंच मराठी प्राकृताची ही गोष्ट आहे, हीं उभयतांचीं मतें आपणास कळविलीं आहेत यांत कोणतें मत खरें याचा उलगडा आपण आपल्या समर्पक व खोल विचारानें केल्यास दोन्हीही पक्षांचें शांतवन होणार आहे कळावें हे विनंती.

एक वाद विवाद ऐकणारा
चिखलीकर फक्कड.

*** इंग्लिश व मराठी ग्रंथांची गोष्ट बिलकुल सारखी नाहीं, नुसते मराठी म्हणजे प्राकृत कवितेशिवायचे ग्रंथ तर फारच थोडे आहेत. कदाचित हजाराचेही आंत भरतील. व यांस मोरोपंती, वामनी, मुक्तेश्वरी इत्यादि प्राकृत कवितावध्ध ग्रंथ जोडले तर ही संख्या दुप्पट अगर तिप्पट होईल. परंतु इंग्लिश ग्रंथाशीं हें प्रमाण कितिअल्प आहे म्हणाल तर समुद्राशीं जशी एक विहीर. लंडन शहरांतील एका लायब्ररींत सात लक्ष पुस्तकें आहेत व ती संख्या पारिस शहरांतील लायब्ररीच्या पुस्तक संख्येपेक्षां कमी आहे असें विलायत पाहून आलेले शेट करसनदास मुळजी सत्यप्रकाश नामें गुजराथी पत्राचे एडिटर यांनीं सांगितलें आहे. यावरून इंग्लिश सर्व ग्रंथ वाचूं म्हटलें तर एका मनुष्याचें आयुष्य तर काय पण त्यानें आपल्या पुढील पिढीस तें व्रत लावून दिलें तर १०० पुरुषांच्यानेंही ग्रंथ भरणा संपावयाचा नाहीं, व दररोज नवे ग्रंथ होताहेतच, तेव्हां सर्व वाचले जाण्याची गोष्ट कशास पाहिजे?

त्याचप्रमाणें मराठी ग्रंथ जरी कमी आहेत तरी कोणा एका मनुष्यानें ते सर्व वाचिले असल्याची गोष्ट अश्रुत आहे. व अशी कोणास रुची नसते. तथापि संख्या संबंधानें त्रैराशिक प्रमाणच पाहिलें तर मराठी ग्रंथ थोडया वर्षांत वाचून पुरे होतील असें आम्हांस वाटतें.

ए. व. स.

---


## Advertisements.
## जाहिरखबरा.

## नोटिस.

डिपुटी कमिशनर साहेब बहादुर जिल्हा बुलढाणा यांजकडून:—

सर्वांस कळावें कीं कसबे लोणार येथील तळ्यांतील खाराचा लिलांव तारीख १ माहे नवंबर सन १८९८ इसवी रोजीं आगगाडीचे स्टेशनावरील मलकापुर येथें दिवसां ११ बाजतां दिपुटी कमिशनर साहेब बहादूर यांचे समोर तीन वाजतां केला जाईल.

तळयासंबंधी व लिलावाच्या शर्तीसंबंधी विशेष माहिती डिपुटी कमिशनर साहेब बहादुर जिल्हा बुलढाणा यांजकडेस अर्जी केली असतां समजण्यांत येईल. कळावें तारीख ७ माहे सपटंबर १८९८ इसवी.

C. HORDERN
*Officiating Deputy Commissioner.*

---

**नोटिस**—जानजी वल्लद फताजी मोहाड वस्ती अडगांव तालुके अकोट, यास शिवराम वलद मानाजी पाटील वस्ती अडगांव. याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे मजला रुपये २०० देणें त्यांत आपले उभैताचे शराकतीचे शेतांतील. सन् १२७५ व १२७७ दोन सालचा माल रुपये ४०४॥चा तुम्हीं माझे हिश्याचा नेला आहे, बाकी रुपये माझे घेणें निघतें. सदरहु मालाचा व तुमचे रुपयाचे व्याजाचा हिशेब करून माझे नक्की घेणें तुम्हांकडेस किती रुपये निघत आहेत ते मागण्या करिता तुम्हांकडेस चारवेळ आलों असतां हिशेब करून रुपये दिल्हे नाहींत यास्तव यानोटिसीचे तारखेपासून बारादिवसांचे आंत हिशेबाची सफाई करून जी रकम निघेल ती द्यावी सदरहू मुदतींत हिशेब न दाखविल्यास व रुपयें न दिल्यास तुम्हांवर दिवाणींत फिरयाद करून नोटिसीचे खर्चासुध्या रुपये घेतले जातील. कळावें तारिख ९ माहे सप्तंबर सन १८९८इसवी मुक्काम अडगांव.

( सही ) शिवराम वलद मानाजी पा०
नि० खुद.

---

**आक्ट.**
सन १८९८चा ९वा
पेशे व धंदे यांवरील कराविषयीं
किंमत च्यार आणे.

## जाहिरात.

खालीं लिहिलेलीं पुस्तकें रोख किंमत पाठविली असतां ताबडतोब पाठविलीं जातील.

१ हाडन्स समीकरणाचें सर्व पृथक्करण. किंमत टपालहशील सह८१०
२ प्रश्नसमुदाय पृथक्करण. टपाल हशील सह. .... .... ८६
३ उजळणीचा भाग दुसरा. किं० ८२
४ व्यवहारोपगी तारतम्य. किं० ८२८६

हीं पुस्तकें एकआणा हशीलांत सुमारें ३ पाठविली जातील.

किमतीचा पैसा आकोलें येथें खंडेराव बाळाजी व उमरावतीस वामनगोविंद रानडे यांजकडे किंवा मेहेकरास आमचेकडे पाठवावा.

( सही. ) नारो रघुनाथ मोहोळकर
मास्तर मेहेकर.

---

## जाहिरात्त.

**वऱ्हाडसमाचार** वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं. त्यांस कळावें कीं, ता० ३० माहे सपटंबर सन १८९८ इसवीचे आंत त्यांनीं बाक्यांचा उलगडा करावा. नाहींपेक्षां दरमहा दररुपयास अर्धआणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता० १९ माहे सपटंबर सन १८९८ इ०. **वऱ्हाडसमाराचे मालक.**

---

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत नुकतेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ८६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल. व. स. म्यानेजर.


---

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers, that their Subscriptions, for the present year, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity of ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

---


| किमतीचे ठराव. | रु. | आ. |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास... ... | ६ | ० |
| साल अखेर ... ... ... | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ... ... | ३ | ८ |
| सहामाही अखेर ... ... | ४ | ० |
| फुटकळ एक अंकास ... ... ... | ० | ५ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु. ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिने पर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

---

**नोटिसा वगैरे छापण्याचे दर.**

१० ओळी पर्यंत... ... ... १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ८१८६

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

हें पत्र आकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकारितां छापून प्र०के०

# वऱ्हाडसमाचार.

The Varad Samachar or News of Berar.

VOL. III  AKOLA:— SATURDAY, SEPTEMBER 26, 1868  NO. 39

पुस्तक ३  अकोला, शनिवार तारीख २६ माहे सप्तंबर सन १८६८ इ०  अंक ३९.

## दसरा.

आजच्या मोठ्या सणाचा व आमच्या वर्तमान पत्राचा दिवस एक झाला म्हणून आम्हीं डबल संतोष मानितों. व हें आम्हीं आपलें पत्ररूप दसऱ्याचें सोनें सर्वांचे अगोदर वाटितों. सणाविषयीं विचार केला म्हणजे ते चालू झाले त्यावेळची लोक स्थिति समजते व त्यावरून कित्येक बोध होतात. शिमग्याचा सण रानवट व दांडगा आहे. दिपवाळीचा सण उधळ्या व ऐषआरामीचा आहे. कांहीं सण अवतारी पुरुषांच्या स्मृतीस्तव आहेत. कांहीं उपोषणाचे आहेत, काहीं बायकांचे आहेत. इत्यादिकांत दसऱ्याचा सण पहातां चांगला मौजेचा आहे. व फारसा दोषावह नाहीं.

मनुष्यास एकच एक वेध चऱ्हाट वळण्यासारखा लागून राहिला म्हणजे त्यास हुशारी राहत नाहीं, व ताजेपणा येत नाहीं; याजकरितां मध्यें कांहीं विश्रांती व कांहीं टूम पाहिजे, म्हणजे बेतबात चांगला जमतो. मनुष्याच्या वर्षाच्या व्यवसायांत सणाची योजना त्यास हुशारी आणि ताजेपणा आणण्याकरितांच असावी असें दिसतें व सणही परोपरीचे आहेत ही मोठी गंमत आहे.

दसरा हा साडेतीन मुहूर्तांतील एक मुहूर्त आहे. या दिवशीं कांहीं नव्या विद्येस आरंभ केला, किंवा कांहीं नवीन वस्तु ग्रहण केली तर ती शुभदायक, सुखदायक व सुलभ होते असें मानिलेलें आहे. राजेलोक दसऱ्याचे दिवशीं स्वारीस निघतात. व दूर नाहीं गेले तर सीमोल्लंघन तरी करून परत येतात. लोक आपल्या मुलांस या मुहूर्तानें प्रथम शाळेंत पाठवितात. नवें वस्त्र प्रावर्ण या दिवशीं घेतात, निदान वापरावयास तरी या दिवशीं काढितात. सुवासिक तेलें लावून नाहतात, सुग्रास भोजन करितात, चांगले पोषाक करितात, आप्त इष्ट मित्र यांस भेटतात. सारांश गरीब गुरीब व दीनदुबळे या दिवशीं आपली नित्याची हलाखी व दुःख बाजूस ठेवून मनाची रमवणूक करितात. आज दुर्मुखलेलें असूं नये, द्वाडवाणें असूं नये, रागावलेलें असूं नेय, वाईट करूं नेय, वाईट बोलूं नेय, वाईट वापरूं नये म्हणजे वर्षभर आनंद होतो; नाहीं तर दुश्चिन्हानें वर्षभर नाट लागतो अशी एक या साडेतीन मुहूर्ताविषयीं भाविकपणानें लोकांची समजूत पडून गेली आहे त्यामुळें आज जो तो आनंदी राहण्यास जपतो. श्रीमान लोकांचे घरांतील उंची वस्त्रें व मोलवान दागिने आज बाहेर फडकावयाचे, घोडे शृंगारावयाचे, व कसबी लोकांनीं आप आपल्या कसबांच्या हत्यारांची आज पूजा करावयाची आहे. आज शिपाई आपले तरवारीची पूजा करील, कारकून आपले दप्तराची पूजा करील, साळी आपले मागाची पूजा करील, न्हावी आपले धोकटीची पूजा करील. देवीची तांत्रिक पूजा तर नऊ दिवस शाक्तांकडे माजावयाचीच व आज तर घबाड पूजा. असा हा आज पूजेचा पर्वकाळ होईल. असो दसऱ्यास विजया दशमी असें नाव आहे. व पुराणांतरीं याची कथा अशी कतों कीं, महिषासुर नामें कोणी दैत्य प्रबळ झाला होता त्याचा परमेश्वराच्या शक्तीनें देवी अवतार धारण करून या दिवशीं वध केला व विजय मिळविला. त्या स्मारक गोष्टीसाठीं राजेलोक आज हेले मारितात, कोणी बकरीं मारितात व इतर लोक गांवचे हद्दीवर जाऊन शमीपूजन करितात. या दिवशीं सोनें वाटण्याची एक चाल आहे. म्हणजे शमीच्या किंवा आपट्याच्या पानास आजचे दिवशीं सोनें म्हणतात. व तें इष्ट मित्रांस वाटितात, श्रेष्ठांच्या घरीं जाऊन त्यांस देतात, वाटेंत भेटणाऱ्या ओळखीच्यांस देतात, व आपले घरीं बायका मुलांसही देतात. व बायकाही आपले पुरुष विजयी होऊन आले म्हणून त्यांस रात्रीं अक्षवण करून ओवाळितात. त्यावेळेस ओवाळणीही या सोन्याचीच होते. व घरांत या दिवशीं जिकडे तिकडे पुतळ्या व लगडी विपुल होतात. मग दुसरे दिवशीं केराबरोबर त्या टाकून देतात. असें हें आजच्या सणाचें कृत्य आहे.

आतां आपण याविषयीं थोडा विच्यार करूं. उत्साहार्थ सण करणें किंवा पाळणें अयोग्य नाहीं. व वहिवाटीवरून पाहिलें असतां पृथ्वीवर जे अनेक देश आहेत त्या सर्वांत असे कांहीं कांहीं सण आहेत. आतां हें खरें कीं सणाचे जसे चांगलें वाईट स्वरूप असेल तसें त्या देशच्या लोकांचें स्थितीचें स्वरूप अन्यत्र समजतात. हल्लीं या सृष्टीवर सुधारलेलीं म्हणून जीं राष्ट्रें आहेत त्यांचे इतिहास पाहिले असतां त्यांतही पूर्वीच्या धर्मभोळ्या व वेड्या वेड्या गोष्टी आढळतात. त्यापेक्षां आमच्याच अशा प्रकाराबद्दल इतर लोकांनीं आम्हास हसावयास पाहिजे असें नाहीं. तथापि निर्मल ज्ञान दृष्टीनें व सारासार विच्यारानें पाहिलें असतां यः कश्चित दुष्ट दैत्यानें म्हशीचें रूप घेऊन पृथ्वीवर अजिंक होऊन प्रलय मांडिला आणि सर्व शक्तिमान परमेश्वर जास इच्छामात्रेंकरून अनंत ब्रम्हांडें क्षणांत निर्मितां येतात व त्यांचा लयही करितां येतो त्यानें बायको होऊन त्याचा पराभव केला ही गोष्ट शब्दशः खरी मानणें व झाडपाल्यास सोनें म्हणून तें वाटण्याचा पोरांच्या खेळासारखा आच्यार पुढें चालविणें या गोष्टी विसंगत व अप्रयोजक दिसतात यांत संशय नाहीं. परंतु अशा गोष्टींवरील लोकांची श्रद्धा जाण्यास व खरा समज पटण्यास त्यांमध्यें नुकतीच बीजारोपित झालेली खरी विद्या शक्ती विशेष वर्धमान झाली पाहिजे व असें होण्यास अजून बराच काळ पाहिजे. अस्तु. त्या गोष्टीचें प्रस्तुत आपण असें रूप करून पाहूं—आपले भरतखंडांत आलीकडे कित्येक वर्षें अज्ञान, दुराग्रह, खोटे समज इत्यादि प्रबल झाले आहेत हेच कोणी महिषासुर आहेत व ते आपल्या मोठमोठ्या झपाट्या व आडव्या तिडव्या बळकट शिंगानीं हुंडारून आपणावर चवताळून स्वारी करित आहेत. तर त्यांचा विध्वंस करावयास आपल्या अंतर्यामीं सुविद्यादेवीचा अवतार व्हावा व तिच्या ज्ञानवान पराक्रमानें त्या दुष्ट असुरांचा वध व्हावा यासाठीं आज साडेतीन मुहूर्तांतील दसऱ्याचे सुमुहूर्तानें परात्पर परमेश्वरास मनोभावें प्रार्थावयास आज आरंभ करूं. ती देवी नवादिवस नवरात्र निद्रिस्थ पडून [illegible] दिवशीं तिनें हे [illegible] करावें तर आपणामधील ही ज्ञान देवी पुस्तकरूपानें फार कोदींपासून [illegible] गेली आहे. तर आतां हिचें लवकर जागृत व्हावें व त्या अज्ञान दैत्याचा वध करून विजयी व्हावें म्हणजे देव पावला असें समजून आपण आनंदानें हें सोनेंच वाटूं. अहाहा! ईश्वराचा या गोष्टीस आशीर्वाद असो.

---

## प्रसन्नकुमार ठाकूर.

THE LATE HON'BLE
PRASANNA KUMAR THAKUR
C. S. I.

गेल्या महिन्यांत बंगाल्यांतील आणखी एक प्रसिद्ध पुरुष मरण पावला. गेल्या जानेवारी महिन्यांत बाबू रामगोपाळ घोस हे मरण पावले त्या वेळेस आम्ही यांच्या आयुष्यवर्तनाची हकीकत लिहिली, आतां बाबू प्रसन्नकुमार ठाकूर, यांच्या आयुष्यवर्तनाची हकीकत देण्याचा प्रसंग आला आहे. बाबू प्रसन्नकुमार हे गेल्या आगष्ट महिन्याच्या ३० व्या तारखेस कलकत्ता एथें मरण पावले. यांच्या मरणानें यंदा [illegible] सालांत आमच्या बंगाली बांधवांचें हे दुसरें मोहोरें गेलें. बाबू प्रसन्नकुमार, हे सध्याच्या काळांत बंगाल्यांतलि नेटिव लोकांचे पुढारी असून गवर्नर जनरल साहेबांच्या कायदे कौन्सिलचे मेंबर होते. बंगाल्यांतील या ठाकूर कुळांत बाबू प्रसन्नकुमार हेच एवढ्या प्रसिद्धीस आले असें नाहीं. प्रसन्नकुमार यांच्या पूर्वजांतही पुष्कळ प्रसिद्ध पुरुष होऊन गेले. वेणी संव्हार नाटकाचा कर्ता भट्टनारायण, हा या कुळाचा मूळ पुरुष होय. भट्टनारायण यांच्या वंशांतलि धनंजय नामक पुरुषानें निघंट हा ग्रंथ केला, व धनंजय हा लक्ष्मीसेन राजाच्या कारकीर्दीत न्यायाधिशाचे जागेवर होता. भट्ट नारायण यांचा वंशजापैकीं, [illegible] वंशज हलायुध व पुरुषोत्तम विद्या वागीश यांणीं कित्येक संस्कृत ग्रंथ केले त्यांपैकीं, त्रिकांडशेष, हारावली व एकाक्षरी कोश हे होत. प्रसन्नकुमार यांच्या पूर्वजापैकीं, कोणी एक पुरुष प्रथम गोविंदपूर एथें येऊन स्थाइक झाला. गोविंदपूर हें प्रथम लहानसें खेडें होतें व तेथें इंग्रज सरकारानें किल्ला बांधल्यापासून तें शहर झालें व त्यासच आतां कलकत्ता असें म्हणतात. प्रसन्नकुमार यांचा बाप गोपी मोहन, हा चांगला विद्वान होता. यास इंग्रजी, फ्रेंच, पोर्टुगीस, संस्कृत, फार्शी, व उडदू, इतक्या भाषा येत होत्या. प्रसन्नकुमार यांसही इंग्रजी, संस्कृत, व फारशी ह्या भाषा उत्कृष्ठ येत होत्या. प्रसन्नकुमार लहान होते त्या वेळेस, आतां ज्याप्रमाणें इंग्रजी भाषेचा प्रसार झाला आहे तसा नव्हता, व आतां ज्याप्रमाणें इंग्रजी शिकण्यास सोयी झाल्या आहेत तशाही त्या वेळेस नव्हत्या. तथापि प्रसन्न कुमार अठरा वर्षांचे झाले नाहींत तोंच यांणीं एक इंग्रजी वर्तमानपत्र काढलें, याजवरून प्रसन्न कुमार यांस इंग्रजीचें ज्ञान किती होतें, हें सहज लक्षांत येईल. प्रसन्न कुमार यांचें घराणें श्रीमान असते तरी आमच्या देशांतील श्रीमंताची मुलें बहुधा ज्या प्रमाणें निपजतात त्या प्रमाणें प्रसन्न कुमार यांचें झालें नाहीं. लहानपणापासून तो मरेपर्यंत यांणीं आपलें मन विद्याभ्यासांत व लोककल्याणाकडे घालविलें. यांणीं संस्कृत पुस्तकें पुष्कळ छापून प्रसिद्ध केलीं. विवाद चिंतामणि या पुस्तकाचें इंग्रजी भाषांतर करून तें छापलें. प्रसन्न कुमार यांस कायदे शिकण्याचा प्रथमपासूनच नाद असे व यांणीं केलेला कायद्याचा अभ्यास यांस प्रसंगीं उपयोगी पडला. व्यापारांत तोटा येऊन जवळचा बहुतेक पैसा गेला त्यावेळेस प्रसन्न कुमार यांणीं कलकत्ता एथील सदर अदालतींत वकिली करण्यास आरंभ केला. प्रसन्न कुमार वकिली करूं लागण्यापूर्वी सदर अदालतींत प्रतिष्ठित हुशार गृहस्थ वकिली करित नसत. परंतु वकिली करणें हा युरोप खंडांत किती प्रतिष्ठित व सभ्य धंदा समजतात हें प्रसन्न कुमार यांस इंग्रजी चांगलें येत असल्यामुळें माहीत होतें. याजकरितां नेटिव लोकांस या धंद्याची अभिरुची लागावी व आपणही पैसा मिळवावा या हेतूनें यांणीं वकिली करण्यास आरंभ केला. प्रसन्न कुमार वकिली करूं लागले म्हणून सदर अदालतींतील जज्जांसही फार चांगलें वाटलें. यां जज्जापैकीं प्रसन्न कुमार यांचे बहुतेक जज्ज स्नेही होतेच. कलकत्याच्या सदर अदालतींत त्यावेळेस उडदू भाषेंत कोडताचें काम चालत असे. परंतु प्रसन्न कुमार यांस फारशी भाषा चांगली येत असल्यामुळें काम करण्यास मुळींच अडचण पडली नाहीं. प्रसन्न कुमार वकिली करूं लागल्यावर दुसरेही हुशार व प्रतिष्ठित गृहस्थ सदर अदालतींत वकिली करण्यास येऊं लागले. प्रसन्न कुमार यांस सर्व कायद्यांची फारच चांगली माहिती होती. त्यांत हिंदुधर्म शास्त्रांत तर हे निष्णात होते. हिंदु धर्मशास्त्राविषयीं कोणास कांहीं संशय आल्यास त्याचें प्रसन्न कुमार यांणीं निराकरण केलें म्हणजे तें शेवटचें निराकरण असें समजत. गेल्या ४० वर्षांत जे कायदे झाले त्या कायद्यांची यांस फार चांगली माहिती असे व यांपैकीं बहुतेक कायद्याविषयीं सरकारानें प्रसन्न कुमार यांचें मत घेतल्याखेरीज ते पास केले नाहींत. "हिंदुपेट्रिअट" पत्रकर्त्यानें यांस "चालती बोलती" लायब्ररी असें म्हटलें आहे. म्हणजे यांस कायद्या विषयीं व इतर गोष्टींची इतकी माहिती असे कीं, कोणास कांहीं गोष्टींची माहिती पाहिजे असल्यास एकाद्या मोठ्या लायब्ररींत जशी माहिती सांपडते त्याप्रमाणें यांजपाशीं गेलें असतां हे माहिती सांगत. यांनीं वकिलीचें काम फार दिवस केलें असें नाहीं. वकिलीच्या कामांत बराच पैसा मेळविल्यावर त्यांणीं तें पुनः सोडून दिलें. बंगाल्यांत "ब्रिटिश इंडिअन असोसिएशन" नामें नेटिव लोकांची प्रसिद्ध सभा आहे ती सभा प्रसन्न कुमार ठाकुर यांणींच स्थापन केली. या सभेचें सरकारांत इतकें वजन आहे कीं, अमुक गोष्ट करावी किंवा करूं नये असें जें काहीं सभेच्या मार्फत लिहून जातें त्याविषयीं सरकारास विचारच करावा लागतो. लार्ड डालहौसी, म्ह-

णून जे हिंदुस्थानचे गवर्नर जनरल होऊन गेले व जाणीं हिंदुस्थानांतील कितिएक संस्थानें तोंडांत टांकलीं त्यांच्या लक्षांत, प्रसन्न कुमार यांची विद्वत्ता लौकरच आली. त्या वेळेस हिंदुस्थानचे कायदे कौन्सिल नुकतेंच स्थापन झालें होतें. या कायदे कौन्सिलच्या मदतीस लार्ड डालहौसी यांणीं प्रसन्न कुमार यांस घेतलें व यांपासून कायदे कौन्सिलास जी मदत मिळाली त्याविषयीं कायदे कौन्सिलाच्या मेंबरांनीं वारंवार बोलून दाखविलें. बंगाल्यांत जेव्हां कायदे कौन्सिल प्रथम स्थापन झालें तेव्हां यांस कायदे कौन्सिलचे मेंबर नेमिलें व गतवर्षीं यांस हिंदुस्थानाच्या म्हणजे गवर्नर जनरलच्या कायदे कौन्सिलचे मेंबर नेमिलें. सन १८६६ सालीं यांस विलायत सरकारानें "स्टार आफ् इंडिया" ची पदवी दिली.

प्रसन्नकुमार ठाकूर, यांणीं मरतेसमयीं आपल्या जिनगीची व्यवस्था केली व आपल्या नातेवाइकांस आणि चाकर लोकांस पुष्कळ देणगी दिली. संस्कृत कालेज व दवाखाना चालविण्या करितां आणि आपल्या कुलदेवतकरितां यांणीं एक लक्ष रुपये व वार्षिक १६,००० रुपये उत्पन्नाची इस्टेट काढून ठेविली आहे व संस्कृत कालेजाचें घर बांधण्यास ३,५०० रुपये दिले आहेत. याशिवाय त्यांणीं दुसऱ्या देणग्या दिल्या त्या अशा. डिस्ट्रिक्ट चारिटेबल सोसायटीस १०,००० रुपये; कलकत्ता नेटिव इसपितळास १०,००० रुपये; व कलकत्ता एथील युनिवर्सिटीच्या संबंधानें "ठाकुर ला प्रोफेसरशिप" म्हणने कायदे शिकविण्याच्या गुरूची जागा स्थापन करण्या करितां ३,००,००० रुपये दिले आहेत. या तीन लक्ष रुपयांच्या व्याजापैकीं दरमहा एक हजार रुपये देऊन कायदे शिकविण्यास एक प्रोफेसर ठेवावा. त्याणें कलकत्यांत एका नेमलेल्या जागीं कायदे शिकावित जावे व कायदे शिकण्यासनीं मुलें येतील त्यांजपासून फी घेऊं नये. प्रसन्नकुमार यांणीं कायद्याचा अभ्यास केल्यापासून त्यांस पैसा व कीर्ति हीं दोन्ही मिळालीं याजकरितां त्यांणीं आपल्या देशबांधवांस कायदे शिकण्याची फुकट सोय असावी या हेतूनें त्याणीं कायद्याच्या गुरूची जागा स्थापन करण्यास तीन लक्ष रुपये दिले आहेत. दहा वर्षांवर जांणीं यांची नौकरी केली त्यांस त्यांच्या पगाराच्या दर रुपयास १०० रुपये व ५ वर्षांवर जांची नौकरी झाली असेल त्यांच्या पगाराच्या दर रुपयास ५० रुपये बक्षीस द्यावे असें यांणीं मृत्युपत्रांत लिहून ठेविलें आहे. याप्रमाणें यांणीं आपल्या चाकरांस जें बक्षीस दिलें तेंच सुमारें ४ लक्ष रुपये होतील असें अनुमान आहे. याशिवाय त्यांणीं आपल्या नातेवाइकांस हीं मोठमोठालीं बक्षिसें दिलीं आहेत. असो- याप्रमाणें प्रसन्नकुमार यांणीं लोकांचें कल्याण व आपल्या जन्माचें सार्थक केलें; याजकरितां त्यांचें स्मरण राही असें कांहीं स्मारक कृत्य करावें याविषयीं हल्लीं कलकत्यांत उपक्रम चालू आहे.

ने. ओ.

## नवीन वर्तमानपत्र.

आम्हांस लिहिण्यास फार संतोष वाटतो कीं साताऱ्यास महाराष्ट्रमित्र नावाचें वर्तमानपत्र नवीन निघूं लागलें आहे; साताऱ्यास आजपर्यंत टाइपाचा प्रेस नव्हता तो होऊन त्यांत इंग्लिशमराठी वर्तमानपत्र निघूं लागलें ही संतोषाची गोष्ट, व तें पत्र आमचे रा० गणेश नारायण कोलटकर यांनीं काढिलें म्हणून आम्ही फार संतोष म्हणतों. हे दर गुरुवारीं निघणार, याची किंमत व सांच्या वऱ्हाडसमाचारा प्रमाणें आहे. वऱ्हाडसमाचाराशीं आलीकडे त्यांनीं जें वर्तन केलें त्यावरून छापखान्याचे कारखान्यापासून आपणास सोडवून घ्यावें असें त्यांच्या मनांत असावेंसें दिसत होतें परंतु त्यांनीं तसें होऊं दिलें नाहीं हें चांगलें केलें. वऱ्हाडांतील हे पहिले वर्तमानपत्रकार आहेत परंतु साताऱ्यास तसें नाहीं. तेथिल लोक आज १४ वर्षें आपले ग्रामस्थ वर्तमानपत्राचा उपभोग घेत आहेत. साताऱ्यास पहिलें वर्तमानपत्र "बोधामृत" या नावाचे खंडेराव बाळाजी फडके यांनीं सन १८५५ चे जुलाई महिन्यांत काढिलें होते. व हल्लीं शुभसूचक या नावाचें दुसरें वर्तमानपत्र रामचंद्र आपाजी चितळे यांचें कित्येकवर्षें चाललें आहेच. तेव्हां पुन: साताऱ्यास दोन वर्तमानपत्रें झालीं आहेत. व पहिल्याचा शुक्रवार असून यांचा गुरुवार झाला आहे. यांत पहिल्यास जरा अडचण व्हावी हा इरादा दिसतो; आतां कदाचित तसें नसून दुसरें कांहीं कारण असेल तर आमचें कांहीं म्हणणें नाहीं. अस्तु. कित्येकअंक पाहिल्यावर आम्ही आमच्या गणपतरावजीच्या महाराष्ट्रमित्र नामक नवे वर्तमानपत्राबद्दल अगत्य एक आर्टिकल लिहूं.

## A WORD FOR EARL MAYO.

(*Englishman, September 19.*)

IT may have been a subject of surprise to some of our readers, that we have not yet expressed our opinion on the appointment of Earl Mayo to the Governor-Generalship of this country. The fact is that while we know comparatively little about Earl Mayo, the storm of indignation which has greeted his appointment, was naturally suggestive of the existence of strong positive disqualifications, regarding which, we should, in time, be fully enlightened. After a careful study of what has been seid upon the subject we are driven to the conclusion that party feeling with which public opinion in this country may happily discard all sympathy, has had much more to do with the outcry than reason. Earl Mayo appears to be a man, who, after holding for a consider able period, and under the most critical circumstances, an office of some responsibility, has neither done, nor left undone, anything to elicit the censure of one of the most exacting of publics. All that the worst enemies of the of the Ministry at a time when the whole country is under the influence of political passion, have been able to allege against Earl Mayo, is of a purely negative nature. The entire accusation may be summed up under two heads; he has never shown any of the higher qualities of a stateman, and he has no Indian knowledge. It is not attempted to show that he has failed to display great states manship in a position whicn demanded great statesmanship; or that he has had opportunities of acquiring Indian experience, and failed to profit by them. Whatever force these charges possess, must fall entirely upon the Ministry, and not at all upon Earl Mayo; and the difficulty of disembarrassing the letter from the criticism to which the former may have rendered themselves obnoxious by appointing him is a misfortune to a statesman about to enter on duties alike novel and arduous, which, we think, it would be ungenerous on the part of the Indian Press to increase. If there was any statesman available for the appointment, possessed of the qualities which Earl Mayo has not had an opportunity of displaying, the Ministry may have acted unwisely in appointing him; we say, may have acted unwisely, for his colleagues may have had opportunities of judging of Earl Mayo's potential qualifications, which the public have not. The statesmen who possess these qualifications, might, however, be counted on the fingers of one hand, and so ignorant are the public of themerits of the question, that they do not even know whether any one of them was willing to accept the appointment or not.

The appointment is, in any case, an accomplished fact, and the Indian public may very well, if on grounds of policy alone, be so much more just to Earl Mayo than their brethren at home, as to give him a fair field. We cannot but remember that the Governor-Generalship of this country, has both made and unmade, great reputations. As to Indian knowledge, we know here much better than the English public, what is the real value of such experience gained at home. The man who has studied India in his office, or by his fireside, in the light of blue-books, or of newspaper articles embodying the essence of the humbug of the day, is very likely to be a more or less dangerous "doctrinaire." Of all the statesmen who have acquired a reputation for having epitomised India at home, who is there that would not have to unlearn much before he could be an acceptable ruler to the people of India? Earl Mayo has at least nothing to unlearn; and though he has much to learn, we have no reason to assume that he is incapable ot learning.

## FEROZE SHAH.

(*Englishman, Sept. 18*)

THE Government have received information which proves that Feroze Shah is not so quiet, nor so harmless, as the rumours circulated about him would seem to imply. He has written, and circulated largely amongst the Swatees and the border tribes, an "Istahar," or narrative in Persian, in which he gives an account of himself. Bundles of this "Istahar" have been, it is said, despatched to various parts of the Bengal Presidency, for circulation amongst the Mahomedans. The narrative contains a detailed account of his many wanderings after the break up of the last relies of the revolt under Tantia Topee, in Arabia, Persia, and Turkistan, and then passes on to relate how a saint named Khoja Khajee appeared to him in a dream, and bade him wait a few years, before attempting to recover his inheritance, as the term of the rule of the English was not yet completed. The paper winds up with a diatribe against the Euglish, for the gross injustice with which they have treated Mahomedans in general. This "Istahar" is doubtless the reply of Feroze Shah to the many reports or his being an impostor, which have of late been circulated.

## वऱ्हाड.

मे० कार्डी साहेब फस्ट असिस्टंट रेसिडंट अजारीपणाची रजा घेऊन हैदराबादेहून विलायतेस जाण्याकरितां निघून गेले.

उमरावती हायस्कूलचे असिस्टंट मास्तर रा० बळवंतराव पाटील अजारीपणाचे रजेवर गेले, त्यांचे जागेवर मलकापुरचे मास्तर रा० विसाजी रघुनाथ जोशी यांस नेमिलें.

खामगावचें स्मालकाज कोर्ट २१ वे तारखेस सुरू झालें. क्लार्क आफ दि कोर्ट आद्यप कोणी आले नाहींत. व रा० रा० रामसेवक दीनदयाळ जुडिशियल एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर आपले कोर्टासह मलकापुरास गेले.

खामगावचे स्मालकाज कोर्टांत वकिलाची फी मुकद्दम्यांत मुळींच आकारित नाहींत या मुळें तेथील वकील मंडळींत मोठी गडबड झाली आहे. व काम कमी झाल्यामुळें कित्येक वकील बाळापुरास व मलकापुरास जात आहेत. ही वकिलाची फी न आकारणें कायदेशीर नाहीं असा संशय आहे, याज करितां कोणी कायदे पंडित या विषयीं खुलासा लिहितील तर त्यास आम्ही अवश्य स्थल देऊ.

बाळापुर तालुक्यांत कारोळा एयें २० वे तारखेस पुंजा मांग यानें आपले बायकोचा खून केला, तो आरोपी शेगावचे चीफ का० मि० भैरवलाल यांनीं मुद्देमाला सहित पकडला. सदरहू मुकद्दमा सेशन कमिट झाला आहे.

बुलढाण्याकडून एक पत्र आलें आहे. त्यांत तो लिहितो कीं डि० कमिशनर साहेबांचे हुजुरांत एक ३५ रुपये पगाराची जागा खालीं आहे ती वर्गावर्गीनें भरल्यास बहुत गरीब कारकुनांचे हक्क पाहिलेसें होईल. याजकरितां हकदार लोकांच्या अर्जांचें विसर्जन होऊ नेय.

हाच लिहिणारा सरकारास दुसरी एक गोष्ट सुचवितोकीं तहशिलदार कचेरींतील कारकून बाहेर कामावर जातात त्यांस भत्ता मिळत नाहीं ही मोठी गैरसोय आहे. सबब सरकारानें ती काढून टाकावी.

मौजे माटरगांव खुर्द तालुके बाळापूर येथें ता० १४ माहे सपटंबर सन १८६८ इसवी रोजीं जानजी वलद हिराजी गाढ याचे बायकोस पांच महिन्याचा गर्भ असतांच मुलगी झाली. तिचें डोकें फार मोठें असून नाक, हात व पाय अगदीं अखुड होते व तोंड लहान आणि डोळे नसून फक्त नाक मात्र होतें. ही मुलगी मयत पैदा झाली व पैदा होण्यास फार श्रम लागले. बहुत करून तिची मातुश्री मरावी परंतु ईश्वरकृपे आराम आहे. या मुलिचें पांच महिन्याचें एवढें मोठें डोकें होतें तर पुरे दिवसाचें होऊन उत्पन्न होतें तर ते आपल्या मातुश्रीसाहित सहज स्वर्गास जातें ! !

मोर्शी तालुक्याचे तहशिलदार वरूडास मुलींची शाळा पाहण्याकरितां गेले होते व त्यांनीं परीक्षा घेऊन मुलींस खण व मिठायी वाटली. व सामानाकरितां वर्गणी केली ती ३७ रुपये झाली.

एका स्कुलमास्तरांनीं लिहिलें आहे कीं वऱ्हाडांतील सरकारी शाळांस महालक्ष्मी (ज्येष्ठा कनिष्ठा देवी) चे सणाकरितां कांहीं दिवस सुटी असावी कीं नाहीं? अक्षय तृतीया, घटोत्थापन इत्यादि सुट्या आहेत तर वऱ्हाडांत सदरील गौरीचा सणही मोठा आहे खरा.

बुलढाण्यास तरूण विद्वानांची सभा भरत असते ती १२वे तारखेस भरली होती, त्या वेळीं डिपुटि कमिशनर आफिसांतील क्लार्क रा. दामोदर सदाशिव यांनीं "अज्ञानपणीं मुलामुलींचीं लग्नें केल्यापासून तोटे" या विषयावर निबंध वाचिला. व त्याजवरच संभाषणें झालीं.

बुलढाण्याच्या पोस्ट आफिसाचें काम आतां बरें चाललें आहे.

शेगांव तालुक्यांत महामारीचा आजार पुन: उद्भवल्याचें आम्हांस एका गृहस्थांनीं कळविलें आहे.

आकोला.

पाऊस नाहीं. हवा रमणीय झाली आहे. पहाटे थोडीथोडी थंडी पडण्यास आरंभ झाला आहे. रोगराई बिलकूल नाहीं.

मुनसिपाल कमेटीनें हल्लीं मोठें मनावर घेतल्यासारखें दिसत आहे. आजचे पत्रांत कमिटीचे सहीचा एक जाहिरनामा आहे. त्याच्या प्रती छापून काढून रस्तोरस्तीं कमिटीनें लाविल्या आहेत. गावांत शौच्यास बसण्याचीं खिडारें होतीं तीं साफ करवून तेथें आतां मनाई केली आहे रस्त्यावर गवत, केर कचरा असलेला का-

ढण्यास व खाच खळगे साफ करण्यास चोहोंकडे मजूर लाविले आहेत. व मेंबर लोक फिरत असतात अशी शहरसुधारणेची मोठी गर्दी होऊन राहिली आहे. परंतु पैशाचें मात्र संपुष्टांत दिसतें. सर्व सुधारणा त्यावाचून नडतात.

विद्याखात्याकडील बुकडिपोवरील क्युरेटर मि. पांडुरंग दामोदर यांस रेलवे कंट्राक्टर मार्फत एक २०० रुपये पगाराची जागा आली होती परंतु ती त्यांनीं कबूल केली नाहीं- हा त्यांचा विद्याखात्याविषयींचा लोभ डायरेक्टर साहेबांनीं लक्षांत ठेवण्या जोगा आहे.

## वर्तमानसार.

मुंबईचे लष्करी खात्यांत बरेच फेरफार होणार आहेत.

कमिसरी खात्याबरोबर अबिसिनियेस दोन पारशी गृहस्थ एक क्लार्कचे कामावर व दुसरा इन्स्पेक्टरचे कामावर असे गेले होते. त्यांचे चांगले कामगिरीबद्दल वरिष्ठांनीं व कमांडर इनचीफ साहेबांनीं शिफारस केल्यावरून मुंबई सरकारानीं त्यांस "खान बहादूर" हे किताब घेण्याविषयीं विचारिलें परंतु त्यांनीं ते कबूल केले नाहींत. त्यांचें म्हणणें आहे कीं किताबाचें संरक्षण होण्याजोगें कांहीं स्वास्थ्य सरकारानें करून दिलें पाहिजे.

मि० करसनदास मुळजी विलायतेहून जाऊन आले म्हणून त्यांचे जातवाल्यांनीं त्यांस जातिबाहेर ठेविलें होतें. परंतु राजकोटचे दरबारांत त्यांस कांहीं अधिकार मिळाला आहे म्हणून हल्लीं ते तेथें आहेत व त्यांस त्यांच्या जातीच्या २००० लोकांनीं आपल्यांत जेवावयास घेतलें. व पोकळ प्रायश्चित्तही कांहीं दिलें नाहीं.

कराची एथील लायब्ररीचा व म्यूझियमचा बंगला सुमार १२००० रुपयांस सरकारास विकला. व ते रुपये मुनसिपल कमिटीस देऊन त्याजपासून फ्रियर हालमध्यें लायब्ररीस व म्यूझियमास जागा व बुकें आणि वस्तु ठेवण्यास भिंगाचीं कपाटें वगैरे घेण्याचा ठराव केला.

वायव्य प्रांताकडे गडबड आहे पण काश्मिरचे महाराज इंग्रज सरकाराशी फार भलेपणानें वागत आहेत असें समजतें.

वरिष्ठ सरकारांनीं विच्यारलें आहे कीं हिंदुस्थान आणि तिबेट यांमध्यें किती अंतर आहे. व तिबेटाहून चीन, हिमालयपैल घाट वगैरेकडें व्यापारी लोक जातात त्यांचे सिमल्यावरून जाणारे असे कोण कोण ते व किती रस्ते आहेत?

बडांचे वेळीं सरकारानें कोणाकाणोस जहागिरी दिल्या त्यांत कित्येकांस पडित जमिनीच मिळाल्या. म्हणून त्यांनीं विलायत सरकारा कडे तक्रारी केल्या. हल्लीं असा ठराव होऊन आला आहे कीं जे लोक त्याजमीनीस कबुल नसतील त्यांस नक्त रुपये देऊन जहागिरी परत घ्याव्या.

हिंदुस्थानांतील सर्व जिल्हा कोर्टांत त्या त्या जिल्ह्याची भाषा चालत जावी असें विलायत सरकारानें लिहिलें आहे.

अजमीर व जयपुर प्रांताकडे पाण्याचा फार दुष्काळ पडला आहे. नागपुरच्या एका पत्राचा बातमीदार म्हणतो कीं एक आण्याला सुमार अच्छेर पाणी झालें आहे.

काश्मिराकडे पाऊस नाहीं व धारण भडकत चालली आहे.

असा ठराव होत आहे कीं, प्रांतांतील तुरुंगावरील जेलर व सुपरइंटेंडेंट यांच्या कांहीं प्रती कराव्या. व त्या कैदींचे संख्येवर कराव्या. व त्या बेतानें त्यांस अधिक उणे पगार असावे. हिंदुस्थानसरकारानें याबद्दल इलाख्यांचे सरकारास तक्ते मागितले आहेत.

मद्रास इलाख्यांत या वर्षीं १४३०० येकर जमिनींत निळीचें पीक झालें आहे. व त्यापासून ६७२० मद्रासीमण नीळ होईल असा अजमास आहे.

रशियन सरकार तुर्कस्थानांत जास्ती फौज पाठवित आहेत असें विलायतेकडील वर्तमानावरून समजतें.

कोणा कामदारास सस्पिंडकेलें व त्याची चौकशी चालत असली तर त्यास पगाराचा चवथाहिसा पोटगीकरितां देत जावा. असा हिंदुस्थान सरकारानें ठराव केला आहे.

✓ मि. रिवेट कार्न्याक सा० काटन कमिशनर हे अमेरिकादेशचा तंबाकु इकडे हिंदुस्थानांत लावण्याविषयीं फार खटपट करीत आहेत.

मुंबई सरकारानें सुचविलें आहे कीं, बंगाल इलख्या प्रमाणें आमच्याकडे स्टांप कागद हल्लींपेक्षां उंची जातीचे असावे.

उत्तरप्रांतीं ब्रिटिश राष्ट्रांत जो व्यापार चालावयाचा त्यास गुरखे सरकाराकडून कांहीं प्रत्यवाय घडतो असें ऐकण्यांत आलें आहे.

कांहीं कामदार इंग्लिश रिपोर्ट लिहित असतां त्यांत हिंदुस्थानी शब्द घालतात त्याजबद्दल व्हाइसराय साहेबांनीं टीका केली. त्यांचें म्हणणें आहे कीं तशा शब्दांची इंग्लिश भाषेंत व्याख्या लिहावी.

रजपुत संस्थानांतील कांहीं राजे रेलवे करितां जमिनी घ्यावयाच्या कामीं इंग्लिश सरकारास त्या भागाचा पूर्ण अधिकार देण्यास कबूल नाहींत· असें पाहून हिंदुस्थान सरकारानें आपली इच्छा सोडून दिली.

पंजाबांत नवीन खानेसुमारी झाली. मनुष्यें एक कोटि सत्तरलक्ष आहेत.

डाक्टर बर्डउड साहेब विलायतेस गेले त्यांचे युनिवर्सिटी रजिष्टरचे जागीं मि. जेम्स टेलर यांस नेमिलें.

इंदुराकडे तीनचार दिवस पाऊस पुष्कळ पडला.

अयोध्याप्रांतीं महागाई दिवसानुदिवस फार होत चालली आहे. दुष्काळ पडण्याचें चिन्ह दिसतें.

मि. नार्टन या नावाचे मुंबई इलाख्यांतील एक सिविल सरविस चाकरी सोडून विलायतेस गेलेले आहेत ते जुन्या मुंबई ब्यांकेचे शेर होलडर असून त्या ब्यांकेंत दीडलक्षांची ठेव होती ती बुडाली तेव्हां त्यांनीं स्टेट सेक्रटरीकडे अर्ज केला त्यांनीं हप्तेबंदीनें त्यांचे सर्व रुपये देण्याचा ठराव करण्याविषयीं हिंदुस्थान सरकारास लिहिलें. त्यावरून त्यांनीं दरमहा १०००० रुपयांचा हप्ता लावून दिला.

✓ अमेरिकेंत न्यूयार्क शहरांत तारायंत्र खात्याकडे १९ स्त्रिया सिग्नलरचे कामावर आहेत व त्यांवर मिस स्नो नावाची एक स्त्री मुख्य आहे. बातम्या देण्याचे व घेण्याचे कामीं या स्त्रियांची फारच त्वरा आहे. ८ वाजल्या पासून ४॥ वाजत पर्यंत प्रत्येक स्त्री सुमारें ३१४ बातम्या देते घेते.

पंजाबचे लेफटिनेंट गवरनर रुसेल होते कीं आपले आदरार्थ तोफांच्या सलामीची जी संख्या आहे ती कमी असून आपले ताब्यांतील व हुकुमांतील कित्येक लोकांस सलामीच्या तोफा अधिक आहेत सबब आपणास त्यांहून कांहीं अधिक तोफांचा मान असावा. व त्याबद्दल त्यांनीं व्हाइसराय साहेबाकडे गाऱ्हाणें केलें होतें. त्यांनीं लिहिलें कीं, ही याद आर्मीचेकडून तयार न होतां विलायतेहून महाराणी साहेबांकडून ठरून येत असते. काय हा आगंतुकपणा.!

### चोराविषयीं चमत्कारिक युक्ती.

पारिस शहरांत घरफोडे चोरापासून बचाव करण्या करितां एकानें एक चमत्कारिक नवीन युक्ती काढिली आहे. ती अशी— वेताच्या काठीचे एके टोकास एक शिंग बसवून दिलें आहे व त्या शिंगांत तारायंत्राची एक ब्याटरी व दोन चकचकित रिफ्लेक्टरासुध्धां एक लहानसा दिवा बसविलेला आहे. [illegible] प्रकाश इतका [illegible] कोणाचे डोळ्यावर [illegible] असतां तो मनुष्य तत्काळ [illegible] होतो. काठीच्या दुसऱ्या बाजूला एक लहान गोंडा आहे व त्याचा [illegible] ठेविला आहे म्हणून तो गोंडा [illegible] म्हणजे दिवा पेट घेतो.

मुंबईच्या मुनसिपाल कमिटीचें गेले आठवड्याचें उत्पन्न

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| गाड्यांवरील कर | २५८९ | ६ | ० |
| घरांवरील कर | ४६६७२ | १४ | १० |
| उदीमपट्टी | ५८१ | ८ | ० |
| पोलिसपट्टी | १४५६६ | १२ | ६ |
| दिव्याचीपट्टी | ९१३२ | ५ | ० |
| पाण्याचीपट्टी | १०५८७ | ७ | ८ |
| बाजार फी | ८७१ | ९ | ९ |
| पोलिस कमिशनर मार्फत दारूपट्टी वगैरे | ६६ | ८ | ० |
| किरकोळ फी | ७५३ | १३ | १ |
| दंड | ० | ० | ० |
| | ९२३७४ | ५ | ७ |

सर आलेकझांडर ग्रांट साहेब मुंबईचे डायरेक्टर विलायतेस गेले. त्यांकरितां पुण्यास सभा झाली व त्यांस मानपत्र दिलें गवरनर साहेब त्या समारंभास अध्यक्षस्थानीं होते. डायरेक्टरचे जागेवर मि. पील साहेब यांस नेमणार असें कळतें.

**पुणें**—मिस्तर पांडुरंग श्रीपत रेडे सब् इन्स्पेक्टर तुकडी नाशिक यांस ता० २३ रोजीं देवआज्ञा झाली. ज्ञा. प्र.

**नागपूर**—सिताबर्डीवर टेंपल बाजारांतील इसपितळांत नुकतेच दोन रोग्याचे मुतखडे कापून काढिले. हें नाजूक काम करण्यास डाक्टर बिटसन व कामठीचे युरोपियन डाकतर वगैरे लोक होते. हे खडे कापून खालीं पडल्या बरोबर जमिनींतून काढलेल्या ताज्या बटाट्याच्या रंगाचे व त्याच आकाराचे दिसले. या दोन रोग्यांची उमर सुमारें एकाची २० व दुसऱ्याची तीस इतकी होती. यांतून लहान उमरीचा या दुःखानें अगदीं वेंगून गेला होता व पुढें जीव राहत नाहीं इतकी त्यास इजा होत होती, परंतु डाकतर साहेबांनीं त्या दोघांसही जिवदान दिलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. सदहू खडे थोरल्या रोग्याचा ४ अंस व धाकट्याचा २ अंस याहून कांहीं अधिक इतके वजनाचे आहेत. हें पाहण्याकरितां येथील पदार्थ संग्रहालयांत ठेवण्याचा विचार आहे. ना. अ.

**सातारा.** जत जहागिरदारानीं रा. रा. राघवेंद्र नरसिंव्ह मंदरूपकर यांस आपल्या दौलतीचे कारभारी नेमण्याबद्दल एजंट साहेबांकडे शिफारस केली होती. त्या प्रमाणें सदर गृहस्थांस कारभारी करण्याची परवानगी झाली.

फलटण, बारामतीकडून तुरळ तुरळ वाख्याचा उपद्रव सुरु आहे. पर्जन्याकरितां लोक वाट पाहातात. म. मि.

ठाणें पर्जन्य राहून राहून पडतो. शनिवारीं बराच पडला

जव्हार संस्थानचे खजिन्या पैकीं सुमारें लक्ष सवा लक्ष रुपये सेविंग ब्यांकेंत राहण्याकरितां कलेक्टरकडे आले आहेत असें कळतें.

अजम माधवराव शेषगीर मुनसफ यांनीं एका मोतीलाल रामदास नावाचे मनुष्यास बेअदबीचे गुन्ह्यावरून २०० रुपये दंड केला होता, तो अपिलांत अक. जड्ज मि० हंटर यांनीं रद्द केला. सू० द०

धुळें—या आठवड्यांत हवा फार उष्ण झाली आहे. तापाचे आजार गांवांत सुरु आहेत. आसपास पाऊस पडल्याच्या बातम्या समजतात. धुळ्यास पाऊस नाहीं.

[illegible] तालुक्याचे मामलेदार रा० रा० [illegible] यांजवरील [illegible] होऊन त्यांतून [illegible] मुक्त झाले.

एथें नूतन आंग्लोव्हरनाक्युलर स्कूल सोमवारी ता० १९ रोजीं सुरु झालें.

एथील नंबर १ च्या शाळेंत तारीख १४ रोजीं जाहीर परीक्षा होऊन मुलांस बक्षिसें वाटण्याचा समारंभ झाला. खा. वै.

**नगर**—या आठवड्यांत तारिख १६ मि० रोजीं बराच पाऊस पडला. आज दोन तीन दिवस नभमंडळ अभ्रांनीं आच्छादित असून पाऊस पडेलसें भासतें. दिवसास उष्मा फार होतो. पर्जन्याकडे शेतकऱ्यांचे डोळे लागले आहेत. धान्याचे भाव बरे आहेत. वृ० वै०

एथें पन्नास मुलांहून जास्त मुलें इंग्रेजी शिकण्यास तयार असतां, अद्याप आंग्लोव्हरनाक्युलरस्कूल स्थापन करण्याविषयीं आमचे एज्युकेशनल इन्स्पेक्टर यांणीं कांहींच तजवीज केली नाहीं. वृ० वै०

ह्या डिस्ट्रिक्ट मधील नाशिक मुनसिफ कोडतांतील वकील मि० माधवराव जनार्दन पळणिटकर यांस नाशिक मुनसिफ कोडतांत दिलेली वकिलीचें काम करण्याची परमाणगी कायम ठेवून शिवाय ह्याच डिस्ट्रिक्टांतील येवलें मुनसिफ कोडतांत वकिलीचें काम करण्याविषयींचा हुकूम त्यांचे अर्जावरून जजसाहेबांनीं दिला आहे. वे हे वकील चांगले, कायद्यांत वाकबगार व इंग्रेजी जाणणारे आहेत.

**नोटिस**—राजश्री ताराशिंग राजे धूळघाटकर यांस अबदुल अल्ली तयबअली बोहरी दुकान हिवरखेड यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हांकडे आमचे दुकानचो बाकी ७३२८७॥६ सातशें बत्तिस रुपये साडेसातआणे आहे ती ही नोटिस पोंचल्यापासून ८ दिवसांत द्यावी. नाहीं पेक्षां तुम्हावर दिवाणी कोर्टांत फिर्याद होईल. कळावें. तारिख २५ माहे सपटंबर सन १८९८ इसवी.

( सही ) अबदुलअल्ली तयबअली बोहरी.

## Correspondence.

### बाहेरून आलेलीं पत्रें.

**रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस**

आमचे या वऱ्हाड प्रांतीं डायरेक्टर आफ् पब्लिक इन्स्ट्रकशनच्या कामीं मेहेर्बान आर. एस. सिंक्लेअर एल. एल. डी. यांची नेमणूक झाल्यापासून त्यांणीं या खात्याची सुधारणा पुष्कळच केली यांत संशय नाहीं. यांणीं मुलांस उत्तेजन येण्याकरितां कांपिटेटिव इक्झामिनेशन म्हणून वर्षांतून येक वेळ परीक्षा घेण्याची वहिवाट आज दोन वर्षें ठेविली आहे त्या परीक्षेत पसंत होणारे विद्यार्थ्यांस स्कालरशिप्स म्हणजे पगारी विद्यार्थ्यांच्या जागा मिळून पुढें अभ्यास करण्यास सवड सांपडते व कित्ये-

कांस ठरीव इनामेंही मिळतात. ही टूम डायरेक्टर साहेबांनीं चांगली काढली आहे येणेंकरून मुलांस धीटपणा येऊन परस्परांची योग्यता परस्परांस कळते आणि या गोष्टीनें मास्तर लोकांसही ईर्षा येणारी आहे. परंतु या परीक्षेकरितां स्टांडर्ड म्हणजे अभ्यासाची जी यत्ता ठरविलेली नजरेस पडते तेथपर्यंत या साहेबांची नेमणूक झाल्यापासून नवीन जाहालेल्या शाळांतील विद्यार्थ्यांची मजल पोंचली नाहीं व पोंचण्यास कितीही ओढाताण केली तरी अवघड आहे यास्तव आम्ही डायरेक्टर साहेबांस अशी सूचना करितों कीं ही परीक्षा केवळ हायर व मिडल क्लास स्कुलाचे उपयोगाची आहे. करितां बाकी राहिल्या ज्या मराठी इंग्लिश व केवळ मराठी शाळा त्यांजसाठी जिल्ह्याचे किंवा तालुक्याचे ठिकाणीं परीक्षा ठरवून मुलांस इनामें देण्याची वगैरे कांहीं तजवीज केली असतां त्यांस उत्तेजन येईल अथवा मुंबईकडे वगैरे ज्याप्रमाणें एजुकेशनल इन्स्पेक्टर व डेपुटी इन्स्पेक्टर साहेबांची स्वारी प्रांतांत फिरावयास निघते त्यासमयीं शाळांनिहाय परीक्षा घेऊन हुशार मुलांस इनामें वांटण्याची वहिवाट आहे त्याप्रमाणें इकडेही शुरू केल्यास ठीक पडेल. सारांश सदरीं लिहिले मराठी इंग्लिश व मराठी शाळांतील विद्यार्थ्यांस उत्तेजन येण्याकरितां कांहींतरी योजना जाहाली पाहिजे. या गोष्टीचा डायरेक्टर साहेब बहादुर विचार करतील अशी उमेद आहे.

## Advertisements.
## जाहिरखबरा.

### वर्गणीदारांस विनंती.

गेल्या वर्षाचे आकटोबर महिन्यांत आम्हीं अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें. त्यास या महिनाअखेर वर्ष होतें. तर आगाऊ वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्यायोगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

सर्व जुन्या वर्गणीदारांचे हिशेब सन १८६७ चे आकटोबर महिन्यापासूनच आम्ही एथें ठेविले आहेत. त्या मागीलचा इकडे कांहीं संबंध नसल्यामुळें कोणास मागणें होणार नाहीं. व रा० गणेश नारायण कोलटकर यांचा आमचा संबंध तुटला आहे तरी तारीख २० माहे जून सन १८६८ इसवीचे आंत वऱ्हाड समाचार खात्यावद्दल या चालू वर्षाबद्दलचा पैसा घेऊन आफिसच्या नात्यानें त्यानीं कोणास पावती दिली असेल तर ती त्यांनीं आम्हाकडे रुजू करावी म्हणजे तो पैसा त्यांस मजुरा देण्यांत येईल. सर्वांस कळावें.

**खंडेराव बाळाजी फडके.**
**आबाजी खंडेराव वकील.**

### जाहिरनामा.

**अकोला मुनसिपाल कमिटी.**

ही कमिटी अकोल्यांत स्थापन होऊन बराच काळ गुजरला आहे परंतु तिचे कामाची व्यवस्था चालावी त्या रीतीनें न चालल्यामुळें ती कमिटी आहे किंवा नाहीं ह्याचीही माहिती लोकांस नव्हती, म्हणून तिचा अधिकार काय आहे व तिजबरोबर लोकांचें वर्तन कसें असावें ह्याविषयीं लोकांचे मनींमानसींही विच्पार येत नाहीं; याजकरितां हा जाहिरनामा सर्वांस प्रगट केला आहे तर ह्या अकोल्यांत मुनसिपाल कमिटि असून तिचा अधिकार व लोकांचीं तिजबरोबर कर्तव्यकर्मे हीं सर्व यांत लिहिलीं आहेत तीं लक्षांत धरून लोकांनीं गावची सुधारणा उत्तम प्रकारें होईल असे बाबदींत जे योग्य उपाय ही कमिटी योजील ते सिध्धीस नेण्यास तयार रहावें.

२. ह्या कमिटींत हल्लीं जे सभासद आहेत त्यांचीं नावें खालीं लिहिलीं आहेत.

**प्रेसिडंट.** ( अध्यक्ष )

मेहेरबान दस्तुर बहिमनजी जामासजी साहेब एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर.

**सेक्रेटरी** ( चिटणीस )

मेहेरबान विष्णु सदाशिव कमिशनर साहेबांचे शिरस्तेदार.

**आसिस्टंट सेक्रटरी.** (दुय्यम चिटणीस )

मेहेरबान वामन प्रभाकर असिस्टंट स्कुलमास्तर हायस्कुल.

**मेंबर.** ( कमिटीदार. )

मेहेरबान श्रीराम भिकाजी डिपुटी एजुकेशनल इन्स्पेक्टर.
" वामन बाळाजी हेडक्लार्क, डायरेक्टर आफीस.
" खंडेराव बाळाजी एडिटर, वऱ्हाडसमाचार.
" आबाजी खंडेराव वकील.
" गंगाधर जोरावरमल साहू.
" बाबणलाल रामलाल साहू.
" गुलाम अहमद मुनशी.
" जोरावरखा बैद.

३. मुनासिपाल कमिटीचे अधिकार.

१ गावचें फंड कोणते रितीनें गोळा करावें, कशी पट्टी बसवावी, अथवा कसें उत्पन्न करावें याबद्दल दिपुटि कमिशनर साहेबांकडे विचारार्थ सुचवावें.

२ कोणताही रस्ता किंवा इमारत बांधणें अथवा त्याची उस्तवारी करणें अथवा जेणेंकरून शहराची सुधारणा होईल असे कमिटीस वाटतील ते उपाय अगर ज्या उपायांची इच्छा गावकरी करीत असतील ते उपाय व त्यांचीं कारणें आणि कमिटीचे ताब्यांतील फंडासी त्या खर्चाचें प्रमाण हीं सर्व दिपुटि कमिशनर साहेबांकडे विचारार्थ पाठवावीं.

३ शहराचे हद्दींत घाण वगैरे न होऊं देणें.

४ गांवचे खाकरूब म्हणजे भंगीलोक यांजवर नजर ठेवणें.

४. लोकांनीं कमिटीचे संबंधानें कसें वर्तन करावें त्याविषयीं.

१ कमिटीनें परवानगी दिली असेल ती जागा खेरिज करून दुसरे कोणतेही जाग्यावर, रस्त्यावर, अगर गल्लींत राख, केरकचरा, हेंदर वगैरे टाकूं नये.

२ शौचकूपाची मोरी, न्हाण्याची मोरी, अगर स्वयपाकाचें पाणीं वगैरे रस्त्यावर अगर बाहेरील जाग्यावर वाहूं देऊं नये.

३ घरांत किंवा वाडग्यांत किंवा आवारांत शेण, हेंदर आदिकरून नाशकारक पदार्थ सांचूं देऊं नयेत.

४ रस्त्यावर अगर मनाई केलेले ठिकाणीं शौचास किंवा लघुशंकेस बसूं नये.

५ घर किंवा इमारत किंवा जागा यावर मालकानें घाणेरडीं झाडें व दुःखप्रद वनस्पती वाढूं देऊं नयेत.

६ कमिटीनें मुकरर केलेले जाग्याशिवाय दुसरे ठिकाणीं जनावरांचीं प्रेतें पुरूं नयेत. व मनुष्यांचीं प्रेतें च्यार फुटीहून कमी खोल पुरूं नयेत.

७ कमिटीनें परवानगी दिल्हा ठिकाणाशिवाय इतर ठिकाणीं जनावर मारूं नये व मांस विकूंनये.

८ पिण्याचे पाण्यास म्हणजे विहीर, तळें हौद वगैरे यांस कुत्सित करूं नये.

९ रोगकारक किंवा कुजट पदार्थ मनुष्याचे खाण्याकरितां म्हणून विकण्यास काढूं नये.

१० आपली खासगी विहीर अगर हौद यांस लोक न पडतील असे रितीनें वेष्टण करावें आणि दिवाली व कुपणें व्यवस्थेनें राखावीं.

११ जनावरास क्रूरपणें अगर विनाकारण मारूं नये.

१२ कमिटीचे परवानगीवांचून कडब्याच्या किंवा घांसाच्या ४००० पेंढ्यांहून जास्त पेंढ्या ज्या घरांत वस्ती आहे त्यापासून २५ यार्डांचे आंत ठेवूं नयेत.

१३ कमिटीनें मनाई केली असतां इमारतीचें सामान किंवा तंबू वगैर रस्त्यावर टाकूं नये किंवा रस्त्यांत छेद करूंनये.

१४ लोकोपयोगी रस्ता, गल्ली किंवा जागा यास ईमारत करून किंवा दुसरे प्रकारानें व्यापूं नये.

१५ कमिटीचे परवानगीशिवाय नवीन घर वगैरे बांधूं नये.

१६ कमिटी वेळोवेळ जे योग्य हुकूम करील ते मानावें.

या शिवाय आणखी ज्याजती कर्तव्यकर्मे आहेत तीं विस्तारास्तव येथें लिहिलीं नाहींत. परंतु तीं जाणण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांणीं सेक्रटरीकडे जाऊन विच्यारावें, म्हणजे सर्व समज मिळेल. सदरीं लिहिल्या गोष्टीविरुद्ध कोणी मनुष्य वर्तन करील तर तो शिक्षेस पात्र होईल.

---

येणेंप्रमाणें सर्व लोकांस मालूम होण्याकरितां प्रसिद्ध केलें आहे. हा काळपावेतों लोकांनीं घाणेर्डी व कमिटीचे कायद्याविरुद्ध कामें केलीं त्याबद्दल त्यांस कमिटी शासन करूं शकली नाहीं. कारण लोकांस तिजविषयीं माहिती नव्हती परंतु आतां तो सर्व माहिती करून दिली आहे आणि यापुढें घाणेरडें व तिच्याकायद्याविरुद्ध घडलेलें काम नजरेस आल्यास त्याबद्दल लागलीच शासन होण्याचे तावडतोब उपाय योजिले जातील.

तारिख २३ सपटंबरसन १८६८. मुक्काम आकोलें.

विष्णु सदाशिव सेक्रटरी-
नि० अकोला मुनातिपल कमिटी.

### नोटिस.

डिपुटी कमिशनर साहेब बहादुर जिल्हा बुलढाणा यांजकडून:—

सर्वांस कळावें कीं कसंब लोणार येथील तळ्यांतील खाराचा लिलांव तारीख १ माहे नवंबर सन १८६८ इसवी रोजीं आगगाडीचे स्टेशनावरील मलकापुर येथें दिवसां ११ वाजतां दिपुटी कमिशनर साहेब बहादूर यांचे समोर तीन वाजतां केला जाईल.

तळ्यासंबंधी व लिलावाच्या शर्तीसंबंधी विशेष माहिती डिपुटी कमिशनर साहेब बहादुर जिल्हा बुलढाणा यांजकडेस अर्जी केली असतां समजण्यांत येईल. कळावें तारीख ७ माहे सपटंबर १८६८ इसवी.

मीरचिरागुदीन
शिरस्तेदार.

C. HORDERN
*Officiating Deputy Commissioner.*

---

**आक्ट.**
सन १८६८चा ९वा
पेशे व धंदे यांवरील कराविषयीं
किंमत च्यार आणे.

### जाहिरात.

खालीं लिहिलेलीं पुस्तकें रोख किंमत पाठविली असतां तावडतोब पाठविलीं जातील.

१ हाडन्स समीकरणाचें सर्व पृथक्करण. किंमत टपालहशील सह ८१०
२ प्रश्नसमुदाय पृथक्करण. टपाल हशील सह. .... .... ८६
३ उजळणीचा भाग दुसरा. किं० ८२
४ व्यवहारोपगी तारतम्य. किं० ८२८६

हीं पुस्तकें एकआणा हशीलांत सुमारें ३ पाठविली जातील.

किमतीचा पैसा आकोलें येथें खंडेराव बाळाजी व उमरावतीस वामनगोविंद रानडे यांजकडे किंवा मेहेकरास आमचेकडे पाठवावा.

( सही. ) नारो रघुनाथ मोहोळकर
मास्तर मेहेकर.

### जाहिरात.

**वऱ्हाडसमाचार** वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं. त्यांस कळावें कीं, ता० ३० माहे सपटंबर सन १८६८ इसवीचे आंत त्यांनीं बाक्यांचा उलगडा करावा. नाहींपेक्षां दरमहा दररुपयास अर्धआणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता० १५ माहे सपटंबर सन १८६८ इ०.

**वऱ्हाडसमाराचे मालक.**

### नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत नुकतेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ८६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल.

व. स. म्यानेजर.

### TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers, that their Subscriptions, for the present year, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity of ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

---

| किमतीचे ठराव. | रु. | आ. |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास··· ··· | ६ | ० |
| साल अखेर ··· ··· ··· | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ··· ··· | ३ | ८ |
| सहामाही अखेर ··· ··· | ४ | ० |
| फुटकळ एक अंकास ··· ··· ··· | ० | ५ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु. ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिने पर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

**नोटिसा वगैरे छापण्याचे दर.**

१० ओळी पर्यंत··· ··· ··· १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ८१८६

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

हें पत्र आकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकारितां छापून प्र०के०